# रंजनचतुष्टय,

किंवा

# न्याय, नीति व नवलनिधि.

हें पुस्तक

लोकमनोरंजनार्थ

मुंबईंत,

"सुबोधप्रकाश" छापखान्यांत छापिलें.

सन १८९९.

( पुस्तकप्रकाशकानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत ).

किंमत १८=

# प्रस्तावना.

पुष्कळ वर्षांमागें मुंबईंतील कित्येक मोठमोठ्या विद्वानांनीं **मराठी ज्ञानप्रसारक** या नांवाची एक मंडळी स्थापन केली होती. ह्या मंडळीचें एक मासिक पुस्तक प्रसिद्ध होत असे. त्यांत निरनिराळ्या उपयुक्त विषयांवर चांगले चटकदार निबंध येत असत. पुढील पानांतल्या गोष्टी ह्या मासिक पुस्तकांत पहिल्यानें प्रसिद्ध झाल्या असून त्या **रावबहादूर वासुदेवराव बापुजी कानिटकर** यांनीं लिहिल्या होत्या. ह्या गोष्टी मोठ्या बोधपर व मनोरंजक असल्या कारणानें त्या स्वतंत्र पुस्तकाच्या रूपानें लोकांस वाचावयास मिळाल्या असतां पुष्कळ फायदा होईल, असें वाटल्यावरून ही अल्पमात्र स्वजनसेवा प्रकृत ग्रंथप्रकाशकानें केली आहे, तिचा जिज्ञासु व बोधप्रिय जन अंगीकार करितील अशी उमेद आहे. या पुस्तकांतील गोष्टी जे मननपूर्वक वाचतील त्यांस त्यांत नीति, न्याय, धैर्य, धर्मशीलता इत्यादि सद्गुण ज्यांच्या अंगीं असतात त्यांस कसें सुख प्राप्त होतें, आणि दुराचार, साहस, कपट वगैरे दुर्वृत्तींच्या पायीं कसें नुकसान होतें याचें रेखल्यासारखें हुबेहूब चित्र दिसून येईल. मूळ गोष्टींतील नांवें व स्थलें पुस्तकप्रकाशकानें सांप्रत स्थितीला शोभतील अशीं बदललीं असून कित्येक ठिकाणीं भाषेंतही थोडासा फेरबदल केला आहे.

आतां या पुस्तकास ज्यांनीं अगाऊ आश्रय दिला आहे त्यांस एवढीच प्रार्थना आहे कीं, हें पुस्तक [illegible] अडचणींमुळें आजपर्यंत प्रसिद्ध करितां आलें [illegible] बद्दल त्यांनीं पुस्तकप्रकाशकास क्षमा क[illegible]

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| | पृ॰ |
| गोष्ट पहिली—अद्भुत व सत्य साक्ष .... .... | १ |
| गोष्ट दुसरी—पुत्राचा लाभ व सुदैव .... .... | ३७ |
| गोष्ट तिसरी—हिराबाईची सचोटी व राधाबाईचें कृत्रिम .... .... .... | ७३ |
| गोष्ट चवथी—रंगनाथ व मदनराव .... .... | १४१ |

# रंजन-चतुष्टय
## किंवा
# न्याय, नीति व नवल-निधि.

## १.

### अद्भुत व सत्य साक्ष.

**सिंध** प्रान्तांतील **हैदराबाद** नामें शहरांत **रामचरण-लाल** नांवाचा कोणी एक श्रीमान् गृहस्थ आपले वाडि-लोपार्जित शेतकीच्या उत्पन्नावर आणि संचय करून ठेविलेल्या द्रव्याच्या व्याजावर मोठा इतमाम बाळगून आ-ब्रूनें व सुखानें कालक्रमण करीत असे; त्याचे पोटीं **सेव-कलाल** नांवाचा एक पुत्र होता; तो आपले वयांत आल्यावर नानाप्रकारचे ढंग करूं लागला, आणि लो-कांस त्यापासून फार उपद्रव होऊं लागला, तेणेंकरून **रामचरणलाल** यास फार दुःख होऊं लागलें. **सेवकलाल** यानें पहिल्यानें लोकांशीं कज्जे करावे, कोणास मारावें, कोणास शिव्या द्याव्या, याप्रमाणें करिता करिता पुढें कांहीं दिवसांनीं तो चोऱ्याही करूं लागला, आणि नाना प्रकारच्या व्यसनांत चूर झाला. **रामचरणलाल** याचे पोटीं तेवढाच मुलगा होता, यामुळें लोकांनीं त्याजविषयीं कितीही गाऱ्हाणीं सांगितलीं, तरी त्यानें पुत्रमोहामुळें तिकडे

लक्ष दिलें नाहीं. याप्रमाणें कांहीं दिवस लोटल्यावर **सेवकलाल** हा एके दिवशीं मोठ्या चोरींत सांपडला, तेव्हांपासून बापानें आपलें अंतःकरण कठोर करून त्यास घरांतून घालवून दिलें; आणि पुनः त्याचें तोंड सुद्धां पाहिलें नाहीं. ज्या बापानें जन्मापासून प्रीति करून पुत्राचें संगोपन केलें, आणि त्याच्या दुराचरणाचा दोष बाल्यावस्थेकडे लावून सर्व अपराधांची क्षमा केली, त्यास परिणामीं दुःखार्णवीं बुडविणाऱ्या पुत्राच्या कृतघ्नतेस कशाची उपमा द्यावी ! असो. याप्रमाणें **सेवकलाल** हा आपल्या दुष्ट कर्मानेंच बापाच्या प्रीतीस मुकल्यावर स्वदेशाचा त्याग करून **काठेवाड** प्रान्तांत गेला, आणि दुष्ट व साहसी लोकांच्या जुटांत मिसळून दुराचरणांत काळ घालवूं लागला.

**सेवकलाल** याची आई मरण पावली, तेव्हां तो फार लहान होता, यामुळें त्याचा बाप **रामचरणलाल** त्याचे अतिशय लाड करीत असे, आणि त्याचे लहानपणचे चांगले गुण मोठेपणीं कायम राहतील, अशी त्यास अशा होती; परंतु ती आतां सर्व नाहींशी झाल्यावर, आतां मला कोणी नाहीं, असें **रामचरणलाल** यास वाटूं लागलें, आणि वृद्धापकाळामुळें अशक्तपणा येत चालला, तेणेंकरून त्यास तो एकान्तवास फार दुःसह झाला. एके दिवशीं **रामचरणलाल** भोजन करून झोपाळ्यावर विडा खात बसला होता, तों इतक्यांत डांकेंतून आलेलें एक पत्र शिपायानें आणून त्याच्या हवालीं केलें, तें फोडून वाचूं लागला; तें पत्र येणेंप्रमाणेः—

" आमचे आवडते काकासाहेब ! इतःपर आम्हांस

आपल्यावांचून इतर कोणाचा आधार राहिला नाहीं. याकरितां आमचे आईबापांनीं व त्यांच्यामागें आह्मीं आपणाशीं कोणतेही रीतीनें संबंध ठेविला नाहीं; या गोष्टीचा आपल्या मनांत राग असल्यास तो सर्व एकीकडे ठेवावा, आणि याप्रसंगीं आह्मां दीनांवर दया करून आमचा स्वीकार करावा. आपले बंधु **बिहारीलाल** हे कांहीं वर्षांपूर्वी पोटाचे पाठीस लागून **मंगळुरास** आले, आणि एथें राहिले; परंतु, एथील हवा आमचे आईचे प्रकृतीस मानवली नाहीं, यामुळें आह्मी लहान लहान असतांच ती आह्मांस सोडून परलोकास गेली, आणि तिचे वियोगदुः-खामुळें बाबाही लवकरच दुखण्यास पडून दहा वर्षांचे आंत मरण पावले. याप्रमाणें आमचे आईबापांची अवस्था झाल्यावर आह्मी दोघी बहिणी **केसर** आणि **कृष्णा** अगदीं अनाथ झालों. ही आमची अवस्था पाहून बाबाच्या मित्रमंडळीनें कांहीं दिवस आमचा बराच समाचार घेतला, आणि पुढें मी एका कुलीन गृहस्थाशीं लग्नही केलें, तेणेंकरून आमचा उभयतांचा निर्वाह आजपर्यंत चालला; परंतु, **परमेश्वरास** तेंही आवडलें नाहीं; यामुळें मज दीनावर वैधव्याचा घाला पडला, आणि आह्मी दोघी बहिणी व माझा धाकटा मुलगा **चिमणलाल**—अशीं तिघेंही पुनः एक वेळ उघडीं पडलों. याप्रमाणें ईश्वराचे मनांत आह्मी सर्व प्रकारें दुःखी असावें असें असतां, आह्मांस सुख कोठून होणार !

"बाबाचे मरणसमयीं आह्मांस त्याचे मित्रमंडळीचा आधार होता, तोही आतां नाहींसा झाला; कारण, माझें लग्न झाल्यावर आह्मी पहिल्यानें राहत होतों ती जागा

सोडून दुसरें गांवीं राहावयास गेलों, आणि बाबाचे वेळची स्नेहीमंडळी होती, ती--कोणी मेली, व कोणी आपले स्वदेशीं निघून गेली. अशी व्यवस्था झाली आहे; तर आतां आह्मी आपलें दुःख कोणाजवळ सांगावें! व तें ऐकून आपल्याखेरीज कोणाचे मनांत आह्मांविषयीं दया येणार आहे! काकासाहेब, आह्मांपाशीं जें वस्त्रपात्र व इतर सामान हल्लीं आहे, तें थोडक्याच दिवसांनीं कर्जदार लोकांचे घरीं गेलें ह्मणजे आह्मांस या जीवाचा कंटाळा येईल; याजकरितां कृपा करून आतां आह्मांस आपले पदरांत घ्या, आणि या दरिद्राचे हातून सोडवून एक वेळ स्वदेश दाखवा. आपले वृद्धापकाळांत आह्मी जवळ राहून आपली चाकरी करूं, आणि आपले आज्ञेबाहेर पाऊलही टाकणार नाहीं.

"काकासाहेब! बाबा आपली मर्जी मोडून आईस घेऊन इकडे आले त्याचा राग आपले मनांत असेल, तो आह्मां अनाथांस बाधक होणार नाहीं, अशी आशा धरून आह्मीं हें पत्र लिहिलें आहे. तर, आतां तुमच्या उभयतां कन्या देशांतरी घोर संकटांत आहेत, हें मनांत आणून त्यांस एक वेळ आपले चरण दाखवावे."

**रामचरणलाल** हें पत्र वाचीत असतां, त्याच्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या; आणि आतां थोडेच दिवसांत माझ्या दोघी मुली मजजवळ आल्या ह्मणजे हा माझा एकान्तवास लवकरच सुटेल, असें त्यास वाटून त्याच्या मनाचें थोडेंसें समाधान झालें. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं **रामचरणलाल** यानें खालीं लिहिल्याप्रमाणें एक पत्र तयार करून डाकमार्गानें **मंगळुरास** पाठविलें.

"माझ्या आवडत्या मुलींनो, तुमचे पत्र मला काल सायंकाळीं पोंचलें. तें वाचीत असतां प्रथम फारच दुःख वाटून माझ्या नेत्रांतून अश्रु आले. परंतु तुह्मी उभयतां मजपाशीं येऊन माझ्या वृद्धापकाळांत मला सुख देणार, हें मनांत येतांच माझे दुःखाश्रु आणि आनंदाश्रु एकजागीं मिसळले, आणि तुमच्या चुलतीचें मरणापासून आजपर्यंत झालेलें सर्व दुःख मी अगदीं विसरून जाऊन, माझा एकुलता एक पुत्र **सेवकलाल** यास मी आपले घरांतून हांकून दिल्याविषयींही मला अगदीं पश्चाताप वाटेनासा झाला. असो. आतां हें पत्र पावतांच तुह्मी, हल्लीं एक हजार रुपयांची हुंडी पाठविली आहे तिचा ऐवज घ्यावा, आणि प्रथम इकडे येण्यास जी आगबोट निघेल—तींत तिघांनींही निघून यावें. तुह्मी येथें येऊन पोहोंचां-तोंपर्यंत मला एक एक दिवस एक एक वर्षाप्रमाणें जाईल; हें लक्षांत ठेवून होईल तितकी त्वरा करा. तुमचा प्रवास सुगम व्हावा यासाठीं मी रात्रंदिवस परमेश्वराची प्रार्थना करित आहें."

इकडे **मंगळुरास कृष्णा** आणि **केसरबाई** या उभयतांस आपले काकांनीं स्वदेशीं येण्याविषयीं प्रीतिपूर्वक पत्र पाठविलें हें पाहून अतिशय आनंद झाला, आणि त्यांनीं पत्राबरोबर आलेल्या हुंडीचा ऐवज लागलाच आणवून, त्या, **हैदराबादेस** येण्यासाठीं जाहाजांत बसून, कांहीं दिवसांनीं **सिंध** प्रान्तांत येऊन पोहोंचल्या. दुसरे दिवशीं आपले चुलत्याचे गांवीं जाण्याकरितां तेथून गाडी करून निघाल्या. परंतु ईश्वरेच्छा जशी असते तशा गोष्टी घडल्यावांचून राहत नाहींत; ह्या न्यायानें त्या उभयतां बहिणी व धाकटा **चिमणलाल** असे त्रिवर्ग गाडींत बसून

जात असतां संध्याकाळचे सुमारास आकस्मात् अतिशय वारा सुटून धुळीनें दिशा धुंद झाल्या; व घोड्यास रस्ता दिसेनासा झाला; व गाडीवानानें दांडगाईनें तशीच गाडी चालविली, तेणेंकरून **हैदराबादचे** आलीकडे पांच कोसांवर ती गाडी झाडास अडकून मोडून पडली, यामुळें त्या गरीब विचाऱ्या मुलींस त्या रात्रीं काकास भेटण्याची इच्छा होती, ती पूर्ण न होतां, जवळच एक पांथस्थ लोकांस उतरण्याची धर्मशाळा होती, तेथें जाऊन राहावें लागलें. असें झाल्यावर दोन घटका रात्रीच्या सुमारास अभ्रें येऊं लागलीं; विजा कडकडूं लागल्या; एकाएकी मोठा पर्जन्य आला; तेणेंकरून धर्मशाळेतील सर्व मंडळीस महाप्रळयाची वेळ आली असें वाटलें. त्या दिवशीं पुष्कळ श्रम झाले होते, यामुळें ह्या दोघी बहिणी लवकर भोजन आटोपून आपआपल्या आंथरुणावर जाऊन निजल्या; परंतु बाहेर तुफानाची गर्दी चालली होती, व **केसरबाईचा** मुलगा रडत होता, तेणेंकरून त्यांस निद्रा लवकर येईना, ह्मणून उभयतां बहिणी गोष्टी सांगूं लागल्या.

**केसरबाई** ( वडील बहीण )—**कृष्णा,** ऋणानुबंधाच्या गोष्टी अशा असतात. पहा बरें, आज सकाळीं आपण तेथून निघालों—तेव्हां आपणांस या भिकारी झोपड्यांत रात्र काढावी लागेल असें स्वप्नीं तरी होतें ? व काका आज आपणांस भेटणार नाहींत, असें तरी कोणास वाटलें होतें ? परंतु गाडी मोडावी, आणि आपण एथें घरापासून पांच कोसांवर अडकून पडावें, हा ईश्वरीसंकेत होय, तो कोठून चुकणार !

**कृष्णाबाई** ( धाकटी बहीण )— परंतु आका, तूं दुः-

खांत सुख इतकेंच मान कीं, गाडीचा चुराडा होऊन घोडेही दुखावले, व हांकणारासही बरेंच लागलें आहे, असें असून आपल्या तिघांचे केंसास धक्का लागला नाहीं. गाडीस जेव्हां झाडाची धडक बसली, तेव्हां माझा तर बाई जीवच उडून गेला; परंतु, ( मुलाकडे बोट दाखवून ) जेव्हां हें मेलें वांदर तुझ्याकडेवर उगीच चिकटून बसलेलें मी पाहिलें, तेव्हां माझी काळजी दूर झाली. पण ताई, तुझ्या डोळ्याचें पाणी कांगे खळत नाहीं. मला बाई तुझा हा रडका स्वभाव अगदीं आवडत नाहीं. आज एवढे दिवस आपण प्रवासांत काढले, आणि चार प्रहरांसाठीं इतकें श्रमी कशास झालें पाहिजे? आतां उजाडल्यावर आपण निघालों तरी नऊ वाजायाचे आंत घरीं जाऊन पोहोंचूं.

**केसर०**—तूं सांगतेस ह्या सर्व गोष्टी मला समजत नाहींत असें नाहीं; परंतु बाई माझ्या जिवास सकाळपासून चैन कशी ती ठाऊकच नाहीं. वास्तविक पाहिलें असतां, काकासाहेबांनीं आतां आपणांस कोणतीही काळजी ठेविली नाहीं, व माझ्या धाकट्यास ते आपले मांडीवरही घेणार आहेत; परंतु, माझ्या कपाळीं दुःखच लिहिलें असलें तर मला सुख कोठून होणार आहे!

( हें ऐकून, **कृष्णाबाई** मोठ्यानें हांसून आपले बहिणीचे मनाची उद्विग्नता दूर करण्यासाठीं विनोदाचीं भाषणें करूं लागली. )

**कृष्णा०**—( मुलास मांडीवर घेऊन त्याचा मुका घेते. ) या लबाडानें माझें सर्वस्वीं नुकसान केलें; हा जर नसता तर काकाच्या संपत्तीच्या लोभानें कोणी तरी चांगले

मनुष्यानें मजशीं लग्न केलें असतें, आणि काकाचे माल-मिळकतीचा उपभोग घेतला असता. **चिमण्या**, तूं माझे-च पोटीं कां नाहीं आलास ? ( हें बोलणें धर्मशाळेच्या बाईनें ऐकिलें. ) अरे लबाडा, माझे तोंडाकडे पाहून हांसायाला कशास पाहिजे ? कोणी ह्मणेल कीं, मी काय बोलल्यें तें यास समजलेंच. आतां पहा, गुलाम कसा कान देऊन ऐकतो आहे. मांडीवर घेऊन गोष्टी सांगितल्या ह्मणजे गोड आणि भुयींवर ठेविला ह्मणजे कांटे रुततात. सारा वेळ कोणी मांडीवर घेऊन बसावें; माझे केंस ओढूं नको बाबा, नाहीं तर मी अशी ठोकीन.

**केसर०**—मग देवाजवळ मावशी मागावी ती कशासाठीं!

**कृष्णा०**—हो, तर; मावशी झाल्यें ह्मणून काय झालें. केंस ओढले ह्मणजे दुखत नसतील वाटतें. कायगे बाई, मेलें खेळगड पोर आहे हें! आतां रात्रींचें गुपचिप् निजा-वें, तें एकीकडे राहून माझे पदराशीं खेळतो आहे. नीज उगीच, मी थोपट्यें तुला.

**केसर०**—निज आतां. **कृष्णाताई** तूं ही नीज; आ-गाई, आपण सगळींच निजूं आतां; हे पहा, दहा वाजता-त; आपणांस मोठे पाहाटेस उठलें पाहिजे. दे त्याला इकडे, मी आंगावर घेत्यें, ह्मणजे पितां पितां निजेल.

याप्रमाणें संवाद झाल्यावर सर्व मंडळी निजली, आ-आणि जिकडे तिकडे सामसूम झालें; परंतु, बाहेर पर्ज-न्याच्या सरी एकामागून एक येत आहेत व वारा अधिक घोंगावत आहे, आणि जिकडे तिकडे निबिड अंधार पडला आहे; इतक्यांत बारांवर एक वाजायाचे सुमा-रास आकस्मात् मोठ्यानें किंकाळ्या ऐकूं येऊं लागल्या,

तेव्हां धर्मशाळेंतील माणसें जागीं होऊन, उभयता मुली निजल्या होत्या तेथें जाऊन पाहतात तों घोर अनर्थ वर्तला आहे!! खोलीचा दरवाजा अगदीं उघडा असून, **केसरबाई** बेशुद्ध होऊन दरवाज्यामध्यें पालथी पड-ली आहे; **कृष्णाबाई** आपले आंथरुणावर उठून बसली आहे, आणि घाबरल्यासारिखें इकडे तिकडे पाहत आहे; व आपले हात, तोंड आणि पांघरूणें रक्तानें भरलीं आहेत, ह्याची तिला अगदीं माहिती नाहीं! हें पाहून, धर्मशाळेच्या बाईनें धांवारे धांवा, घात झाला! असें ह्म-णून मोठ्यानें आरोळी मारिली, आणि तिच्या नवऱ्यानें धर्मशाळेंतील इतर वाटसरू लोकांस जवळ बोलाविलें; तेव्हां त्यांजबरोबर **काळूजी** ह्मणून एक वाटसरू ( अप-रात्रीं येऊन ) ओटीवर उतरला होता, तोही पुढें आला, व बोलूं लागला.

**काळूजी**—अरे देवा! कायहो गडबड आहे ती.

**धर्मशाळेची बाई**—एथें कोणाचा तरी प्राण घात झा-लासा दिसतो. अगे बाई! माझे तर हातपाय मोडले, ( असें ह्मणून खालीं बसते.)

**धर्मशा० मालक**—अहो! पण या उभयतां मुलींबरो-बर एक लहान मूल होतें तें कोठें आहे?

**काळूजी**—एथें तर कोठें मूल दिसत नाहीं. मूल होतें असें आपल्यास पक्कें स्मरण आहेना?

इतक्यांत धर्मशाळेच्या-बाईनें **कृष्णाबाईचे** उशाशीं भिंतीजवळ **केसरबाईचें** अनाथ बालक मेलेलें पडलें होतें तें उचलून घेतलें, आणि पाहिलें तों त्याचे काळजांत एक सुरी भोंसकली आहे, व त्या जखमेंतून रक्तस्राव होत आहे;

तेव्हां सर्वांचे नेत्रांतून अश्रुधारा चालल्या, आणि **कृष्णाबाईचे** हात, तोंड आणि वस्त्रें रक्तानें भरलेलीं पाहून, हें सारें कृत्य तिनेंच केलें असेल, असें त्यांस वाटलें.

**धर्मशा० बाई– केसरबाई,** आपणावर असा प्रसंग, आणि आह्मी चहूंकडून चौघांनीं आपणास कसें झालें, काय झालें, असे प्रश्न विचारून बेजार केलें तर आपणास तें चांगलें वाटणार नाहीं खरें, परंतु मी आपणास इतकेंच विचारितें कीं, आपण आपला बिछाना सोडून एथें दारांत येऊन कशा पडलांत?

**केसर०**–(मुलाचें प्रेत पुढें घेऊन त्याचे तोंडावरून हात फिरविते, आणि मोठा आक्रोश करून रडते!! धर्मशाळेचे बाईच्या बोलण्याकडे अगदीं लक्ष देत नाहीं.) अरे माझ्या धाकल्या! तूं मला सोडून कसारे गेलास, आणि मला हतभागिणीला एथें रानांत कशीरे सोडलीस! माझे जिवास काल संध्याकाळपासूनच स्वस्थता नाहीं, आणि हें घोर संकट प्राप्त होण्याचे पूर्वींच त्याचीं चिन्हें दिसत होतीं! परवां आह्मी जाहाजांतून उतरतांच आमचा सामानाचा पेटारा कोणी मेल्यानें चोरून नेला, आणि माझ्या**चिमण्याचे** गळ्यांतील गांठलेंही नाहींसें झालें; त्यावेळेसच मला अपशकून झालासा वाटला. परंतु काल सायंकाळीं गाडी मोडली, आणि आह्मांस एथें राहावें लागलें, तेव्हां इतक्यावरच गेलें असें समजून स्वस्थ होतें. परंतु, अरे देवा! याखेरीज दुसरें कोणतेंही संकट प्राप्त झालें असतें, तरी मला तें सहन करण्यास जड पडलें नसतें; आतां मी काय करूं, आणि आईबाप व इतर आप्तमंडळीचे जागीं मला माझा धाकटा होता तोही गेला, आतां

मी या जगांत माझा माझा असें कोणास ह्मणूं! थांबा, मला वाटतें मी स्वप्नांत आहें, आणि हें दुष्ट स्वप्न पडल्यामुळें मी वेडी उगीच आक्रोश करित आहें; इतःपर माझ्या लाडक्याचें आयुष्य दुप्पट झालें, असें ह्मणण्यास चिंता नाहीं. ( असें बोलून डोळे चोळून, मग चांगली जागी झाल्यें, असें तिला वाटल्यावर मांडीवरील बालकाचें प्रेत कडेवर घेते आणि त्याच्या आंगावरून हात फिरविते, तों हात रक्तानें भरतात, आणि बालकाचे पोटांत खुपसलेली सुरी तिचे हातास लागते, ती पाहून पुनः बेशुद्ध होऊन भूमीवर पडते. )

**काळूजी**—अरे देवा! मी पुरुष असून माझें अंतःकरण देखील या बिचाऱ्या गरीब मुलीचें दुःख पाहून अतिशय कळवळतें; मग ती आपल्या प्रत्यक्ष पुत्राचा शोक इतका करिते यांत आश्चर्य काय! लोकांत ह्मण आहेना, कीं स्त्रियांसारिखें धारिष्ट पुरुषास नाहीं, याचा प्रत्यय हा एथेंच पहा. ती पलीकडे आंथरुणावर पेंगत बसलेली बाई या मुलाची प्रत्यक्ष मावशी असून तिनें आपल्या हातानें आपले भाच्यास परलोकास पाठविलें; आणि आतां झोंपेंत असल्याचें मिष करून इतक्या गडबडींत देखील सावध होत नाहीं. अगे मुली, ऊठ आतां, पुरे झाली तुझी झोंप; ही झोंप नव्हे, ही मला तर काळझोंप दिसते. ( असें ह्मणून **कृष्णाबाईस** पायानें हालविता. ) आपलेच हातानें आपण त्या लहानग्या सोन्यासारख्या लेंकराचा प्राण घेऊन आतां डुलकी घेत बसली आहे. ( **कृष्णाबाई**, 'प्राण घेऊन' हे शब्द ऐकतांच सावध होऊन उभी राहिली. )

**कृष्णाबाई**—( घाबरून) ताई, कायगे झालें हें! आणि

तूं या **चिमण्याला** रात्रीचा भलत्याच वेळेस लोकांस दाखवीत बसली आहेस. अगे, माझ्या अंगावर हें रक्त कशाचें लागलें आहे? हाय! हाय! अरे देवा, काय झालें हें!! (असें ह्मणून मोठ्यानें रडते.)

**काळूजी**—वाहावा! सोंग आणतां येईल पण बतावणी करणें कठीण आहे. ही विद्या एथें पुरी वसत आहे असें दिसतें.

**ध०शा०बाई**—( **कृष्णाबाईस** ) मुली, त्या कोंवळ्या मासाच्या गोळ्यावर तुझा हात तरी कसा वाहिला गे? तुमचें उभयतांचें भाषण रात्रीं चाललें होतें, तेव्हांच माझे मनांत आलें कीं, तूं कधींना कधीं तरी आपले वडील बहिणीचे उपकार फेडशील; तें पहा लागलेंच अनुभवास आलें बाई! आलीकडच्या मुली अशाच; एक का दोन ह्मणाव्या; अशा गोष्टी नेहमीं आठ दिवशीं पंधरा दिवशीं घडत असतात. माझ्या तर बाई पायाखालीं वागुरडा चिरडला तरी माझे डोळ्यास पाणी आल्यावांचून राहत नाहीं; आणि पाहिजे तर त्यानां ( नवऱ्यास ) विचारा कीं, मी कधीं आज छत्तीस वर्षांत त्यांचे घरीं आल्यापासून काठीनें मांजर तरी मारिलें आहे काय?

**केसर०**—(पुनः शुद्धीवर येते, आणि पुत्राचें प्रेत पोटाशीं धरून त्याचे मुके घेऊं लागते, तेणेंकरून तिचें अंग रक्तानें भरतें.) अरे माझ्या आवडत्या! आतां ही तुझ्या पोटांतलीच सुरी काढून मीं आपल्या पोटांत भोसकून घेत्यें, आणि जो जीव त्यांचेमागें (नवऱ्याचे मागें) तुझें संरक्षण करण्यासाठीं आजपर्यंत संभाळून ठेविला होता, तो तूं ज्या मार्गानें गेलास त्या मार्गानेंच धाडित्यें. ( असें

ह्मणून, बोलण्याप्रमाणें करणार, तों इतक्यांत **कृष्णाबाईनें** तिच्या हातची सुरी हिसकावून घेतली, आणि पाहते तों, **मंगळुराहून** निघतानां तेथें बाजारांत जी सुरी तिनें विकत घेतली होती तीच ही, असें पाहून ती घाबरून मूर्छित होते, व ही सुरी देखील माझीच असावीना? असें ह्मणून (भूमीवर बेशुद्ध होऊन पडते.)

**काळूजी**–(ध॰शा॰ बाईस) बाईसाहेब ऐकिलेंतना, ही सुरी देखील **कृष्णाबाईचीच** आहे; आतां कांहीं संशय राहिला आहे?

**केसर॰**–( ऊर बडवून घेते ) अरे बाबानों! माझ्या बिचाऱ्या **कृष्णाबाईचा** संशय कशासाठीं घेतां? तिच्या मनांत तशी दुर्बुद्धि असती, तर तिनें जाहाजांत होतों तेव्हांच त्यास समुद्रांत टाकिला असता; किंवा माझे दुखण्यांत तो नेहमीं तिजपाशीं असे, तेव्हा तिनें त्याचें काय पाहिजे तें केलें असतें; परंतु, माझी **कृष्णा** असें कधीं करणार नाहीं. ती नसती तर माझा **चिमण्या** आजपर्यंत वांचलाच नसता. अरे देवा! काय करूं! आतां मला कांहीं सुचत नाहीं, आणि माझ्या कोणत्या अपराधाची तूं मला शिक्षा दिलीस, हेंही मला समजत नाहीं. **कृष्णा**! तूं तरी ऊठ आतां, आणि झालेलें वर्तमान घरीं जाऊन काकास निवेदन कर, ह्मणजे झाले. मजविषयीं ह्मणशील, तर इतःपर जेथें माझा **चिमण्या** तेथें मी. याला एथें ठेवून, मला एक पाऊल तरी पुढें टाकवेल बरें? अरे **परमेश्वरा**! मला आतां मरणाखेरीज दुसऱ्या कोणत्याही गोष्टीपासून सुख व्हावयाचें नाहीं. ज्या मेल्यानें या अनाथाचा घात केला, आणि माझ्या जिवास नसता घोर लावून दिला, त्याचें पारिपत्य

तूं करणार तेव्हां कर, परंतु मला आतां हें असलें काळें तोंड घेऊन काकाकडे जाणें नको ! !

**घ०शा०बाई– केसरबाई,** तुह्मास या गोष्टीविषयीं कोणाचा संशय येतो, तें कृपा करून सांगाल तर आमच्या सर्वांच्या जिवास समाधान वाटेल. आतां शोक केल्यानें गेलेली गोष्ट परत येते असें नाहीं.

**केसर०**—मी बाई काय सांगूं! तें सांगायास जात्यें आणि माझा ऊर भरून येतो, तेणेंकरून एकही शद्ब माझे तोंडांतून निघेनासा होतो. पहाटेस उठून आपले गांवीं जाण्याचा नाद मला अवशीपासून लागला होता, त्यामुळें मला चांगली झोंपही आली नाहीं. मध्यान्हरात्रीचे सुमारास मी जागी होऊन किती वाजले, याचा विचार करूं लागल्यें, तों तुमच्या थोरल्या घड्याळांत एकाचा ठोका पडला, आणि इकडे माझ्या तान्ह्यानें आकस्मात् मोठी आरोळी मारून तडफडल्यासारखें केलें; त्यावरून मी घाईघाईनें उठून खोलीचा दरवाजा उघडून पाहत्यें, तों दाराचे बाहेरील डावे बाजूचे भिंतीवर ओटीवरील कंदिलाचा उजेड पडून त्यावर एका मनुष्याची छाया पडली आहे, असें माझ्या दृष्टीस पडलें. परंतु तो मनुष्य भिंतीवर छाया न पडावी या हेतूनें ओणव्यानें चलला होता, व त्याची छाया त्याचे शरीरापेक्षां दसपट मोठी पडली होती, यामुळें आतां तो मला ओळखता येत नाहीं. परंतु, जर तशी छाया पुनः भिंतीवर पडेल, तर ती खचित् ओळखीन; कारण, तीं पुढें आलेलीं झुलपें, तें चमत्कारिक तऱ्हेचें नाक, आणि तें भयंकर रूप, माझ्या डोक्यांत पक्कें भरलें आहे, यामुळें मला त्याचा कधीं विसर पडावयाचा नाहीं. त्या छायेच्या स्वरूपावरून मी इतकी भ्याल्यें कीं, मला लाग-

लीच मूर्छा आली व मी पडल्यें; यावरूनच पहा कीं, जर तो मनुष्य मी प्रत्यक्ष पाहिला असता, तर माझी काय अवस्था झाली असती कोण जाणे! बाई, मी तुह्मास खचित् सांगयें कीं, ती लांब नाकाची अतिशय भयंकर छाया आपण पाहिली असती, तर आपलीही अवस्था मजसारखीच झाली असती.

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं **रामचरणलाल** यास ही खबर कळतांच, त्यानें आपल्या उभयतां पुतण्यांस घरीं नेलें; आणि त्या दिवसापासून त्यांची प्रकृति इतकी बिघडली कीं, ह्या दुखण्यांतून त्या उठतील अशी आशा कोणास नव्हती. असो. याप्रमाणें वर्तमान झाल्यावर हा खुनाचा खटला सरकारास समजल्यावरून, त्या जिल्ह्यांतील पोलीस अम्मलदार हे वादी होऊन, तेथील न्यायाधिशाकडे या खटल्याची चौकशी चालली. प्रतिवादी **कृष्णाबाई** हिच्यावर या गुन्ह्याची पुरी शाबिती होण्याजोगे पुरावे होते, हें लोकांस माहीत असल्यामुळें त्या प्रान्तांतील कोणी वकीललोक तिचें वकीलपत्र घेत ना. शेवटीं, **भीमराव** ह्मणून एक गृहस्थ होता, त्यानें **रामचरणलाल** याचे मुरवतीनें त्या कामांत हात घातला. आणि नेमलेले तारिखेस न्यायसभेंत आपले यजमानाचे तरफेनें बोलण्याचें कबूल केलें. **भीमराव** यांची अशी चाल असे कीं, प्रथम, खटल्यांतील सर्व मंडळी आपले समोर बोलावून त्यांची हकीकत त्यांचेच तोंडांनीं ऐकून घ्यावी, आणि तींतील खरेखोटेपणाविषयीं जशी आपली खातरी होईल, त्याप्रमाणें वकीलपत्र घ्यावें. यामुळें त्यास लोकांचे चेहऱ्यावरून आणि बोलण्यावरूनच कोण मनुष्य

किती किंमतीचा आहे हें समजत असे; आणि बहुतकरून ते खराच पक्ष असेल तो स्वीकारित असत. **रामचरण-लाल** यानें त्यांजकडे **कृष्णाबाईची** वकिली सोंपविल्यावर त्यानीं उभयतां बहिणींस सर्व हकिकत विचारिली; त्यावरून त्यांची खातरी झाली कीं, हा खून करणारा, **कृष्णाबाई-**खेरीज दुसरा कोणी मनुष्य असावा; परंतु **कृष्णाबाईच्या** विरुद्ध पक्षाचा पुरावा सबळ असून तिच्या बचावास उपयोगीं पडण्याजोगीं साधनें अगदींच न सांपडल्यामुळें, त्यांस रात्रंदिवस मोठी काळजी लागून, या खटल्याखेरीज त्यांस दुसरें कांहीं सुचेना, असें झाले होतें.

**रामचरण०**–वकीलसाहेब, आपण रात्रंदिवस हाच विचार करीत बसलां, तर आपलें मस्तक फिरून जाईल, आणि जें कृत्य हातीं घेतलें आहे, तें शेवटास नेण्याची वेळ येईल तेव्हां आपणांस कांहीं सुचेनासें होईल; याकरितां **परमेश्वरावर** हवाला ठेऊन, प्रसंगीं तो अनाथाचा घात होऊं देणार नाहीं, असें मनांत आणा, आणि स्वस्थ असा. फार विचार केल्यानें मनुष्याचे मनास श्रम होतात, आणि आयते वेळेस बुद्धीस मांद्य येतें.

**कृष्णा०**–( अतिशय दुःखी होऊन ) **भीमराव** ! जर माझा **चिमण्या** माझे मरणानें जिवंत होता, तर मी खुषीनें आपले जिवावरही उदार झाल्यें असत्यें; परंतु तसें न होतां, उगीच न्याय करण्याचे मिषानें, सरकार मज दीनाचा वध करील, याचें मला फार दुःख वाटतें, तें आपणास काय सांगूं ! काकाचे म्हातारपणीं माझे हातून त्यांची सेवाचाकरी व्हावी तीस मी अंतरेन, आणि ताईस आधींच पुत्रशोकामुळें रात्रंदिवस चैन पडत नाहीं; तशांत माझी-

ही अशी अवस्था झाली, तर ती अगदींच वेडी होईल. असें न व्हावें, हे दोन हेतु माझे मनांत आहेत, ते आपण सिद्धीस न्यावे. मी पुनः आपणास एक वेळ खातरी होण्यासाठीं शपथपूर्वक सांगत्यें कीं, माझा **चिमण** मला कोणत्याही कारणानें जड झाला नव्हता, आणि त्याचा घात माझे हातून झाला नाहीं.

**वकील**– बाईसाहेब ! त्या बालकाचा प्राणघात खुद्द आपले सुरीनें झाला असें ह्मणतात, आणि आपणही ती गोष्ट कबूल करिता, हें कसें ?

**केसर०**–तें तिला विचारूं नका, मला विचारा. मी सांगत्यें; आह्मी **मंगळुराहून** आलों, तेव्हां त्या पेटाऱ्यांत ही सुरी होती असें मला पक्कें स्मरण आहे; आतां तुह्मी कल्पना बसवून घ्या कशी पाहिजे तशी. अहो ! ज्या **कृष्णास** आईच्या मागें मीच लहानाची मोठी केली, आणि जिनें माझे दुखण्यांत माझे धाकट्यास ( डोळ्यांस पाणी आणून ) औषधें तर घातलीं, रात्रंदिवस खांद्यावर घेऊन तर फिरविलें, आणि मजपेक्षांही जास्त जपली, तिचे हातून हें कृत्य कसें घडेल बरें ! तिनें जन्मांत कधीं मांजरावर किंवा कुतऱ्यावर देखील काठी टाकिली नाहीं. आपण एवढी खातरी बाळगा कीं, ज्या मेल्याची सावली त्या दिवशीं रात्रीं माझ्या दृष्टीस पडली, त्याशिवाय दुसऱ्याचे हातून हें कृत्य झालें नाहीं.

**वकील**– बरें, पुढें जेव्हां तुह्मीं सर्व मंडळी जागी झालां आणि तुमच्याभोंवतीं घरांतील सर्व माणसें जमलीं, तेव्हां त्यांत पुरूष किती होते हें तुमच्या लक्षांत आहे ?

**केसर०**–**भीमराव**, त्या वेळेस जवळ पुरूष कोण होते

व काय होतें, हें पाहण्याची का वेळ होती ! मला माझा जीव नकोसा झाला होता; पण **कृष्णाचें** ध्यानांत असलें तर कोण जाणें. कायगे **कृष्णाबाई**, तुला ठाऊक आहे कोण कोण पुरुष होते ते ?

**कृष्णा०**—एक धर्मशाळेचा मालक आणि दुसरा तो मेला चाहाटाळ **काळूजी**; त्यानें तर मला बोलबोलून हैराण केलें, आणि मेला दिसत असे कसा भामट्यासारखा. इतर सर्व मंडळीच्या डोळ्याचें पाणी खळलें नाहीं, पण त्या दगडास इतका तरी द्रव आला होता का ! तो खुशाल मोठ्या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगत होता.

**वकील**—तर मग त्या राजेश्रींचें कृत्य असेल; बरें पाहूं या, आतां काय होतें तें. मी जातों आतां, मुलींनो, काळजी करूं नका बरें, खऱ्याचा **परमेश्वर** आहे, हें ध्यानांत ठेवा.

असें ह्मणून **भीमराव** आपल्या घरीं गेले, आणि त्यांनीं त्या दिवसापासून पारध्याचे कुत्रे सावजांमागें जसे काढितात, त्याप्रमाणें **काळूजीचा** शोध मोठ्या युक्तीनें लाविला, व तो कोणत्या चालीचा मनुष्य आहे, हें समजण्यासाठीं बारीक रीतीनें चौकशी चालविली, परंतु त्यापासून त्यांचे मनांतील उद्देश सिद्ध झाला नाहीं. **भीमरावानीं** या प्रकरणाविषयीं कित्येक वृद्धवृद्ध वकील लोकांचीही सल्ला घेतली, परंतु **कृष्णाबाईचा** निर्दोषीपणा सिद्ध होण्याजोगी कल्पना कोणास न सुचतां ज्या कल्पना निघाल्या, त्या, विरुद्ध पक्षाच्या उपयोगीं पडण्याजोग्या होत्या. कोणी ह्मणत, **केसरबाईनें** आपल्या बहिणीस बांचविण्यासाठीं छायेच्या वगैरे गोष्टी कल्पित रचिल्या

असतील, किंवा ती घाबऱ्याघाबऱ्यानें उठून बाहेर गेली तेव्हां कांहीं झोंपेंत व कांहीं जागी असेल, तेणेंकरून तिला छाया दृष्टीस पडल्याचा उगीच भास झाला असेल.—कोणी ह्मणत कीं, तिच्या मुलाची आरोळी ऐकून धर्मशाळेंतील कोणी मनुष्य तिचे खोलीकडे येत असेल, किंवा कोणी लघ्वीस बाहेर गेला असेल, त्यास परत येतांनां तिनें पाहिलें असेल. असे अनेक तर्क निघाले. सारांश, न्यायाधिशाचे कचेरींत खटला उभा राहीपर्यंत **कृष्णाबाईस** वांचविण्यास कोणास कांहींच उपाय सुचला नाहीं, परंतु त्या दिवशीं जे न्यायाधीश या प्रकरणाचे चौकशीस नेमले होते, त्यांचें चातुर्य व निःपक्षपातीपणा हीं **भीमरावांस** माहीत असल्यामुळें त्यांस मोठा संतोष झाला, व ते केवळ अविचारानें **कृष्णाबाईस** अपराधी ठरविणार नाहींत असा त्यांस भरंवसा आला. इकडे अकरा वाजायाचे सुमारास न्यायसभेंत वकील व इतर मंडळीची अतिशय दाटी झाली. सरकार—तर्फेचे वकील त्या दिवशीं **शिकारपुराहून** येणार होते तेही त्या संधीस येऊन पोहोंचले, आणि न्यायाधीश आपले सिंहासनावर येऊन बसले, तरी लोकांची गलबल चाललीच होती, यामुळें न्यायाचें काम सुरू होण्यास पुढें अर्धा तास लागला.

**कृष्णाबाईस** कैदीचे कठड्यांत आणून उभी केली, तेव्हां तिचें तारुण्य आणि दीन वदन पाहून पंचमंडळी व वकील लोक यांचीं अंतःकरणें सद्गदित झालीं, व न्यायाधिशाचें मुखही म्लान होऊन गेलें. **भीमराव** वकील हे, आतां काय बोलावें या विचारांत असतां, सरकारी वकिलांनीं त्यांजकडे एक लहानसा कागदाचा तुकडा को-

णास न कळतां फेंकिला, आणि त्यांत असें लिहून सुचविलें कीं, या खटल्यांतील **काळूजी** नांवाचा जो साक्षीदार होता, तो पोलिसाच्या ताब्यांतून पळून गेला आहे, याजकरितां ही गोष्ट तुमच्या पक्षाचे उपयोगी आहे, असें जाणून तुह्मास कळवितों. **भीमरावानीं** ही चिठ्ठी पाहतांच त्यांस अतिशय आनंद झाला; कारण, एक तर **कृष्णाबाईचा** निर्दोषीपणा खरा करण्यास हें एक नवीन साधन झालें, आणि दुसरें, सरकारतर्फी वकीलही **कृष्णाबाईची** मुक्तता होण्याविषयीं किती उत्सुक आहेत, हें समजलें. असो. याप्रमाणें कोडतांतील कामगार आपले ठिकाणीं बसले आहेत, आणि सर्वांच्या अंतःकरणाची एकाग्रता होऊन, पुढें काय होणार तिकडे सर्वांचें लक्ष लागलें आहे, इतक्यांत **केसरबाई** कोडतांत आली, आणि इकडे तिकडे न पाहतां आपली बहीण **कृष्णाबाई** जेथें उभी होती तेथें नीट जाऊन ह्मणाली, "**कृष्णा,** जशी तुझ्या निर्दोषीपणाविषयीं आमची खातरी आहे, तशीच **परमेश्वरानें** सर्व लोकांची करावी आणि तुला या संकटांतून बाहेर काढावें, हेंच माझें त्याजपाशीं मागणें आहे." **कृष्णाबाईनें** हे शब्द ऐकतांच तिचें दुःख तिला सावरेनासें झालें, आणि तिनें आपले बहिणीचे गळ्यास घट्ट मिठी मारून लहान लेंकराप्रमाणें रूदन करावयास आरंभ केला. न्यायाधिशांनीं हा सर्व प्रकार अवलोकन करून, त्यांचेंही अंतःकरण कळवळलें, परंतु, न्यायाचें काम चाललें पाहिजे, याजकरितां ते क्रोधाचा आविर्भाव आणून ह्मणाले, "अहो! ही न्यायसभा आहे, एथें गळ्यांत मिठ्या घालणें, रडणें, याचा उपयोग नाहीं; ज्या कामासाठीं आपण सर्व एथें जमलों आहों, तें

काम चालूं द्या." **केसरबाईनें** न्यायाधिशास राग आला असें पाहून, ती तेथें जवळच एक खुर्ची होती तिजवर बसली. मग न्यायाधिशाचे चिटणिसांनीं झालेली सर्व हकीकत कोडतास वाचून दाखविली, ती **कृष्णाबाईनें** लक्ष देऊन ऐकिली. तिला कधीं आपल्या स्वकीय मंडळीखेरीज दुसऱ्याशीं बोलण्याचा किंवा अनोळखीचे जागीं जाण्याचा अभ्यास नसल्यामुळें, भर कचेरींत कैदीच्या कठड्यांत उभें राहण्यापासून अतिशय दुःख झालें, आणि जशी एखादी नाजूक वेल मोठा वारा आला असतां हालूं लागते, त्याप्रमाणें त्या सभेच्या नेत्रवातेंकरून ती थरथरां कांपूं लागली. मित्रहो ! आधींच स्त्रीजात व तशांत आपले प्रत्यक्ष बहिणीचे बालकाचा वध केल्याचा आरोप आल्यामुळें, लोक चोहोंकडून—कैदी, कैदी, ह्मणूं लागल्यास कोणाची बरें अशी अवस्था होणार नाहीं ? चिटणिसांनीं वाचलेली सर्व हकीकत ऐकून तिचें हृदय द्विधा झालें; व माझे पायांखालील भूमि मला आपल्या पोटांत घेईल, किंवा ही इमारत माझे आंगावर कोसळून पडेल, तर बरें होईल असें तिला वाटलें; आणि तिचे नेत्रांतील अश्रुधारा, तिची बहीण जवळ बसली होती तिचे आंगावर पडूं लागल्या.

**सरकारीवकील**— कैदीस विचारिलें जातें कीं, **केसरबाईच्या** मुलाचा प्राण घेतल्याबद्दल अपराध कैदीचे हातून झाला आहे किंवा नाहीं ?

**कृष्णाबाईचें** अंतःकरण दुःखानें बहिरावलें होतें, यामुळें हा प्रश्न तिला ऐकूं आला नाहीं; परंतु **केसरबाईच्यानें** ह्याचा जबाब दिल्यावाचून राहवेना; तेव्हां तिनें आपल्या मधुर शब्दांनीं उत्तर दिलें.

**केसर०**—महाराज, तिनें कोणताही अपराध केला नाहीं. माझें एकुलतें एक बाळ आतां स्वर्गीं वास करीत आहे, आणि जर आपले आज्ञेनें तिला देहान्त शिक्षा झाली, तर मजपेक्षां ती आधीं जाऊन त्यास भेटेल, यांत तिला संतोषच आहे, तिजकडे कांहीं नाहीं, हें आपण पक्कें समजावें, आणि आह्मां दीनांस या दुःखांतून मुक्त करावें.

इतक्यांत, तुरुंगावरील कामदार **कृष्णाबाईचे** जवळ उभे होते, त्यांनीं हात धरून तिला हालविलें, आणि तिचे कानांत सांगितलें कीं, "मी हा अपराध केला नाहीं, खचित् केला नाहीं" असें ह्मण.

**कृष्णाबाई**—महाराज, मी निर्दोषी आहें, हें मी खचित् सांगत्यें. हें ऐकून सरकारी वकील उठून उभे राहिले, आणि त्यांनीं पूर्वीं झालेला सर्व वृत्तांत न्यायाधीश व पंच यांस निवेदन करून, कैदी **कृष्णाबाई** हिजवर आपले बहिणीचे पुत्राचा खून केल्याची शाबिती करण्यास प्रारंभ केला.

**सरकारीवकील**—१. प्रथम, ज्या धर्मशाळेंत या उभयतां बहिणी उतरल्या होत्या, तेथील राखणदाराचे स्त्रीनें, **कृष्णाबाईस** त्या रात्रीं असें बोलतानां ऐकिलें होतें कीं, 'या मुलानें माझें सर्वस्वी नुकसान केलें; हा जर नसता, तर मी काकाची कृपा संपादन करून, त्याचेमागें त्याच्या सर्व संपत्तीची मालकीण झाल्यें असत्यें.' त्या बाईचे ह्मणण्यांत कैदी **कृष्णाबाई**, हेच शब्द बोलली असें नाहीं परंतु अशा मजकुराचें उभयतां बहिणींचें कांहीं बोलणें चाललें होतें, तें मी ऐकिलें. २. त्या दीन आणि अज्ञान बालकाचे पोटांत जी सुरी भोंकसलेली होती, ती तिनें **मंगळूर** ए-

थील बाजारांत विकत घेतली होती, असें तिनें आपल्या तोंडानेंच कबूल केलें आहे. महाराज, याखेरीज मजला दुसरें कांहीं बोलावयाचें नाहीं, कारण, या प्रकरणांत इतर खटल्याप्रमाणें युक्तिप्रयुक्तीनें,झालेल्या गुन्ह्याची शाबिती करण्याचा माझा उद्देश नसून, केवळ झालेली हकीकत आपणांस कळवावी, आणि **परमेश्वरानें** आपले मनांत प्रेरणा करून, आपण खरा अपराधी असेल त्यास शिक्षा करावी, हाच माझ्या मनांतील हेतु आहे. जर कदाचित्, हा अपराध कैदी **कृष्णाबाईचे** आंगीं लागला, तर मावशीनें भाच्याचा प्राणघात केला, हें ऐकून जिकडे तिकडे लोकांचे आंगावर रोमांच उभे राहतील, आणि ती निर्दोषी ठरली, तर त्या गरीब बिचाऱ्या मुलीचा छळ झाला, असें मनांत आणून, सर्व मनुष्यमात्रास थोडेसें वाईट वाटेल. या सभेंतील न्याय करणाऱ्या आणि इतर मंडळीच्या मुखचर्येवरून मला उघड दिसतें कीं, सर्वांचे अंतःकरणांत कैदीविषयीं दया उत्पन्न झाली आहे, आणि तिचे हातून हें कृत्य झालें नसेल, अशी सर्वांची मनदेवता साक्ष देत आहे; परंतु आतां सर्वांस माझें विनयपूर्वक हेंच सांगणें आहे कीं,मी सांगितलेले पुरावे रद्द होऊन **केसरबाईच्या** मुलाचा वध कोणी केला, याचा ठिकाण लागला, म्हणजे त्यांत माझा संतोष आहे. जर मी बोलण्याचे घावडावानें, साक्षीदारास सूचक प्रश्न करण्यानें, अथवा नेत्र किंवा हस्तसंकेत करून या खटल्यास मजबुती आणण्याविषयीं यत्न केला असेल, तर **ईश्वर** मला दोषी ठरवो.

याप्रमाणें सरकारी वकील, इतर वकील लोकांसारिखें

पांडित्य न करितां, केवळ झालेली हकीकत कोडतास निवेदन करून आपले जागीं बसले.

**कृष्णाबाईचे** वकील **भीमराव** यानीं, सरकारी वकिलांनीं सांगितलेली हकीकत ऐकून त्यांस सखेदाश्चर्य वाटलें. कारण, ज्या धर्मशाळेंत हा प्रकार झाला, तेथील साक्षीदारांचें बोलणें रद्द करण्यास कांहीं साधनें नव्हतीं, आणि **काळूजीचे** साक्षीपासून जसें कांहीं तादृश नुकसान नव्हतें, तसेंच तो पळाल्यापासून उपयोगही दिसत नव्हता. **भीमराव** हे आधींच उदासीन झाले होते, आणि तशांत न्यायाधीश व पंचमंडळी हे एकमेकांचे कानांशीं लागत आहेत असें जेव्हां पाहिलें, तेव्हां त्यांची **कृष्णाबाईचे** मुक्ततेविषयीं अगदीं निराशा झाली.

**कृष्णाबाईचे** वकील कांहीं बोलत नाहींसें पाहून, सरकारी वकिलांनीं धर्मशाळेचा राखणदार **नानक** ह्मणून होता, त्यांस बोलावून आणून साक्षीदाराचे कठड्यांत उभा केला, हें पाहून **भीमरावानीं नानक** यास कांहीं प्रश्न केले.

**भीमराव**—ज्या रात्रीं हें प्रकरण झालें, त्या रात्रीं या उभयतां मुलींखेरीज दुसरे कोणी वाटसरू तुमच्या धर्मशाळेंत उतरले होते?

**नानक**—होय महाराज; **काळूजी** नांवाचा एकजण फार रात्रीचा येऊन उतरला होता.

**भीमराव**—फार रात्रीचा, ह्मणजे किती वाजतां? मध्यान्हरात्रीच्या पूर्वीं किंवा नंतर आला होता?

**नानक**—ह्या बाया आल्यावर चांगला एक प्रहरानें

**काळूजी** बोवा आला असेलसा वाटतो, आणि त्या वेळेस नुकतेच अकरा वाजले होते.

**भीमराव**—त्याची तुमची पूर्वी ओळख होती?

**नानक**—नाहीं महाराज; मी त्याला पूर्वी कधींही पाहिला नव्हता, काळा कीं गोरा तो.

**भीमराव**—तो कोठें निजला होता बरें, आणि या मुलींपासून तो किती दूर होता?

**नानक**—तो महाराज, बाहेरच्या अंगास ओटीवर निजला होता, आणि त्या बायांपासून चांगला दोन कासरे दूर होता.

**भीमराव**—तुह्मी आतां जा, परंतु गरज लागल्यास मी तुह्मास पुनः हाक मारीन.

**नानक**— बरें महाराज, मी आपला ताबेदार आहें. ( निघून जातो.)

यानंतर **नानकाचे** स्त्रीची जबानी झाली; तींतील तात्पर्य पूर्वी सरकारी वकिलांनीं सांगितलेंच आहे. **भीमरावांस**, त्या बाईचें बोलणें न्यायाधिशाच्या मनांत विशेष बिंबलेंसें वाटून त्यानीं तिला कांहीं प्रश्न केले.

**भीमराव**— बाई, आपण कधीं आपले यजमानाशीं विनोदाचीं भाषणें केलीं आहेत असें आपणास स्मरतें? समजलांनां काय ह्मटलें तें? तुमच्या आणि तुमच्या नवऱ्याच्या कधीं थट्टामस्कऱ्या चालतात कीं नाहीं?

**जमना**— अरे देवा! तें कशाला पुसावें, त्यावांचून तर एक दिवस जायाचा नाहीं.

**भीमराव**– परंतु तुह्मी उभयतां विनोदानें बोलतां, तें सगळें खरें असतें कीं काय ?

**जमना**– छे हो, त्यांत कसूचा खरेपणा आला आहे ! महाराज, मस्करी ती मस्करी, खरें तें खरें.

**भीमराव**– हो, तें नीटच आहे. परंतु, आलीकडे कधीं कांहीं अशा प्रकारचें त्यांचें बोलणें झालेलें तुमचे लक्षांत आहे ?

**जमना**– हो ह्मणजे, लांब कशाला परवांच ते मस्त्री गांजा पिऊन धुंद झाले होते, हें पाहून मी त्यांस ह्मटलें कीं, आतां आणखी एक दोन चिलमा ओढा ह्मणजे सुटलां एकदां त्या गांजाचे हातून; पण माझे मनांत त्यानीं गांजा पिऊन मरावें, असें खचित् नव्हतें.

**भीमराव**– वास्तविकच आहे, आणि विनोदाचें भाषण बोलणाराचे शब्दांवरूनच तो मनापासून किंवा मस्करीनें बोलतो आहे हें उघड दिसून येतें. तेच शब्द मस्करीनें बोलतां येतात, आणि खरेपणानेंही बोलतां येतात.

**जमना**– खरी गोष्ट सांगितलीत महाराज.

**भीमराव**– बरें तर आतां तुह्मी जा. हवालदार, आतां **काळूजी** नांवाचा साक्षीदार आहे त्यास हाक मारा.

**काळूजीचें** नांव निघतांच, जिकडे तिकडे **काळूजी**, **काळूजी** हाच ध्वनी उठला, आणि मौज पाहणारे लोक **काळूजीस** शोधूं लागले; परंतु ती स्वारी पूर्वींच पळून गेली होती, हें सरकारी वकिलांनीं **भीमराव** यांस सुचविलें होतें.

**सरकारीवकील**–**काळूजी** यास येण्यास वेळ लागेलसा दिसतो, याजकरितां आतां **केसरबाईची** साक्ष होऊं द्या.

( **भीमरावांच्या** नेत्रसंकेताकडे पाहून हळूच ह्मणाले ) आपला आशय मी समजलों, आणि **केसरबाईस** आमच्या तर्फेनें आपले बहिणीच्या विरुद्ध साक्ष देण्याचें मोठें संकट आहे, हेंही माझे लक्षांत आलें; परंतु त्यांची साक्ष झाली पाहिजे, याजकरितां त्यानीं कृपा आपली जबानी द्यावी. मी थोडक्यांतच आटपतों.

**केसरबाईस** हाक मारितांच ती खाली पाहत पाहत कचेरींत आली, आणि साक्षीदाराचे कठड्यांत उभी राहून **कृष्णाबाईकडे** अतिशय प्रेमानें पाहूं लागली; याजकरितां न्यायाधिशांस, तिला सांगणें प्राप्त झाले कीं, "साक्षीदार बाई, तुह्मी इकडे पहावें" **केसरबाईनें** हे शब्द ऐकून आपलें तोंड कचेरिकडे फिरविलें, तेव्हां तिचे नेत्रांतील अश्रुधारा पाहुन सर्वांचे अंतःकरणास द्रव आला.

**केसर०**— ( रडत रडत आणि स्फुंदस्फुंदून बोलते. ) महाराज, मजवर आधींच आकाश कोसळलें आहे, आणि तशांत हा प्रसंग मजवर आला हें मला सहन होत नाहीं! माझा एकुलता एक आवडता **चिमण** गेल्यामुळें माझे हृदयांत काय होत आहे, हें आपणास कोठून समजावयाचें आहे! कारण, माझें सर्व दुःख ( हृदयास हात लावून ) एथें सांठवलें आहे!!! आणि माझें काळीज उकलत चाललें आहे!! परंतु आतां माझी आपणांस हीच प्रार्थना आहे कीं, ज्या बालकाचे मरणानें माझा सर्वस्वीं घात झाला, त्याची मी प्रत्यक्ष आई आपणांस सांगत आहे कीं, हें कृत्य माझे **कृष्णाचे** हातून सर्वथा झालें नाहीं, याकरितां आपण माझे सांगण्यावर भरंवसा ठेवा. महाराज, मी आपणांस काय सांगूं! गेले रात्रीस त्याच वेळेस माझा धाकटा! माझा

आवडता! माझा **चिमण**!!! असो. आतां काय त्याचें: परंतु माझे हृदयांत तें दुःख मावत नाहीं; अरे **देवा**!! माझें डोळ्यांतील अश्रुधारांनीं माझे गाल पोळत आहेत! **परमेश्वर** मला मरण कां देईना, किंवा माझे मस्तकावर वीज कां फुडेना !!!

अरेरे! अशा तऱ्हेचा शोक जरी कोणी एखाद्या नाटकगृहांत केला असता, तरी त्यानें सर्व लोकांस रडवून सोडलें असतें, मग कोडतांतला हा खरा प्रकार पाहून सभेस दुःख होईल, यांत आश्चर्य तें काय? **केसरबाईचें** रुदन आणि हृदयस्फोट करणारा शोक पाहून, कचेरींत जिकडे तिकडे लोकांनीं डोळ्यांस हात लाविले, आणि न्यायाधिशांस गहिंवर येऊन त्यांनीं कपाळावर हात देऊन सुस्कारा टाकिला.

**सरकारीवकील**.–( **भीमरावांकडे** पाहून ) या बाईस मला कांहीं विचारावयाचें नाहीं.

**भीमराव**–तुह्मांस नाहीं, पण मला विचारावयाचें आहेना; ( **केसरबाईकडे** पाहून ) बाई, मला आपणास थोडी विनंती करावयाची आहे.

**भीमराव** यांचा शब्द अगदीं खोल गेला होता, तेणेंकरून जसा एखादा मनुष्य प्रथम पुष्कळ रडतो, आणि नंतर बोलायास लागतो त्याप्रमाणें भास झाला; कारण, त्यांच्या कोमल अंतःकरणास असें दुःख पाहण्याचा प्रसंग कधींच आला नव्हता.

**केसर**०–होय महाराज, आपणाशीं नाहीं तर कोणाशीं बोलावयाचें आहे; आपण सर्व मंडळीनों माझी सर्व हकीकत ऐकून घ्यावी. माझ्या मुलाचा प्राण ज्यानें घेतला,

तो मनुष्य जरी मी पाहिला नाहीं, तरी त्याची छाया भिंतीवर पडलेली होती-ती माझे मनांत पक्की भरून राहिली आहे, आणि ती पिशाच्यासारखी जिकडे तिकडे माझे डोळ्यासमोर उभी राहत असते, तेणेकरून माझे मनास एक क्षणभरही विश्रांती नाहीं. महाराज, गेले रात्रीं माझा **चिमण** माझे दृष्टीस पडला, तेव्हां मला तें त्यांचें गोंडस शरीर आणि तेजस्वी मुख पाहून फार संतोष झाला; व त्याचे चिमणे डोळे मी आपल्या पदरानें पुसून त्यास पोटाशीं धरिलें, तेव्हां त्यानें मला सांगितलें कीं, "आई जागेपणचा आणि स्वप्नांतील **ईश्वर** वेगळा नाहीं, हें तूं पक्कें समज, आणि मी सांगतों हें खरें मान. आतां मी फार आनंदांत असून **देवानें** मला एथें आणिल्यापासून मी स्वर्गसुख भोगित आहे." अरे देवा! आतां मला स्वप्नांत तरी ते कोंवळें कोंवळे शब्द ऐकूं येवोत, आणि मला तो एक वेळ बोबडे शब्दांनीं आई आई ह्मणून हाक मारो!! महाराज, जातांनां स्पष्ट सांगितलें कीं, "आई लोक काय ह्मणतील ते ह्मणोत, परंतु माझा प्राणघात मावशीचे हातून खचित् झाला नाहीं; तिला मात्र मजवांचून चैन पडत नसेल."

**कृष्णा०**—ताई, अगे ताई, ( रडत बोलते ) मला त्यावांचून कधींच चैन पडलें नाहीं, आणि मीगे कसा त्याचा प्राण घेईन! लोकांचे तोंडून असे शब्द निघतात तरी कसे!!

**भीमराव**—(**केसरबाईस**) बाई, आपले पुत्राचा वध करणाराची छाया कशी होती-तें विस्तारें करून सांगाल काय?

**केसर०**—ती रुंद आणि उंच छाया मनुष्याची असून पिशाच्यासारखी अजून माझे डोळ्यांपुढें दिसत आहे.

**न्यायाधीश**—बाई, तसें मोघम बोलणें कांहीं कामाचें नाहीं; त्या छायेचे अवयव कसे होते वगैरे सर्व सांगा.

**केसर०**—होय महाराज, तेंही सांगत्यें. अगे बाई! माझ्या उरांत तिकडे पाहून एकाएकी धसका बसला. ( घाबरून जाते आणि खालीं पाहूं लागते. )

**भीमराव**—बाई, भिऊं नका, एकाएकी अभ्रें येऊन अंधारी आली आहे इतकेंच.

इतक्यांत आकस्मात् अभ्रें येऊन कचेरींत अतिशय अंधार पडला, आणि वरचेवर विजा चमकून कडकडाट होऊं लागले, तेणेंकरून मनुष्यमात्राचे डोळे आणि कान अतिशय त्रास पावले; व कोडताची इमारत कोसळून आंगावर पडेल आणि एकदांच सर्वांचा नाश होईल, अशी सर्वांस भीति उत्पन्न होऊन कांहीं लोक आपआपले घरीं गेले; व कितीएक स्त्रिया भयानें घाबरून रडूं लागल्या. ही संधि पाहून कोणीएक मनुष्य एका कोपऱ्यांत दडून बसला होता, तो कोपरानें लोकांस पलिकडे सारून बाहेर जाऊं लागला; त्यास, मौज पाहणार मंडळीपैकीं एकानें ओळखून, "हाच **काळूजीरे** हाच **काळूजी, काळूजी** ह्मणतात ती हीच स्वारी" अशी आरोळी ठोकिली. **भीमरावानीं काळूजीचें** नांव ऐकतांच, त्वरा करून त्या मनुष्यास शिपायाकरवीं धरविला, आणि त्याची साक्ष घेण्याकरितां त्यास साक्षीदाराचे कठड्यांत उभा केला.

**काळूजी**—काय जुलूम हा, ( घाबरून ) अरे, मला रे गरिबाला कां धरितां? मी तुमचें काय केलें आहे? साक्ष द्यावयाची इतकेंच ना; मग त्यास धांवा धांवा आणि धराधरा, इतकें कशाला पाहिजे.

**सरकारीवकील**– ( उभे राहून ) न्यायाधीश महाराज, आपणांस या असामीची साक्ष घेतली पाहिजे, याजकरितां कचेरींत दिवे लावण्याची आज्ञा व्हावी; नाहीं तर अंधारामुळें त्याची जबानी लिहितां येणार नाहीं.

**न्यायाधीश**–हवालदार, दिवे आणवा लवकर, फार जल्दी करा. (सरकारी वकिलांकडे पाहून) काय चमत्कारिक हवा एकाएकी होऊन गेली पहा! आणि हा आजचा खटला असा चमत्कारिक आहे कीं, दिवसास दिवे लावून न्याय करण्याची वेळ आली आहे!

**काळूजी**–महाराज, मला जाऊं द्यानां? माझी साक्ष काय उपयोगाची; कारण, मला कांहींच माहिती नाहीं, व ज्यावेळेस हें प्रकरण झालें तेव्हां मला गाढ निद्रा लागली होती, आणि मी आरोळ्या ऐकून जागा झालों. नंतर झालेला सर्व प्रकार, **नानक** व त्याची स्त्री या उभयतांनीं सरकारास कळविलाच आहे, त्यापेक्षां जास्ती काय सांगावयाचें आहे.

**न्यायाधीश**–अरे, दिवे कां अझून आणानां! हवालदार, दिवे आजचे दिवसांत येतीलनां?

**हवालदार**–तो, महाराज, मशालजी दिवे लावण्यास येत आहे.

**मशालजी**–धनीसाहेब, माफी असावी; वाऱ्यानें व पावसानें माझी मशाल तीन वेळ विझाली. त्यास काय माझा इलाज! ( इतक्यांत कचेरींत बरीच गलबल झाली, आणि धांवारे धांरा, तोच रे तोच-असे शब्द मोठ्यानें ऐकूं येऊं लागले.)

अरेरे! त्या **केसरबाईवर** आकस्मात् असा चमत्का-

रिक प्रसंग येऊन पडला कीं, तिनें क्षणभर रडावें, क्षणभर हांसावें, व क्षणभर अतिशय भय पावून घाबरावें, तेणें-करून लोक तिला वेड लागलें कीं काय, असें एकमेकांशीं बोलूं लागले.

**केसर०**—पहा पहा, न्यायाधीश महाराज, आपले जवळच भिंतीवर डावे आंगास काय आहे तें पहा! आहारे **देवा**, आहारे कृपाळू **परमेश्वरा**, तुला **दीनानाथ, दीनवत्सल, भक्तवत्सल**! अशीं अनेक नांवें आहेत-तीं खचित् शोभतात! **भगवंता**! अशा प्रसंगीं तूं साक्ष न देतास, तर, माझे **आई**! या माझे **कृष्णास** कोणगे वांचविता? न्यायाधीश महाराज! तें भिंतीवरील चित्र, माझे तरफेची साक्ष देत आहे ती ध्यावी. जी छाया माझे मनास रात्रंदिवस छळीत आहे, आणि माझे डोळ्यांपुढून जात नाहीं, ती भिंतीवरील छाया आहे, यांत अगदीं संशय नाहीं. माझ्या लाडक्या गुणांच्या **चिमण्याचा** प्राण घेणार तोच गे बाई चांडाळ; मी जर सर्पीण किंवा वाघीण असल्यें, तर त्याचे नरडीचा घोट घेतल्यावांचून कधीं राहिल्यें नसल्यें.

हें भाषण ऐकून, कोडतांतील लोक एकमेकांशीं बोलूं लागले; व उभयपक्षांचे वकील आपआपल्या खुर्च्यांवर उठून उभे राहिले; तसेंच न्यायाधीश, ही छाया कोणाची आहे, हा विचार करण्यासाठीं आपले डावे आंगास भिंतीकडे निरखून पाहूं लागले; तेव्हां सर्वांची दृष्टि **काळूजी**कडे पोहोंचून भिंतीवरील छाया त्याचीच आहे, अशी लोकांची खातरी होत आहे, इतक्यांत **काळूजी** हिसकाहिसक करून साक्षीदारांचे कठड्यांतून पळून जाण्याचा यत्न करूं

लागला; परंतु पोलीसचे शिपायांनीं लवकरच त्याचा यत्न व्यर्थ आहे, असें त्याच्या अनुभवास आणून दिलें.

सर्व सभाजनांनीं हा सर्व प्रकार अवलोकन करून, **केसरबाईचा** पुत्र यानेंच मारिला, असें त्यांस खचित् वाटलें; परंतु हें कृत्य त्यानें कोणत्या हेतूनें केलें, याची निवृत्ति होण्यासाठीं, **भीमराव** हे त्यास कांहीं प्रश्न विचारणार, तों इतक्यांत आकाश अगदीं निरभ्र होऊन, पुनः पूर्ववत् प्रकाश पडला, आणि दिव्याची गरज नाहींशी झाली; न्यायाधीश मागें वळून आपले चिटणिसाकडे पाहतात, तों कोणी एक वृद्ध आणि दुखणाईत गृहस्थ खुर्चीवर बसला आहे, आणि तो दीनवदनेंकरून कांहीं बोलावयास इच्छीत आहे असा त्यांनीं पाहिला

**न्यायाधीश**–आपली स्वारी कोठून आली ? आपली प्रकृती नीट नव्हती तर यावयाचें नव्हतें. मी आपणास ओळखिलें नाहीं.

**रामचरण०**–महाराज, आपण थोरथोर व विद्वान् गृहस्थ या न्यायाचे कामांत झटत आहांत, तस्मात् खरें तें खरेंच आहे, आणि अखेरीस **कृष्णाबाई** निर्दोषी ठरेल-अशी माझी पूर्ण खातरी आहे. परंतु **काळूजीनें केसरबाईच्या** मुलास कां मारिलें, या संशयाची निवृति व्हावी, अशी आपली इच्छा दिसून आल्यावरून मी विनंती करितों, ती लक्षपूर्वक ऐकावी.

**न्यायाधीश**–( सभेकडे वळून ) ऐकाहो ऐका. हँ, चालूंद्या.

**रामचरण०**–( तिऱ्हाइतासारखे बोलतात ) "हा-आपणास **काळूजी** ह्मणविणारा मनुष्य, हतभाग्य **रामचर-**

**णलाल** याचा पुत्र आहे, आणि त्या **कृष्णा व केसर** या दोघी मुली त्याच्या पुतण्या आहेत. **काळूजी** हा दुराचारी निघाल्यामुळें त्याच्या बापानें त्यास घरांतून घालवून देऊन, त्यानें **केसरचा** मुलगा **चिमणलाल** यास मांडीवर घेण्याचा विचार योजिला होता, परंतु तो योगायोग **परमेश्वरानें** आणिला नाहीं; व ही खबर ह्या चांडाळास समजतांच, त्यानें त्यांची पाळथ राखून, **चिमणलालाचा** त्या धर्मशाळेंत जाऊन घात केला;" आतां आपण समजलांनां, **काळूजीनें** त्या बालकास कां मारिलें तें? असो. न्यायाधीस महाराज, आतां मीं ( इतके शब्द बोलून मूर्छित झाले, आणि पुनः शुद्धीवर आले. )

**न्यायाधीश**—महाराज! आपलें नांव काय आणि आपण आकस्मात् एथें कोठून आलां, हें मला निवेदन करावें. आपली ही अशी अवस्था झाली असून, अशा हवेंत घराबाहेर येण्याजोगा आपणावर कोणता प्रसंग गुजरला आहे!

**रामचरण**०—मीं आतां तें आपणास कळविणारच होतों. महाराज, याच देहास **रामचरण** असें ह्मणतात; समजलां? इतःपर मला कोणता प्रश्न विचारण्याची आपले मनांत इच्छा राहणार नाहीं असें मला वाटतें, कारण ज्या मनुष्यानें, मजवर प्रसंग आणून माझे मुखास कलंक लाविला, त्याची सर्व हकीकत आपणास विदीत केलीच आहे. मित्रहो! आतां माझे प्राणोत्क्रमणाची वेळ फार जवळ आली आहे, हें माझे मुखचर्येवरून दिसतच आहे, असें असून, मी एथें कां आलों ह्मणाल तर, या माझ्या उभयतां मुली अशा संकटांत असतांनां माझे प्राण जाईनात, याज-

कारितां मला एथें यावें लागलें. तर आपण, माझी **कृष्णा** निर्दोषी आहे—असें एक वेळ माझे कानांस ऐकवा, ह्मणजे मला इहलोकसंबंधीं काळजी न राहून, मी सुखानें देह सोडीन.

हे शब्द ऐकून न्यायाधीश आणि पंच यांनीं "**कृष्णाबाई** अगदीं निर्दोषी आहे," असें सर्व सभेस कळवून सभा विसर्जन केली, आणि **काळूजी** यास मात्र 'खुनी कैदी' ह्मणून तुरुंगांत मोठ्या बंदोबस्तानें ठेवण्याविषयीं ताकीद दिली.

**न्यायाधीश—रामचरणलाल**, आपले मनांतील हेतु सिद्ध झाला; आतां आपण घरीं जावें. कचेरींत येऊन आपण साक्ष दिलींत, हे आह्मांवर मोठे उपकार झाले.

असें ह्मणून न्यायाधीश उठतात, आणि **रामचरणलाल** यांचे हात धरायास जातात, तों तेथें पंचभूतात्मक देह मात्र राहिला, आणि चैतन्यसंबंधानें चलनवलन असावें तें नाहींसें झालें! हें पाहून सर्व मंडळीस फार दुःख वाटलें, आणि **रामचरणलाल** यांच्या उभयतां पुतण्यांनीं अतिशय शोक केला!!

**रामचरणलाल** यांचें उत्तर कार्य झाल्यावर, त्यांनीं **केसरबाईचे** पुत्राच्या नांवचें वारिसपत्र लिहून ठेविलेलें होतें, त्याजवरून त्यांची स्थावर मिळकत सर्व तिच्या दिराकडे गेली, परंतु उभयतां बहिणीस जन्मभर पुरेल इतकें द्रव्य त्यांचे वांटणीस आलें, त्यावर त्या आपला निर्वाह करून होत्या. पुढें एक वर्ष झाल्यानंतर **केसरबाई** ही पुत्रशोकानें मरण पावली.

**काळूजी** याचे घोर कर्मास योग्य अशी देहदंडाची

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ व नारायण
दा. नं. 96823



शिक्षा न्यायाधिशानें ठरविल्यावर, त्यानें विषप्राशन करून आत्महत्या केली, आणि अंत्यज्याचे हातून प्राप्त होणारें मरण चुकाविलें.

याप्रमाणें **ईश्वराच्या** कृपेनें अद्भुत साक्ष मिळून आपली निरपराधी **कृष्णाबाई** महत् संकटांतून मुक्त झाली. परमदयाळू **जगदीश्वर** सर्व साक्षी आहे! तो अनाथ व निरपराधी यांचें संरक्षण करितो, व दुष्टांस दंड करतो.

आहाहा!! **परमेश्वरा**! आह्मीं पापीजन अनेक अपराध करित असतांही **त्वां** आह्मांवर दयाच करित असावीनां! आह्मी तुझे आभार मानून अनन्य भावानें शरण येऊन इतकेंच मागतों कीं, आह्मांस सदासर्वकाळ सद्बुद्धि देऊन आपले कृपेस पात्र कर!!



## २.

## पुत्रलाभ व सुदैव.

**दक्षिण महाराष्ट्रांतील कारवार** नामक बंदरीं, कांहीं वर्षांपूर्वी **यशवंतराव** ह्मणून एक मोठे व्यापारी राहत होते. **यशवंतराव** हे नेहमीं आपलीं गलबतें अनेक तऱ्हेच्या मालानें भरून, **हिंदुस्थानांतील** निरनिराळ्या प्रसिद्ध बंदरांस पाठवित असत, आणि कोणता कसाही जोखमी व्यापार असला, तरी त्यांत पुष्कळ द्रव्य मिळण्याचा लाग असला ह्मणजे ते छाती करीत; त्या योगानें त्यांनीं थोडक्याच वर्षांत पुष्कळ द्रव्य मिळविलें. हे गृहस्थ स्वभावानें साधे, आणि भावार्थी असत, याजमुळें त्यांस विशेष डामडौल आणि थाटमाटाचा कंटाळा होता. जर एखादे वेळेस त्यानां कोणी विचारिलें कीं, "आपण आपला व्यापाराचा माल राहावयाचे वाड्यांतच भरून ठेवितां, त्यापेक्षां जवळच एखादी वखार कां भाड्यानें घेत नाहींं?" तर ते असें उत्तर देत कीं, "जेथें आपलें काम तेथें आपण असावें, नाहीं तर चाकरमाणसांवर विशेष भरंवसा ठेवावा लागतो, तेणेंकरून कधीं कधीं मोठें नुकसान होतें." सारांश, व्यापाराच्या कामांत **यशवंतराव** यांची दक्षता, **परमेश्वरानें** त्यांस हात देण्याजोगीच होती.

**यशवंतराव** यांची पहिली स्त्री अल्पवयांतच निवर्तली, याजमुळें त्यानीं दुसरे लग्न केलें; परंतु तिचाही काळ लव-

रच होऊन, वृद्धापकाळीं त्यांचे घरांत कुटुंबापैकीं ह्मणण्यास, दोघी स्त्रियांच्या दोन कन्या मात्र राहिल्या होत्या. थोरली मुलगी **सत्यभामा** नामें करून होती. ती वयानें २० वर्षांची असून बोलण्याचालण्यांत उद्धट व दिसण्यांत रांठ असे, तेणेंकरून तिचें कोणाशीं पडत नसे, व ती कोणास आवडतही नसे; परंतु **सगुणा** ह्मणून धाकटी कन्या होती, तिच्या वयास पुरतीं १९ वर्षें देखिल झालीं नव्हतीं, तोंच तिच्या स्वरूपाची जिकडेतिकडे प्रशंसा झाली; व बापासही तिची सत्वस्थवृत्ति आणि कोमल अंतःकरण पाहून, अतिशय समाधान वाटत असे.

**यशवंतराव** हे स्वभावानें थोर, उदार आणि दयाळू असत खरे, परंतु इतर श्रीमंत लोकांप्रमाणें ते अभिमानी आणि दुराग्रही असत, तेणेंकरून एक वेळ जी गोष्ट त्यांचे मनांत आली ती पुनः जात नसे, आणि कोणाचीही गोष्ट निघाली तरी, तेथें आपलें उदाहरण पुढें करून, ते ह्मणत कीं, "आह्मी आज तीन पिढ्या हेंच काम करीत आलों, परंतु आह्मास कधीं व्यापारांत नुकसान आलेलें आठवत नाहीं. अहो, नजर पुरवून कोणतेंही काम केलें, तर त्यांत नुकसान कशानें व्हावयाचें आहे? परंतु लोक विचार न करितां आंधळ्यासारिखे भलत्याच कामांत हात घालितात, तेणेंकरून अखेरीस फसतात, आणि आपले अविचाराचीं फळें भोगितात; त्यास लोकांनीं काय करावें ?"

**यशवंतराव** यांच्या एथें **आनंदराव** ह्मणून एक कारकून होता. त्याचें सौंदर्य आणि सदाचरण पाहून, **यशवंतराव** यांच्या धाकट्या कन्येचें मन अतिशय मोहित झालें, व कालेंकरून त्या उभयतांस परस्पराचें मनोगत समजल्यावर

त्यांची प्रीति दिवसेंदिवस वृद्धिंगत होत चालली. परंतु, **आनंदराव** याचा बाप पूर्वी श्रीमंत असून व्यापाराचे कामांत जोखीम लागून दरिद्री झाला होता, यामुळें अशा आडाणी घराण्याशीं शरीरसंबंध करणें, हें आपल्या बापाचे प्रकृतीस अगदीं आवडणार नाहीं, असें **सत्यभामाबाईस** वाटल्यावरून, तिचा सापत्नभाव जागृत झाला, आणि तिनें आपले बापाचे मनांत, **सगुणाबाई**विषयीं वक्रता आणून देण्यास संधि चांगली आहे असें समजून, ती **सगुणाबाईच्या** नाशास प्रवृत्त झाली.

एके दिवशीं उभयतां बहिणी एकमेकींच्या वेण्या घालीत बसल्या असतां त्यांचीं खालीं लिहिल्याप्रमाणें भाषणें झालीं.

**सत्यभामा – सगुणा,** आज तुझें तोंड उतरल्यासारिखें कां दिसतें गे ! मला बाई ह्या तुझ्या नाजूक प्रकृतीचा नेहेमीं धाकच असतो.

**सगुणा** – नाहीं, उगीच.

**सत्यभामा** – प्रकृति बिघडली असल्यास तसें सांग, ह्मणजे वैद्यबावाकडे तरी **रंगूस** पाठवित्यें.

**सगुणा** – ताई, मला अमुकच दुखणें झालें आहे, असें सांगतां येत नाहीं. पण माझे मनास स्वस्थता वाटत नाहीं. मनांतली गोष्ट तुला काय सांगूं बाई. ( असें ह्मणून किंचित् लाजते. )

**सत्यभामा** – हँ, हँ, मी समजल्यें, तुझें मन स्थिर कां नाहीं तें. पण तुला राग येणार नाहीं तर बोलेन. माडीवर दिवाणखान्यांत **आनंदराव** ह्मणून एक गृहस्थ लिहावयास येत असतो, तो तूं कधीं पाहिला आहेस ?

**सगुणा** – ( संतोष वाटून मितहास्य करिते ) आमचे ताईस कांहींना कांहीं कुचेष्टा केल्यावांचून चैनच पडत नाहीं.

**सत्यभामा** – मनांतली गोष्ट सांगतांच पहा कसें हसूं आलें तें. यावेळेस **आनंदराव** जर तुझ्या मुखाची शोभा पाहाण्यास जवळ असता, तर त्यास आनंद झाल्यावांचून कधीं राहिला नसता.

**सगुणा** – एकून ताई, तुझ्यासारखी धूर्त बायको माझे पाहाण्यांत आली नाहीं; कारण ज्या गोष्टीची मी आजपर्यंत तुला किंवा इतर कोणास अगदीं ओळख दिली नव्हती, ती गोष्ट तुला कशी गे समजली !

**सत्यभामा** – समजेल तर काय झालें; मी तरी तुझी वहिण ना ? ते दिवशीं बाबा कोठेसे गेले होते, आणि माझी प्रकृति कांहींशी बिघडली होती; ही संधि पाहून, तूं दिवाणखान्याचे दारांत उभी राहून, **आनंदरावाशीं** कांहीं भाषण करित होतीस, आणि वारंवार लाजल्यासारखें करून हांसत होतीस, तें सर्व मी आपले खोलींतून पाहिलें; आणि तेव्हांच माझे मनांत आलें कीं, तुमच्या उभयतांच्या मनांचें ऐक्य झालें आहे. असो; मला त्याचा संतोषच आहे; कारण, आह्मा स्त्रीजातीस जन्मतः केव्हां तरी सर्व संस्कार होऊन, शेवटीं लग्न करावें लागणार; मग आतां या निष्कलंक वयांत ज्या मनुष्यास आपण एक वेळ आपलें मन अर्पण केलें, त्यास सोडून दुसरा पाहत बसणें, आणि आपले मनास दुखविणें यांत कोणतें श्रेय आहे !

**सगुणा** – त्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत, परंतु तुझ्या मताप्रमाणेच बावाचीही समजूत असती, तर या तुझ्या सर्व गोष्टी मला गोड लागल्या असत्या.

**सत्यभामा** – हो, ती एक मोठीच अडचण आहे. **आनंदरावाचा** बाप व्यापाराचे कामांत दरिद्री झाला, याजकरितां असले आडाणी घराण्यांतील मनुष्यास, बाबा कधीं सुखानें आपली आवडती मुलगी देणार नाहींत, असें त्यांचे आग्रही स्वभावावरून मला वाटतें. ( तोंड उतरल्यासारिखें करिते. )

**सगुणा** – तर मग ताई, इतःपर मला या संसारांत सुख ह्मणून राहिलेंच नाहीं. जर बाबानीं मला **आनंदरावास** दिली नाहीं, तर मग त्यानीं आपल्यास एकच कन्या आहे असें आतांपासून समजावें, आणि माझी फार दिवस वांचण्याचीही आशा धरूं नये; कारण, एक वेळ जें अंतःरण मी **आनंदरावास** अर्पण केलें, तें परत घेऊन दुसऱ्यास देण्यापेक्षां मला मरण बरें वाटतें.

**सत्यभामा** – बाबानीं तुझें **आनंदरावाशीं** लग्न केलें नाहीं, तर तूं जीव देणार ? केवढें शहाणपण हें ! अशा प्रसंगीं मी तर बाई जिवावर उदार न होतां, आसपासच्या एखाद्या गांवीं जाऊन, केव्हांच लग्न करून आल्यें असत्यें, आणि पुनः बाबाकडे येऊन, त्यांचे हातींपायीं पडून क्षमा मागून पूर्ववत् कृपा संपादन केली असती. तुला तर असें करण्यास मजपेक्षां देखील चांगली सोय आहे.

**सगुणा** – ती कोणती बरें ?

**सत्यभामा** – हँ, सांगत्यें ऐक. एथून तुझे मामाचा गांव **देवीघाट** जवळच आहे, आणि **आनंदरावाचेंही** घर तेथेंच आहे. याजकरितां तुह्मी उभयतां तेथें गेलांत आणि मामास आपला बेत कळविलात, ह्मणजे कोणत्याही गोष्टीची अडचण पडावयाची नाहीं. कां, कशी तोड आहे!

**सगुणा** – तुझी युक्ति चांगली आहे, पण आजपर्यंत कोणतीही गोष्ट मी बाबाचे आज्ञेवांचून केली नाहीं, आणि आतां एवढें साहसकर्म माझे हातून कसें होईल?

**सत्यभामा** – मला बाई तुझा मोठा चमत्कार वाटतो. तुझ्या मनांत **आनंदरावाचा** नाद सोडावयाचा नाहीं, आणि बाबाची मर्जी मोडावयाची नाहीं; तर ह्या दोन्हीं गोष्टी घडतील तरी कशा? तूं माझें ऐकशील, तर इतर सर्व बेत एकीकडे ठेव, आणि बाबाची आज्ञा घेण्याचे भरीस न पडतां, कर्तव्य असेल तें प्रथम कर, आणि नंतर सोईसोईनें, परत आल्यावर, बाबाजवळ आपला अपराध कबूल करून. त्याची क्षमा माग; ह्मणजे तुझे सर्व मनोरथ पूर्ण होतील. परंतु ही तजवीज तुझ्या मर्जीस येत नसेल, तर तुला **आनंदराव** किंवा बाबा या दोघांतून एकाची आशा सोडावी लागेल. कारण, बाबानें मनाई केली असून, तूं **आनंदरावाशीं** लग्न केलेंस, तर तूं त्याची आज्ञा बुद्धिपूर्वक अमान्य केलीस, असें समजून तो पुनः तुझें मुखावलोकन करणार नाहीं, व जर बाबाची मर्जीच तुला संपादन करावयाची असेल, तर **आनंदरावाचा** संबंध तुला अगदीं सोडावा लागेल, आणि त्यामुळें तूं संसारसुखास अगदीं मुकशील.

**सगुणा** – ताई, आज मी ही गोष्ट विचार केल्यावांचून बाबास कळविली असती, तर मी फार संकटांत पडल्यें असत्यें, परंतु तूं माझी चूक मला कळविलीस ह्मणून बरें झालें. इतःपर आह्मीं उभयतां, तूं सांगितल्याप्रमाणें करितों, परंतु तुला माझें एक काम केलें पाहिजे; तें असें कीं, संकेताप्रमाणें सर्व गोष्टी पार पडल्यावर मी तुला एक

पत्र पाठवीन, तें तूं चांगली वेळ पाहून बाबास दाखीव, आणि मजवर त्याचा फारसा राग न होई अशी तजवीज ठेव. ( इतकें बोलून दोघी उठून गेल्या. )

याप्रमाणें उभयतां बहिणींचा संकेत ठरल्यावर, दुसरे दिवशीं **आनंदराव** आणि **सगुणा** हीं उभयतां कोणास नकळत **देवीघाटास** निघून गेलीं; आणि पूर्वसंकेताप्रमाणें **सगुणाबाईनें** आपले मातुलास सर्व प्रकार विदित केल्यावर, त्यानें सुमुहूर्त पाहून त्या उभयतांचा विवाह करून दिला. इकडे, **सगुणा** व **आनंदराव** हीं दोघें नाहींशीं झालीं, हें वर्तमान **यशवंतराव** यांस समजतांच, त्यानीं बारकायीनें पुष्कळ शोध केला; परंतु, ही गोष्ट लोकांत प्रगट झाली असतां, अमक्याची मुलगी अमक्याचा हात धरून निघून गेली, असें लोक ह्मणूं लागतील, ह्या भयानें व कांहींअंशीं रागानें, **सगुणेचा** शोध करणें त्यानीं सोडून दिला; परंतु किती झालें तरी बापाचें हृदय! दुसरे दिवशीं **यशवंतराव सत्यभामेस** खोदखोदून विचारूं लागले कीं, **सगुणा** कोठें गेली, हें तुला ठाऊक आहे? परंतु त्या दुष्टेनें 'मला ठाऊक नाहीं,' ह्मणून स्पष्ट उत्तर दिलें; आणि दोन प्रहरच्या सुमारास एक चमत्कारिक पत्र तयार करून आपले बापाचे खोलींत त्याचे बसावयाचे जागीं नेऊन ठेविलें. **यशवंतराव** हे त्या दिवशीं आपल्या एका दूरदेशीं जाणाऱ्या गलबताची रवानगी करून देण्यासाठीं बंदरावर गेले होते. तेथून परत आल्यावर ते आपल्या खोलींत गेले, आणि **सत्यभामेनें** जें पत्र त्यांचे बसावयाचे जागीं ठेविलें होतें, तें त्यानीं वाचून पाहिलें. तें पत्र असें होतें:—

"बाबा, मी आपणास काय लिहावें हें मला आपल्या रागाचे भयामुळें सुचत नाहीं. असो. आतां आपण झालेल्या गोष्टीचा खेद न मानितां, सर्वांच्या कल्याणाकडे नजर देऊन मनांतील विकल्प एकीकडे ठेवा, आणि मला व आपले जामातांला पुनः एक वेळ आपले पदरांत घ्या. आपले पोटीं पुत्र नाहीं, असें इतःपर समजूं नका. आतां वयपरत्वें आपली प्रकृति अशक्त होत चालली आहे, याजकरितां त्यांचें ह्मणणें असें आहे कीं, आपले व्यापारांत आपण त्यांस भाग द्यावा, ह्मणजे आपलें बहुतेक कामकाज ते पाहतील, आणि आपणास पैशाचे वगैरे बाबतींत विशेष मन घालावें लागणार नाहीं.

" आमचा उभयतांचा विवाह आज प्रातःकाळीं झाला. त्या वेळेस बाबा आह्मांस तुमचें स्मरण वारंवार होत होतें. आमचे मनांत असें येई कीं, हा उत्साह पाहण्यास आपण असतां, तर अधिक आनंद झाला असता. आह्मीं उभयतां कुशल असून आपल्या पत्राची मार्गप्रतिक्षा करीत आहों. याजकरितां आपण कृपा करून **सिद्दापूर** एथें आह्मांस पत्र पाठवा; आह्मी मासपक्ष तेथें राहिल्यानंतर निघून येऊं. लेंकरावर बहुतकरून पूर्ववत् ममता असेलच, असें समजून हें पत्र लिहिलें आहे, तर उत्तर पाठविण्यास अनमान होऊं नये. हे विज्ञापना." **सौ० सगुणाबाई.**

**यशवंतरावानीं** तें पत्र वाचून पाहतांच त्यांस अतिशय क्रोध आला, आणि त्या दिवसापासून त्यांस प्रतिदिवशीं ज्वर येऊं लागला, तेणेंकरून वरील पत्रांत लिहिल्याप्रमाणें ते दिवसेंदिवस क्षीण होत चालले.

इकडे **सगुणाबाईचें** व **आनंदरावाचें** लग्न झाल्यावर तीं दोघें **सिद्दापूर** एथें निघून गेलीं, आणि जातांनां **सगुणाबाईनें** अति नम्रतेनें आणि गरिबीनें आपले बापाच्या नांवाचें एक पत्र लिहून **कारवारास** रवाना केलें. परंतु, **सत्यभामेनें** तें पत्र घेऊन, बापाच्या दृष्टीस न पडूं देतां त्याच्याबद्दल वर लिहिलेल्या मजकुराचें दुसरें एक पत्र लिहून त्याचे खोलींत नेऊन ठेविलें, असें पूर्वीं सांगितलेंच आहे. पुढें एक दोन दिवसांनीं **सत्यभामेनें, सगुणेच्या** पत्राचें उत्तर तीस खालीं लिहिल्याप्रमाणें, बापाच्या नांवाची खोटी सही करून **सिद्दापूरास** पाठविलें; तें असें:—

"**यशवंतराव** यांस **सत्यभामे**खेरीज दुसरी कन्या नाहीं, असें ते समजतात; कारण, आजपर्यंत जी सर्पीण त्यांनीं पोटाशीं धरून मुलीप्रमाणें वाढविली होती, तिनें शेवटीं त्यांस दंश करून आपल्या कृतघ्नतेचा कळस केला, याजकरितां इतःपर त्यांनीं तिचा त्याग केला आहे, असें तिनें समजावें."

याप्रमाणें **सत्यभामेच्या** दुष्ट बुद्धीचा प्रकाश पडल्यावर **सगुणाबाईनें** व **आनंदरावानें, यशवंतराव** यांचा क्रोध शांत करण्यासाठीं **सिद्दापुरहून** पुष्कळ पत्रें पाठविलीं, परंतु तीं सर्व **सत्यभामेच्या** हातीं लागल्यामुळें, त्यांचे दृष्टीस पडलीं नाहींत. (पत्रें आपल्याच हातीं येण्याची तिनें तजवीज करून ठेविली होती.) **यशवंतरावांस** कन्येच्या वियोगाचें दुःख सहन न होऊन, त्यांचें दुखणें दिवसेंदिवस वाढत चाललें, आणि शेवटीं ते अगदीं बिछान्यास खिळले. कांहीं दिवसांनीं औषधउपचार, स्थलान्तर, वगैरे तजविजा चांगल्या झाल्या, तेणेंकरून ते कांहींसे बरे झाले. ज्या लोकांनीं **यशवंतरावांस** दुखणें लागण्याचे पूर्वीं

पाहिलें होतें, त्यांस, त्यांचे पांढरे केंस, पाठीचें पोंक, आणि कृश शरीर यांवरून हे अमुक गृहस्थ आहेत, असें ओळखण्यास कठीण पडूं लागलें. आतां, या जगांत माझें फार दिवस वास्तव्य नाहीं, असें त्यांचे मनानेंही घेतलें, यामुळें त्यानीं आपले सर्व जिंदगीची व्यवस्था करून, **सत्यभामेस** आपल्या सर्व दौलतीचें वारिसपत्र दिलें. **सत्यभामेचें** लग्न पूर्वींच झालें होतें, परंतु तिचा भ्रतार कालचक्राच्या झपाट्यांत सांपडून, अतिशय दरिद्री आणि कर्जदार झाला होता, व तशा दिवसांत **सत्यभामेनेंही** कांहीं अपकीर्ति होण्याजोगे गुण उधळले होते, तेणेंकरून तो अतिशय दुःखी होऊन, शेवटीं त्यानें आत्महत्या केली. याप्रमाणें **सत्यभामेच्या** संसाराची वाताहात झाल्यावर, तिनें दुसरें लग्न न करितां, ती आपल्या बापाचे घरीं येऊन राहिली; आणि **सगुणाबाईवर** बापाचा राग होऊन त्याची सर्व संपात्ति आपणास मिळावी, असा पूर्वींपासून जो तिचा हेतु होता, तो तिनें सिद्धीस नेला.

बहुतकरून मूर्ख लोकांचा स्वभाव असा असतो कीं, त्यांनीं मनांत आणिलेलें एखादें कृत्य सिद्धीस गेलें, म्हणजे त्यांस पूर्वापर धोरण न राहून, त्यांची वृत्ति चढून जाते, आणि आह्मी जें जें करूं तें तें होईल, असें त्यांस वाटूं लागतें. याप्रमाणेंच, **सत्यभामेच्या** हातास तिच्या बापाच्या सर्व संपत्तीचें वारिसपत्र येतांच, ती आपल्या मनांत अतिशय कृतार्थता मानूं लागली, आणि पूर्वींप्रमाणें बापाचे मर्जीनुरूप वागेनाशी झाली. **यशवंतरावानीं** दिलेल्या मालकीपत्राचा उपयोग त्यांच्या मागें करावयाचा, या गोष्टीची तिला जशी काय विस्मृति पडून, तिनें इच्छेस येईल तसा खर्च करण्या-

चा झपाटा लाविला; आणि ही सर्व संपत्ति माझी आहे असें समजून, खुद्द आपल्या उपयोगासाठीं तिनें गडीमाणसें, रथ म्याना, मशालजी वगैरे मोठा इतमाम बाळगिला. **सत्यभामा** प्रतिदिवशीं सायंकाळीं गांवाबाहेर **देवीचे** दर्शनास जायी, तेव्हां मार्गांत, मोठा दांडगा आणि भयंकर असा कोणी एक पुरुष आपले रथांत घेत असे; यावरून, तिनें आपले बापाच्या संपत्तीचा पूर्ण उपभोग घेण्यासाठीं आपल्या वराचीही योजना करून ठेविली आहे, असें लोक बोलूं लागले; व त्या मनुष्यास प्रतिदिवशीं मध्यान्हरात्रीचे सुमारास **सत्यभामा** मागीलदारानें घरांत घेत असते, हें घरांतील चाकरमाणसांच्या दृष्टीस पडल्यावरून त्यांसही तसेंच वाटूं लागलें. याप्रमाणें क्रम चालला असतां, एके दिवशीं **राधा** ह्मणून **यशवंतरावांचे** कृपेंतील एक वृद्ध दासी होती, तिनें हें कृत्य पाहतांच, लागलेंच आपले यजमानास कळविलें; परंतु **यशवंतरावांस सत्यभामेच्या** ममतेमुळें तो सर्व मजकूर त्यावेळीं खोटा वाटून, त्यानीं **राधेची** फार निर्भत्सना केली.

**यशवंतरावांचें** एक जहाज **कोचीनहून** निघाल्यास फार दिवस झाले होते, आणि ते रात्रंदिवस मोठ्या उत्सुकतेनें त्याची वाट पाहत होते. एके दिवशीं दोन प्रहरीं भोजनानंतर ते आपल्या कन्येच्या अव्यवस्थित चालीविषयीं तिला बोध करित बसले असतां, **कोचीनहून** येणारें जहाज बंदरांत येऊन थडकल्याची खबर, तेथील शिपायानें येऊन त्यांस आकस्मात् कळविली. तेव्हां **यशवंतराव** अति हर्षानें हातांत काठी घेऊन, गाडीची किंवा म्यान्याची वाट न पाहतां पायींच बंदराचे धक्क्यावर गेले, आणि तराफ्यावरून गलबतावर

चढणार, तों, दुखण्याचे आणि दरिद्राचे पीडेनें मरणोन्मुख झालेली अशी एक स्त्री, कडेवर एक लहानसें गोजिरवाणें आणि गोरेंभुरकें मूल घेऊन येतांनां त्यानीं पाहिली, तेव्हां ती-अशक्तपणामुळें झेंप जाऊन खालीं पडेल, असें त्यांस वाटल्यावरून, त्यानीं आपली काठी लांब हातानें तिजकडे केली, आणि "मुली या काठीला धरून सावकाशीनें ये," असें तिला सांगितलें. मुलीनें **यशवंतराव** यांचा आभार मानून, ती काठीच्या साह्यानें हळुहळू त्यांजपाशीं आली, आणि त्यांचे मुखाकडे एक दोन वेळ निरखून पाहून, त्यांचे गळ्यास मिठी मारून मोठ्यानें रडूं लागली. **यशवंतराव** हे आधींच वृद्ध, व्याधिग्रस्त, व पुत्रहीन होते, आणि तशांत त्यांची धाकटी कन्या त्यांस असून नाहींशी झाली होती, यामुळें ते अतिशय दुःखांत होते; परंतु जेव्हां त्यानीं त्या **सगुणाबाईस** आणि तिच्या चिमण्याशा मुलास पाहिलें, तेव्हां त्यांचे हृदयांत आनंद मायीनासा झाला. त्यानीं तिचे सर्व अपराध क्षमा करून, तिला ममतेनें पोटाशीं धरिलें, तेव्हां तिचें दुखणें व विपात्ति पाहून त्यांचे नेत्र भरून आले.

**सगुणा** – बाबा, तुह्मीं मला ओळाखिलें नाहीं ! काय ही तुमची अवस्था होऊन गेली आहे! सर्वांग शुष्क होऊन डोकें अगदीं पांढरें झालें आहे, आणि तोंडांत एकही दांत उरला नाहीं! अरे **परमेश्वरा** ! बापाची ही अशी अवस्था होण्यास मीच कारण झाल्यें, आणि यासाठींच माझी अशी अवस्था झाली. बाबा, तुह्मास सोडून गेल्यापासून आजपर्यंत मी जें जें दुःख भोगिलें, तें सर्व तुह्मास सांगितलें तर तुमच्यानें ऐकवणार देखील नाहीं.

हे मुलीचे शब्द ऐकून, बापाचें अंतःकरण सद्गदीत झालें, आणि **सगुणाबाई**विषयीं ज्या ज्या गोष्टी **सत्यभामेनें** सांगितल्या होत्या, त्या खोट्या असतील, असें त्यास वाटून त्याचे नेत्रांतून अश्रुधारा चालल्या.

**यशवंत०** – अगे माझे आवडते **सगुणाबाई**! तूं मला सोडून गेलीस त्या दिवसापासून आजपर्यंत मीही तुजसारखेंच दुःख भोगिलें, आणि तूं दृष्टीस पडावयाची होतीस ह्मणूनच मी अशा दुखण्यांतून आजपर्यंत वांचलों. बरें असो; आतां गेल्या गोष्टींचें स्मरण करून मनास उगीच कां दुखवावें? इतःपर मी तुझ्या सर्व अपराधांची क्षमा केली, आणि तुजविषयीं माझे मनांतील राग अगदीं नाहींसा झाला; समजलीस. चल आतां घरीं जाऊं, आणि आजपर्यंत झालेल्या सर्व गोष्टी विसरून जाऊन, आयुष्याचे राहिलेले दिवस पूर्वींप्रमाणें सुखांत घालवूं. चल, ऊठ, त्या धाकट्यास संभाळ हो, नाहीं तर एखाद्या जागीं वांदरचेष्टा करून खालीं उडी घालील. अशा चपळ मुलास फार संभाळावें लागतें.

**सगुणा** – बाबा, तसें आतां कसें होईल? माझे सुखाचें भांडार दुर्दैवानें फुटलें, आणि तुमच्या मागें या जगांत मला कोणी नाहींसें झालें. आतां मला सुख कशाचें! मी तुह्मास खचित् सांगतें कीं, जर ते आजपर्यंत ज़िवंत असते, आणि तुह्मी त्यांस आपल्या छायेखालीं पुनः एक वेळ घेतलें असतें, तर- ( रडायास लागते. ) असो. आतां तें कशाला पाहिजे !!!

**यशवंत०** – तूं **सिद्दापुरास** जातांनां मला एक पत्र पाठविलेंस, तें बहुतकरून **आनंदरावाचे** सांगण्यावरूनच लिहिलें असावेंस!

**सगुणा** – छे छे बाबा, माझीं सर्व पत्रें मी आपल्याच बुद्धीनें लिहित असें, आणि ते वाचून मात्र पाहत असत.

**यशवंत०** – सर्व पत्रें ह्मणजे ? मला तर तुझें एकच पत्र मिळालें, आणि तें मी त्या दिवसापासून खिशांत बाळगून ठेविलें आहे. (खिशांतील स्मरणवहींत पत्र शोधूं लागतात.)

**सगुणा** – नाहीं नाहीं; असें कां होईल ? मी एका-मागून एक पांच सात पत्रें पाठविलीं.

हें ऐकून **यशवंतरावांजींचा** चेहरा अगदीं उतरून गे-ला. आणि त्यानीं जें पत्र पंधरा महिनेपर्यंत आपले खिशांत बाळगून ठेविलें होतें, तें बाहेर काढून **सगुणेच्या** पुढें टाकिलें.

**यशवंत०** – हें पहा, हें पत्र तुझेंच ना ? या पत्रानें मला या दशेस आणिलें.

**सगुणा** – ( पत्र वाचून पाहून ) बाबा, हें पत्र माझ्या हातचें नाहीं, आणि या अशा मजकुराचें मला कधीं स्व-प्नहीं पडलें नव्हतें. इतक्या उमटपणाचें लिहिणें मी लिहीन, असें तुह्मांस वाटलें असल्याचा त्याचा दोष माझ्या दुर्दैवाकडे आहे. असो, **ईश्वरेच्छा** !

**यशवंत०** – अरे **देवा** ! ( सुस्कारा टाकितात. ) मी आपल्या जागीं शहाणा ह्मणवित असतां, मला हा प्रसं-ग यावा काय ? सारांश, इतःपर भरंवसा ठेवण्यास या जगांत स्थळ ह्मणून राहिलेंच नाहीं. ती **सत्यभामा** असें करील, असें मला अगदीं वाटलें नव्हतें.

**सगुणा** – आह्मां उभयतांस ताईनें सल्ला दिला कीं, ‘तुह्मी **देवीघाटास** जाऊन मामाच्या साह्यानें आपलें लग्न करून घ्या, नंतर मी चांगली संधि पाहून ती गोष्ट बाबांचे कानावर घालीन, आणि ते तुह्मांस तुमच्या अप-

राधाची क्षमा करतील.' बाबा, माझा दोष इतकाच कीं, मी, ताईनें सांगितल्याप्रमाणें केलें, आतां, तुह्मी ह्मणाल कीं, तूं लग्न झाल्यानंतर घरीं कां आली नाहींस? तर तुह्मी माझे पहिल्या पत्राचे उत्तरांत साफ लिहिलें होतें कीं, 'इतःपर मी **सगुणेचा** त्याग केला आहे;' मग मी तुह्मापाशीं कोणत्या तोंडानें यावें बरें? सर्पिणीसारखा पुनः दंश करण्यासाठींचना! (रडूं लागते.)

या प्रमाणें **सगुणेचें** भाषण चाललें आहे, तोंच **यशवंतरावनीं** मोठ्यानें हाय! हाय! शब्द करून आरोळी मारिली; त्यांचे नेत्र आरक्त झाले, सर्वांगास कंप सुटला, आणि शरीर ज्वरानें तप्त होत चाललें.

**यशवंत०** – धांवारे धांवा! कसेंही करून मला लवकर घरीं न्या. माझ्या घरांत राक्षसीनें प्रवेश केला आहे; माझें सर्वस्वी तिचे हातीं गेलें आहे. माझें घर तिनेंच बुडवून, या अनाथ पोरीची अशी दुर्दशा माझे हातून करविला, ही मानव-वेश-धरणारी वाघीण माझे लक्षांत आजपर्यंत अगदीं आली नव्हती.

**यशवंतराव** रागाचे आवेशांत अनेक प्रकारच्या वल्गना करित असतां, **सगुणाबाईनें** त्यांचे गळ्यास घट्ट मिठी घातली; आणि दीनवाणीनें **सत्यभामेच्या** सर्व अपराधांची क्षमा करण्याविषयीं ती त्यांस विनवूं लागली. याप्रमाणें बापाचा क्रोधाग्नि कन्येच्या प्रेमरूप उदकानें शांत होत आहे, इतक्यांत कोणी, **यशवंतरावच्या** घरीं जाऊन, झालेलें सर्व वर्तमान **सत्यभामेस** कळविलें, त्यावरून ती आपलें सर्व सामान आणि द्रव्य यांसुद्धां घरांतून नाहींशी झाली.

**सगुणाबाईचा** थोरपणा काय सांगावा! आपली वडील बहीण घरांत नाहीं, असें तिला कळतांच, तिनें बापास विनंती केली कीं, मी ताईस शोधून आणितें, आणि तुह्मी तिला आजपर्यंत झालेल्या सर्व अपराधांची क्षमा करा. परंतु, **यशवंतराव** यांस हें बोलणें न रुचून, त्यानीं, **सत्यभामेचें** नांव इतःपर घरांत कोणी काढूं नये, ह्मणून सर्वांस ताकीद दिली, आणि त्याच बैठकीस आपल्या सर्व दौलतीचें नवीन मालकीपत्र **सगुणेच्या** नांवाचें करून, त्यावर आपल्या दप्तरच्या दोन्ही कारकुनांकडून साक्षी घालून, तें लागलेंच **सगुणेच्या** स्वाधीन केलें. **यशवंतराव** यानीं तो कागद तिचे हातीं देतांनां तिला सांगितलें कीं, 'या दस्तऐवजास तूं फार जपून ठेव, ह्मणजे तुला आणि तुझ्या **सुंदरला** माझ्यामागें दरिद्राची पीडा होणार नाहीं, आणि तुला परोपकार करण्याची मोठी हौस आहे, तीहीं पूर्ण करिता येईल.'

याप्रमाणें व्यवस्था झाल्यावर, दुसरे दिवशीं प्रातःकाळीं **यशवंतरावजीचे** घरांतील एक सेवक नित्यक्रमाप्रमाणें त्यांचे खोलींत मुखमार्जनासाठीं ऊन पाणी घेऊन गेला होता, त्यानें पाहिलें तों- **यशवंतराव** पलंगाखालीं पडले आहेत, आणि त्यांचे मुखावर प्रेतकळा येऊन, त्यांचा श्वासोश्वास बंद झाला आहे. हें पाहून, तो घाबऱ्याघाबऱ्यानें आरोळ्या मारित जिन्याचे दाराशीं आला, आणि दुसऱ्या चाकरांस आपण पाहिलेला सर्व प्रकार त्यानें कळविला. **सगुणा** माडीवर आपल्या खोलींत निजली होती; तिनें ही गलबल ऐकतांच, ती जागृत झाली, आणि मुलगा पाहांटेचे साखरझोंपेंत होता, ह्मणून त्यास

तसाच निजलेला ठेवून, आपण बापाचे खोलींत जाऊन पहाते, तों- **यशवंतराव** पलंगाखालीं अस्ताव्यस्त पडले आहेत, जिकडे तिकडे चाकरमाणसें धांवत आहेत, वैद्य-बावा येऊन बसले आहेत, आणि शेजारीपाजारी लोकांची दाटी जमली आहे, हें पाहून तिची चित्तवृत्ति ठिकाणीं नाहींशी झाली. पुढें कांहीं वेळानें किंचित् शांत झाल्या-वर आपल्या खोलींत आली, आणि पहाते तों, आंथरु-णावर मुलगा नाहीं; व गेले रात्रीस बापानें जो कागद जिवाशीं बाळगून ठेवण्याकरितां दिला होता, त्याचाही ठिकाण नाहीं; तेव्हां मात्र तिचा धीर अगदीं सुटून, ती भूमीवर मूर्च्छित होऊन पडली. तेव्हां, **यशवंतरावजींनीं** गेल्या रात्रीं **सगुणाबाईस** जें नवीन वारिसपत्र दिलें होतें, त्याचा अस्सल मसुदा खुद्द त्यांचे हातचा, त्यांचे कारभारी **शामरावपंत** यांजपाशीं होता; तो त्यानीं, **रंगरावजी** ह्मणून एक नामांकीत व प्रामाणिक वकील होते त्यांस नेऊन दाखविला.

**शामराव** – महाराज, **यशवंतराव** हे आज पाहाटेस कैलासवाशी झाले, हें आपणास कळलेंच असेल. त्यानीं गेले रात्रीस आपल्या कनिष्ठ कन्येच्या नांवाचें एक माल-कीपत्र लिहून तिच्या स्वाधीन केलें होतें, तें मोठ्या चम-त्कारिक रीतीनें गाहाळ झालें आहे! परंतु त्याचा अस्सल मसुदा खुद्द **रावसाहेबांचे** हातचा मजपाशीं आहे, आणि हरवलेल्या दस्तऐवजावर साक्षी घालणारे लोकही साक्ष देण्यास कबूल आहेत, या दोन प्रमाणांवरून **सगुणाबा-ईच्या** हक्काची शाबिती होऊं शकेल किंवा नाहीं बरें?

**रंगराव** – ज्या कागदावर **रावसाहेबानीं** सही केली होती, तो कागद सांपडल्याशिवाय **सगुणाबाईचा** दावा कायद्याच्या रीतीनें शाबीत होणार नाहीं; याजकरितां उद्योग केलात, तर तो व्यर्थ जाईल, आणि विनाकारण तुह्मी खर्चाचे पेंचांत मात्र याल. वारिसपत्र करून ठेविल्यावांचून जे लोक मरतात, त्यांच्या दौलतीची व्यवस्था ज्या रीतीनें सरकारांतून होते, तशी, **यशवंतरावजींच्या** मालमिळकतीची होईल. समजलांत ?

**शामराव** – परंतु ही गोष्ट तशी नाहीं. **रावसाहेबांचे** ज्येष्ट कन्येनें त्यांस फसवून, त्यांजपासून सुमारें एक वर्षापूर्वीं आपल्या नांवाचें एक वारिसपत्र करून घेतलें होतें; त्यावर, काल त्यांची धाकटी मुलगी त्यांस भेटल्यावर थोरल्या मुलीची सर्व लबाडी त्यांस समजली; तेव्हां त्यानीं पूर्वींचा दस्तऐवज रद्द करून **सगुणाबाईच्या** नांवाचें नवीन वारिसपत्र करून दिलें. आतां हा नवीन कागद नाहींसा झाला, यामुळें **सत्यभामा** सर्व दौलतीची मालकीण होऊन, **सगुणाबाई** अन्नवस्त्रास देखिल महाग होईल, याची आह्मांस मोठी काळजी पडली आहे.

**रंगराव** – असें काय? आतां या कामांत माझी कांहींशी नजर पुरत चालली. **सगुणाबाईच्या** नांवचें वारिसपत्र नाहींसें झालें, तेणेंकरून **सत्यभामेचा** दस्तऐवज कायम राहून, ती आपल्या बापाचे सर्व जिंदगीची मालकीण होणार; यावरून असा संभव दिसतो कीं, **सत्यभामेनें** आपल्या फायद्याकडे लक्ष देऊन, हें अघोर कृत्य केलें असेल, आणि **सगुणाबाईचा** मुलगाही तिचेच तावडींत सांपडला असेल. **सत्यभामा** ही कोणत्याही कृत्यास

मार्गे सरेल, असें तिच्या नेहमींच्या चालीवरून वाटत नाहीं.

**शामराव** —.आपण केलेलें अनुमान खरें आहे, आणि यजमानाचे घरांतील सर्व मंडळींचेंही ह्मणणें असेंच आहे.

**रंगराव** — तर आतां तुह्मी त्वरा करून झालेलें सर्व वर्तमान सरकारांत कळवा, आणि गेलेल्या वस्तूंच्या शोधास लागा. मला सांगाल तर मीही **सगुणाबाईची** भेट घेऊन, तिचे मुखानें सर्व हकीकत ऐकिल्यावर, बारकाईनें होईल तितकी चौकशी करीन.

**शामराव** — गरीब बिचारी **सगुणाबाई !** तिजपाशीं आपणास द्यावयास काय राहिलें आहे, आणि तिनें कशाच्या भरंवशावर आपल्यासारख्या गृहस्थास तसदी द्यावी!

**रंगराव** — असो. त्या गोष्टीचा विचार पुढें पहातां येईल; चला आपण जाऊं, आणि **सगुणेच्या** व आपल्या विचारानें एखादी तजविज करूं. (असा विचार करून **यशवंतरावजींचे** घरीं जावयास निघाले. )

इकडे, **सत्यभामा** पूर्वदिवशीं घरांतून नाहींशी झाली होती, ती बापाचे मरणदिवशीं प्रातःकाळीं आपल्या मित्रासुद्धां पुनः प्रगट झाली; आणि त्या उभयतांनीं ओटीवरील खोलींत राजरोसपणानें आपलें ठाणें दिलें. **शामरावपंत** आणि **रंवरावजी** वकील हे उभयतां **यशवंतरावजींचे** घरीं येऊन पाहतात तों, **सत्यभामा** आपले मित्राबरोबर नाना प्रकारच्या गोष्टी सांगत बसली आहे, आणि त्याच्यापुढें अनेक प्रकारची फळफळावळ ठेवून, त्यांतील इच्छित पदार्थ भक्षण करण्याविषयीं त्यास आग्रह करित आहे. **रंगरावजींची** व **सत्यभामेच्या** मित्राची पूर्वींपासून ओळख होती, यामुळें, ती स्वारी **यशवंतराव** यांचे घरीं

त्यांच्या ज्येष्ट कन्येच्या प्रीतीचा अनुभव घेतांनां आढ-ळल्यावरून त्यांस मोठें आश्चर्य वाटलें.

**रंगराव** – **शामरावजी** ! पोलिस खात्यांतील हवालदार साहेबांचा आणि तुमच्या यजमानाच्या कन्येचा बराच ऋणानुबंध आहेसें दिसतें. (हवालदार यांजकडे वळून,) हवालदार, आपणास **सुबराव** ह्मणतातनां ?

**सुबराव** – होय, पण महाराज आपली स्वारी इकडे कोठें ?

**रंगराव** – मी वकिली करित असतों, हें आपणास ठाऊकच असेल. **शामरावजींनीं** मला **सगुणाबाईच्या** तर्फेनें वकिलीचे काम सांगितलें आहे.

**सुबराव** – ठीक, ठीक, योग्यच आहे. श्रमानें घशास कोरड पडली असल्यास, या शिशांतले दोन थेंब प्राशन करावे, आणि इच्छा असल्यास यांतील कांहीं पदार्थ मनास आणावे. बसा, क्षणभर बसा तर खरें.

**रंगराव** – नाहीं, मला आतां दुसरें कांहीं सुचत नाहीं. ( असें ह्मणून दोघे बसतात. )

**सुबराव** – आपली मर्जी. शहरचे कोतवालानीं या खटल्याची चौकशी मजकडे नेमिली आहे, हें आपणास कळलेंच असेल. ( **सत्यभामेस** ) प्रिये, या गृहस्थांनीं **सगुणाबाईची** वकिली पत्करिली आहे, कळलेंनां ?

**सत्यभामा** – हँ हँ असें काय ! ठीकच आहे. ( किंचित् हांसून ) तिचें वकिलावांचून कसें चालेल.

**सुबराव** – ( बाह्यात्कारें ) मला त्या गोष्टीचा संतोषच आहे.

**सत्यभामा** – मला माझ्या **सगुणे**विषयीं फार दुःख वाटतें, परंतु **ईश्वरेच्छे**पुढें कोणाचा इलाज आहे? मी तिला सांगणार आहे कीं, बाहेर दुसरे ठिकाणीं तिच्या बिऱ्हाडाची सोय होईपर्यंत तिनें खुशाल आमच्या एथें रहावें.

**सुबराव** – ( वकिलास ) हीस आपण ओळखिलीतनां? ही **सगुणाबाईची** सख्खी बहीण, **यशवंतराजीची** ज्येष्ट कन्या, आणि आमची पत्नि आहे.

**रंगरावजीस शामरावपंतानीं** पूर्वीं झालेली सर्व हकीकत सांगितलीच होती, व हल्लीं **सुबरावाचीं** भाषणेंही त्यानीं ऐकिलीं, त्याजवरून या प्रकरणांत कांहीं तरी मोठीच लबाडी झाली असावी, असें त्यांस खचित् वाटलें; आणि त्या कामांत **सुबरावा**सारखा धूर्त मनुष्य सामील असल्यामुळें, **सगुणाबाईच्या** पक्षास अगदीं कमीपणा येत आहे, हें पाहून त्यांस फार खेद वाटला. परंतु **ईश्वरावर** हवाला ठेवून त्यानीं स्वतः या कामीं मनापासून यत्न चालविला.

**रंगराव** – (**सत्यभामेस**) आपले वडिलांनीं वारिसपत्र करून ठेविलें आहे, तें आपणास ठाऊक असेलच?

**सत्यभामा** – हो, यांत काय संशय? माझी गोष्ट मला ठाऊक असल्यावांचून कशी राहील?

**रंगराव** – तें नवीन वारिसपत्र **सगुणाबाईच्या** नांवाचें आहे.

**सत्यभामा** – छे, छे, वारिसपत्र मिळून काय तें एकच, आणि तें माझ्याच नांवचें आहे.

**रंगराव** – **सगुणाबाईच्या** नांवाचें नाहीं, असें तुझास खचित् ठाऊक आहे?

**सत्यभामा** – यांत काय संशय? बाबानें आपल्या सर्व जिंदगीची मालकी मला दिली आहे, आणि त्याविषयीं मजपाशीं खुद्द त्याचे हातचा दस्तऐवजही आहे.

**सुबराव** – ती ह्मणते, तीच गोष्ट खरी आहे, आणि या बाबतींत आतां कोणतीच शंका राहिली नाहीं.

**रंगराव** – आपण ह्मणतां तें कसें असेल तें असो; परंतु, **यशवंतरावजीनीं** कालच दुसरें वारिसपत्र करून **सगुणाबाईचे** हवालीं केलें आहे.

**सत्यभामा** – हँ, हँ, तर मग असेल. ती गोष्ट मला अजून कळली नव्हती. ( वकिलाचे भाषणाची थट्टा केल्यासारखें करून ) हः हः हः!

**सुबराव** – हँ हँ, असें काय ? तर मग तो दस्तऐवज आपण आह्मांस दाखवावा, ह्मणजे सर्वच तंटा मिटला.

**रंगराव** – बरें आहे. तो कागद दाखविण्याची वेळ आली ह्मणजे दाखवूं, त्याविषयीं आपण काळजी करूं नये; परंतु ( परिणामाचा मात्र विचार करा, असें ह्मणणार इतक्यांत त्यानीं आपलें बोलणें बंद केलें. ) चला, आतां **सगुणाबाईची** खबर घेऊं. (असें ह्मणून माडीवर जावयास निघतात. )

**सत्यभामा** – आपण **सगुणेकडे** जातांनां ? तिची प्रकृति बिघडली आहेसें वाटतें; याजकरितां तिला माझ्या तर्फेनें असें सांगा कीं, ती बरी होईपर्यंत एथेंच राहिली तरी आमची अगदीं हरकत नाहीं, व माझे मनांतून तिला जें कांहीं द्यावयाचें आहे, तें मी मागाहून देईन.

**रंगराव** – ( **सत्यभामेचें** बोलणें संपत आहे, इत-

क्यांत घाईघाईनें ह्मणाले ) तुमच्या भाच्याचा पत्ता लागला, एवढ्यानें बरें झालें.

**सुबराव** – नाहीं, नाहीं, आतां त्याचा ठिकाण कोठून लागणार?

**रंगराव** – तर मग तुह्मास तें वर्तमान अजून कळलेंच नाहीं, असें ह्मणण्यास चिंता नाहीं. मुलगा सांपडला हें एक दुःखांत सुख समजलें पाहिजे. ( **रंगरावजी** व **शामरावपंत** माडीवर जाऊं लागतात, आणि जिन्यांतून कानोसा घेतात. )

**सत्यभामा** –( वकिलाचें भाषण ऐकून घाबरते, आणि उसासा टाकते. ) अरे **देवा** ! तरी मला भय होतेंच!

**सुबराव** – किती मूर्ख आहे ही ! ( हळूच ) तूं उगीच कां बससना?

हें भाषण ऐकून **रंगरावजी** व **शामरावजी** हे उभयतां जिन्यावर चढूं लागले.

**रंगराव** – कां **शामरावजी**, कसा काय रंग आहे? **सगुणाबाईच्या** मुलाचें काम या उभयतांखेरीज झालें नाहीं, असें त्यांचे भाषणावरून उघड दिसतें, नाहीं बरें? **परमेश्वरा**जवळ माझी इतकीच प्रार्थना आहे कीं, तें मूल बिचारें जिवंत सांपडो.

**शामराव** – ( अतिशय उदास होऊन ) महाराज, एकुण आमचा **सुंदर** अजून जिवंत असेल नसेल याविषयीं देखील आपणास संशय आहेना?

**रंगराव** – मला या गोष्टीविषयीं तूर्त कांहींच सांगतां येत नाहीं. कसें झालें असेल आणि काय झालें असेल, हें

एक **परमेश्वराला** ठाऊक. बरें असो, चला आपण प्रथम **सगुणाबाईस** तर भेटूं, नंतर दुसरा विचार.

**शामरावपंत** आणि वकील- हे **सगुणाबाईच्या** खोलींत सुमारें एक तासपर्यंत बसले, तरी ती पुत्रशोकामुळें अगदीं वेडी होऊन गेल्यामुळें, झालेली हकीकत तिच्या तोंडानें ऐकण्याविषयींचा त्यांचा सर्व यत्न निर्फळ झाला. शेवटीं **शामरावजींनीं, सत्यभामेनें** लिहिलेलें खोटें पत्र जें-**यशवंतरावजीनीं सगुणाबाईचे** स्वाधीन केलें होतें, तें-**रंगरावजींचें** स्वाधीन केलें, आणि जातांनां **सगुणाबाई** कांहींशी सावध होत चालली आहे, असें पाहून **रंगरावजींनीं** तिला कांहीं प्रश्न विचारिले.

**रंगराव** – **सगुणाबाई**, तुमच्या वडील बहिणीचें लग्न कधीं झालें हें तुह्मास माहित आहे ?

**सगुणा** – नाहीं. मला ती गोष्ट कोठून कळणार ! मी नुकती कालच एथें आल्यें.

**रंगराव** – तुमची **सत्यभामा** खालीं आपले यजमानासुद्धां आली आहे. तुह्मास बहुधा भेटलीच असेल.

**सगुणा** – नाहीं नाहीं. ती आतां मला कशाला भेटेल. या प्रसंगीं मला माझे बापानें आणि **ईश्वरानें** देखील हातचें सोडिलें; मग इतरांची काय कथा! (रडते.)

**रंगराव** – आज सकाळीं **रावसाहेबांचा** अंत झाला, तेव्हां तुह्मी खोलींतून बाहेर जातांनां खोलीचें दार उघडेंच ठेवून गेलां होतां किंवा लावून घेतलें होतें ?

**सगुणा** – मी खोलीचे दारास कुलूप लावून किल्ली बरोबर घेऊन गेल्यें होत्यें, आणि परत आल्यें तेव्हां कुलूप लावलेलें तसेंच होतें.

**रंगराव** – असें असेल, तर खोलींतले पदार्थ नाहींसे कसे झाले? मला असें वाटतें कीं, या खोलींत येण्यास दुसरी चोरवाट असावी; कारण, तसें नसेल तर तुमचा मुलगा आणि वारिसपत्राचा लखोटा– हे खोलीचे बाहेर कसे जातील?

**सगुणा** – आपण काय ह्मणतां हें मला समजत नाहीं, आणि माझ्यानें आपणास उत्तरही देववत नाहीं! अरे माझ्या धाकट्या! मला टाकून कोठें रे गेलास! मी लहानपणीं तुझें नांव **सुंदर** ठेविलें होतें, आणि माझी अशी अवस्था झाल्यावर (वैधव्य प्राप्त झाल्यावर) तुजवांचून मला या जगांत कोणी नाहींसें झाल्यामुळें, मी तुला नाना प्रकारच्या लाडक्या नांवांनीं हांका मारीत होत्यें, परंतु **देवाच्या** मनांत मला तेंही सुख भोगूं द्यावयाचें नाहीं! अरे **देवा**! अहो महाराज! माझा लाडका मला एकवेळ भेटवाल, तर मग मला दुसरी कशाची गरज नाहीं! माझे पतीच्या मागें मला एवढाच आधार होता, तोही नाहींसा झाला! आतां मी काय करूं!! हा प्रसंग पाहणें माझे कपाळीं होतें, यामुळेंच मी अझून वांचल्यें आहें! काय हो सांगावें! दुःखानें आणि रोगानें मी इतकी अशक्त झाल्यें आहें, तरी माझे प्राण या हतभाग्य शरीरास अझून सोडीत नाहींत, आणि बाबांची प्रकृति मजपेक्षां शंभरपट चांगली असतांही ते या दुःखास भिऊन रात्रीच मार्गस्थ झाले!! आतां माझा **सुंदर** मला कोण दाखवील! आणि मला या दुःखांतून कोण बाहेर काढील!! माझ्या धाकट्याचे नाना प्रकारचे खेळ माझ्या डोळ्यांपुढें दिसताहेत, आणि तो अझून माझ्या दृष्टीस पडेल अशी मला आशा आहे,

यामुळेंच माझे प्राण वांचले आहेत काय ! परंतु, जर ती आशा नाहींशी होऊन, त्याचा परिणाम काय झाला हें मला समजेल, तर मी क्षणभरही या देहाची ममता धरणार नाहीं ! माझा **सुंदर** कसेंही करून मला भेटवा !! मी एक वेळ त्याचें मुख पाहिल्यावर माझ्या जिवाचें कांहीं होवो ! परंतु, आतां मला हें वियोगाचें दुःख सहन होत नाहीं !! ( कांहीं शुद्धीवर येऊन उभयतां गृहस्थांकडे पाहते, परंतु त्यांस ओळखीत नाहीं. ) महाराज, आपण कोण आहां ? आपण मला या दुःखाचे हातून सोडविण्याचे हेतूनें आलां असलां, तर माझा **सुंदर** मला आणून द्या, मग तो जिवंत असो, किंवा नसो ! एक वेळ मला त्यास भेटवा, मग मला दुसरी कशाची गरज नाहीं !!

**रंगराव** – (**सगुणाबाईस** पुत्राखेरीज कांहीं सुचत नाहीं, असें पाहून वकील गहिंवरतो.) बाई, आतां तुमचा मुलगा लवकरच तुमचे दृष्टीस पडेल; तुह्मीं त्याविषयीं अगदीं काळजी करूं नका. परंतु, आमचे भाषणाकडे लक्ष देऊन आह्मी विचारितों-तें-सांगाल तर गोष्टी घडतील; नाहीं तर हे आह्मी चाललों.

**रंगरावजीनीं सगुणाबाईस** मुलगा परत येण्याची आशा दाखवितांच, तिला कांहींसा धीर आला, आणि तिनें आपल्या कार्याविषयीं इतकी काळजी बाळगणाऱ्या उभयतां गृहस्थांस मोठ्या नम्रतेनें बसायास सांगितलें.

**सगुणा** – महाराज, मला आतां आई, बाप, भाऊ, काय ते आपण आहांत. आपल्याखेरीज दुसऱ्या कोणास माझें अगत्य राहिलें नाहीं. **शामरावजी** आपणास मी पूर्वीपासून बाबाप्रमाणेंच लेखित आल्यें आहें, याजकरितां

आतां जर — हे आह्मीं चाललों, असें तुह्मींच ह्मटलें, तर मग माझें कसें होईल! ( अधिकाधिक रडते; हें पाहून ते उभयतां खालीं बसले. )

**रंगराव** — मी तुह्मास असें विचारितों कीं, आपले खोलींत येण्यास त्या दाराखेरीज ( दाराकडे बोट दाखवून ) दुसरी वाट आहे?

**सगुणा** — वाट तर नाहीं, पण-सुमारें दीड वर्षापूर्वी आमची **सत्यभामाताई** एके दिवशीं मध्यान्ह रात्रीचे सुमारास, त्या दारास आंतुन कडी लावलेली असतां खोलींत आली; तेव्हां मी दचकून उठल्यें आणि पाहूं लागल्यें, तों **ताई** बागेकडील सज्जांत जाऊन जिन्यानें खालीं उतरली, आणि लागलीच नाहींशी झाली! यावरून मला वाटतें, कीं या खोलींत येण्यास दुसरी चोरवाट खचित् असावी; व आमचे **ताईस** झोंपेंत हिंडावयाची आणि बडबड करावयाची खोड आहे, यामुळें बहुधा त्या रात्रीस माझे खोलींत आली असेल, असें समजून मी तिकडे फारसें लक्ष दिलें नाहीं.

**रंगराव** — **सत्यभामाबाईस** ही खोड नेहेमींची आहे?

**सगुणा** — इतर झोंपाळ्या बायकांप्रमाणें प्रतिदिवशीं जागेपणचे सर्व व्यवहार रात्रीं झोंपेंत करते असें नाहीं; परंतु, कधीं कधीं जेव्हां तिला मोठा राग येतो, किंवा अतिशय भय वाटतें, तेव्हां ती जागेपणचीं बहुतेक कृत्यें रात्रीस पुनः निद्रेंत करिते, असें मी एक दोन वेळां पाहिलें आहे. पण **वकीलसाहेब**, ही गोष्ट एक वर्षाच्या मागील, आतां ती खोड तिनें टाकिली, किंवा तशीच आहे, कोण जाणे!

**रंगराव** – बरें, ठीक आहे तर, आतां आह्मी जातों, आणि दोन प्रहरीं बारांवर दोन वाजण्याचे सुमारास परत येऊं. मी आतां याच कामाचे पाठीस लागतों, समजलां? आपण किमपिही काळजी करूं नये. चला **शामरावपंत.**

**सगुणा** – आपण जाऊन परत याल, तोंपर्यंत माझी अवस्था काय होईल कोण जाणें! आतां मज लेंकरावर दया असूं द्या.

**रंगराव** – ( वाईट वाटून ) तुह्मी वारंवार असे उद्गार काढाल, तर आह्मांस आरंभिलेलें कार्य शेवटास नेण्याविषयीं उमेद राहणार नाहीं; याजकरितां, आपला मुलगा आपणास **ईश्वरकृपेनें** भेटवीन, असें मी पूर्वींच कबूल केलें आहे, त्या-वर भरंवता ठेवून स्वस्थ असा, आणि वारंवार मुखांतून अशीं भाषणें काढूं नका. जर आपण एखादा अविचार करून आपले जिवास अपाय करून घेतलात, तर त्या बिचाऱ्या अनाथ बालकाचा सांभाळ कोणी करावा? आणि त्या-च्या बाललीला कोणी पाहव्या? तर, इतःपर आपण **परमेश्वरावर** सर्व भार टाकून स्वस्थ असा, आणि आम-चा उद्योग सफळ होण्याविषयीं त्याची प्रार्थना करा. ( उभयतां बोलत बोलत बाहेर जातात. ) **शामरावजी,** मी आपणास खचित् सांगतों कीं, **सत्यभामेपाशीं** खुद्द **रावसाहेबांचे** सहीचा दस्तऐवज आहे, याजमुळें तुमच्या अस्सल मसुद्याची आणि साक्षीदारांची, कायद्याचे दृष्टीनें पाहतां कांहींच मातब्बरी नाहीं; आणि मला असें वाटतें कीं, **यशवंतरावजींचें** उत्तरकार्य वगैरे आटोपून जिकडे-तिकडे सर्व स्थिरस्थावरता झाली, ह्मणजे हीं देवमनुष्यें ( **सत्यभामा** आणि **सुबराव** ) **सगुणाबाईस** या घरांत

क्षणभरही राहूं देणार नाहींत, कारण त्यांचे मुखचर्येवरून स्पष्ट दिसतें कीं, त्यांचे अंतःकरणास दयेचा गंध देखील नाहीं.

**शामराव** – आपण ह्मणता त्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत; परंतु **यशवंतराव**सारख्या यजमानाची, **सगुणाबाई**सारखी सुशील कन्या संकटांत पडलेली पाहून, तिला त्यांतून बाहेर काढण्याविषयीं यथाशक्ति प्रयत्न केल्यावांचून आह्मास कसें राहवेल? आणि तिचे हाल पाहून आपल्या अंतःकरणास द्रव आल्यावांचून कसा राहील? असो, आपण उद्योग करूं, मग काय होईल तें होवो. आपण **सगुणाबाईशीं** बोलत बसलां होतां, तेव्हां मी घरांत जाऊन, **सत्यभामा** केव्हां परत आली—हें चाकरमाणसांस विचारलें, परंतु कांहीं ठिकाण लागला नाहीं. त्यांचे बोलण्यावरून इतका मात्र अजमास होतो कीं, ती स्वारी कालपासून कोठें तरी घरांतच लपून राहिली असावी, व आज प्रातःकाळीं **रावसाहेबांचा** अंत झाल्याउपरांत, ती प्रसिद्ध रीतीनें घरांत फिरूं लागली, आणि पोलीस खात्याकडील हवालदार **सुबराव** यास बोलावून आणून त्याचेमार्फत तिनें घराचा सर्व बंदोबस्त करविला.

**रंगरावजींनीं** झालेल्या सर्व हकीकतीचें मनन करून, यापुढें अमूक तजवीज करावयाची, असा आपले मनांत बेत ठरविला, आणि ते **शामरावजीस** बरोबर घेऊन एका ओळखीचे वैद्याकडे गेले.

**रंगराव** – वैद्यबावा, मी आपणाकडे कांहीं जरूरीचे कामासाठीं आलों आहे, याजकरितां आपण वेळांत वेळ काढून माझा मजकूर ऐकून घ्यावा.

**वैद्य** – खुद्द आपणच आल्यावर, मला आपलीं सर्व कामें एकीकडे ठेवा ह्मणून सांगायास नको. आज या वेळेस स्वारी इकडेशी झुकली ? आज किती दिवस मी आपले भेटीस येण्याचा बेत करीत आहे, पण काय करावें ? क्षणभर रिकामपण सांपडत नाहीं. हल्लीं गांवांत जिकडेतिकडे दुखण्याचा अतिशय उपद्रव झाला आहे, यामुळें मला रात्रीं देखील चैन पडूं देत नाहींत. आज सकाळपासून **अनंतरावचे** घरीं गेलों होतों, तो आतां आलों; त्यांचा धाकटा मुलगा फार बेजार होता; आज दोन तीन दिवस मात्र बरा आहे. बरें असो; आमचें हें रोजचेंच आहे. (हात चोळून) आतां मला काय आज्ञा आहे ?

**रंगराव** – मी आपणास प्रथम असें विचारतों कीं, जर कोणी एका मनुष्यानें आज रात्रीं जागृतावस्थेंत एखादें अघोर कृत्य केलें असेल, आणि त्यास कधीं कधीं रात्रीस झोंपेंत फिरण्याची आणि बडबड करण्याची संवय असेल, तर तो, आज केलेली सर्व कृति उद्यां झोंपेंत असतांनां करील काय? आपण समजलानां, मी काय ह्मटलें तें?

**वैद्य** – आलें लक्षांत. झोंपेंत असून जागृत असल्यासारखे व्यवहार करण्याची ज्या लोकांस खोड असते, त्यांचे हातून जीं जीं कृत्यें रागाच्या आवेशांत किंवा वैर उगविण्याच्या हेतूनें होतात, तीं– ते दुसरे दिवशीं निद्रेंत बोलून किंवा करून दाखवितात; या गोष्टीचा अनुभव आह्मी पुष्कळ वेळ घेतला आहे.

**रंगराव** – तर मग आज रात्रीं आपणास आमचे बरोबर येऊन, एका गरिबाचे कामास मदत करावी लागेल.

**वैद्य** – असें रात्रीं येऊन मदत करण्याजोगें काय काम आहे बरें? दुखणेकऱ्याची प्रकृति पाहून त्यास औषध द्यावयाचें असेल, तर त्यास आतांचीच वेळ बरी आहे.

**रंगराव** – ठीक आहे, तसें कां होईना; आपण आतांच आमच्याबरोबर यावें, ह्मणजे आपणास सर्व हकीकत कळेल. ( त्रिवर्ग **सगुणाबाईकडे** जातात. )

**वैद्यबावानीं सगुणाबाईचे** घरीं येऊन तिची प्रकृति पाहिली, नंतर **रंगरावजीनीं** पूर्वीं झालेलें सर्व वर्तमान त्यांस सांगितलें.

**शामराव** – असा प्रकार आहे. याजकरितां आज रात्रीं दहा वाजायाचे सुमारास आपण त्रिवर्गही एथें येऊन, सारी रात्र **सगुणाबाई**जवळ राहूं, व असें केल्यानें आपला बेत दुसऱ्याचे लक्षांत येईल असेंही नाहीं. कारण, मला तर एथें आलेंच पाहिजे; हे बाईचे **वकीलच** आहेत, आणि आपण तर **वैद्यराज,** औषध देण्याच्या मिषानें कोणते वेळेस कोठेंही गेलांत, तरी ती गोष्ट कोणाचे मनांत देखील यावयाची नाहीं.

**वैद्य** – छे हो ! हे पोलीसखात्यांतले लोक असे हुशार असतात कीं, त्यांस कोणत्याही गोष्टीची इतकी ( आंगठा तर्जनीस लावून दाखवितात ) गुणगुण कळली पुरे, कीं त्यांनीं 'अथ' पासून 'इति' पर्यंत धोरण बांधलेंच समजा. **सुबरावाची** आणि **सत्यभामेची** आज सात आठ महिने मैत्री आहे, इतक्या दिवसांत त्याला काय तिच्या खोडी कळल्या नसतील? आपण तिघेजण एथें असल्याची खबर त्यास कळली, तर तो रात्रीस **सत्यभामेस** आपल्या खोलींत कोंडून ठेवील, आणि आपले आडाणी-

पणामुळें केलेला सर्व बेत फुकट जाईल. याजकरितां, आज रात्रीस आपला प्रवेश एथें गुप्त रीतीनें होईल अशी कांहीं युक्ति काढाल, तर उपयोग.

**सगुणा** – आमचे घरांतील स्वयंपाकीणबाईची मजवर फार ममता आहे, आणि ती प्रामाणिकही आहे; मीं तिला सांगून ठेविलें, ह्मणजे ती आपणांस मागीलदारचे चोरवाटेनें रात्रीस एथें आणून पोहोंचवील.

**वैद्य** – ( विनोदानें ) बाई, आह्मीं तिघेजण मध्यान्ह रात्रीचे सुमारास आपले वाड्यापाशीं लपत लपत आलों, आणि आपले मागीलदार उघडें नसल्यास बाहेरच फार वेळ उभे राहिलों, तर आह्मी दरोडेखोर आहों, असें गस्तीचे शिपाई समजतील, आणि आह्मांस कोठें तरी सुस्थळीं पोलीसचे ताब्यांत पोंचवितील! याजकरितां आमचे येण्याचे संधीस दरवाजापाशीं कोणी मनुष्य उभा करण्याचा बंदोबस्त आठवणीनें ठेवा हो. चोरट्यासारखे रात्रीस आंधारांतून पायीं फिरण्याचा आभ्यास आह्मास नाहीं, परंतु आपल्यासाठीं येवढें काम आह्मीं पत्करिलें आहे.

याप्रमाणें संकेत ठरल्यावर, रात्रीस **सुबराव** आणि त्याचा वकील **रावजी** हे उभयतां अतिशय मद्यपान करून घोरत पडले आहेत, व **सत्यभामा** आपल्या खोलींत स्वस्थ निजली आहे, असें पाहून, घरांतील स्वयंपाकीणबाईनें मागीलदाराची दिंडी उघडून **वैद्यबावा, वकील** व **शामरावजी** यांस आंत घेतलें, आणि त्यांस **सगुणाबाईच्या** खोलींत नेऊन पोंचविलें. **वैद्यबावानीं, सगुणाबाई** स्फुंदस्फुंदून रडत आहे, आणि कपाळ व हृदय बडवीत आहे, असें पाहून तिला आपले पोटाशीं धरिलें, आणि तिचें

शांतवन करून, तिला गोष्टी सांगण्याचे नादीं लावण्यासाठीं कांहीं प्रश्न विचारिले.

**वैद्य** – तुमची बहीण **सत्यभामा**, या खोलींत चोरवाटेनें आली होती, ह्या गोष्टीचें तुह्मांस पक्कें स्मरण आहे काय?

**सगुणा** – त्या गोष्टीचें मला चांगलें स्मरण आहे; परंतु, ज्या वाटेनें ती माझ्या खोलींत आली होती, ती वाट मात्र मला ठाऊक नाहीं.

**वैद्य** – तर मग, ज्या दारानें आपण आलों–तें दार चांगलें लावून आंतून कडी घाला, ह्मणजे पुढें काय चमत्कार होतो तो पाहूं.

**रंगरावजींनीं** खोली चें दार बंद करून त्यास कडी घातली, आणि दिव्याची वात किंचित् लहान करून ते वैद्यबावापाशीं येऊन बसताहेत, तों घड्याळांत एकाचा ठोका वाजला; तो ऐकून वैद्यबावा वगैरे तिघेजण घाईघाईनें पलंगाचे पडद्यामागें लपले, आणि **सगुणाबाई** आपले बिछान्यावर झोंप लागल्याचें मिष करून पडून राहिली. याप्रमाणें सर्व आपापल्या जागीं तयारी करून **भगवत्लीलेचा** अपूर्व चमत्कार पाहण्यासाठीं स्तब्ध आहेत, तों–इतक्यांत **रंगरावजी** यांची दृष्टि खोलींतील एका मोठ्या आरशाकडे गेली, आणि त्यांत दिव्याचें प्रतिबिंब पडलें होतें, तें हळुहळू आपणाकडे येत आहे, असें त्यांस दिसूं लागलें. कांहीं वेळानें त्यांची अशी खातरी झाली कीं, तो आरसा एका दारास बेमालुम रीतीनें बसविला आहे, आणि दार उघडूं लागल्यामुळें आरशांतील दिव्याचें प्रतिबिंब आलीकडे येत आहे. **वैद्यबावानीं** ही विलक्षण युक्ति पाहून त्यांस आश्चर्य वाट-

ले, आणि आपला उद्योग आतां सफळ होईल, असा त्यांस भरंवसा वाटून, त्यानीं आपले उभयतां मित्रांचे कानांत "स्व-स्थ असा, चळवळ करूं नका" ह्मणून हळूच सांगितलें. या गोष्टीस पांच पळें लोटलीं नाहींत, तों- तें आरशाचें दार पुरतें उघडून, आंतून एक भव्य स्त्री झुकत झुकत मद्यप्यासारखीं वांकडीं तिकडीं पावलें टाकीत खोलींत आली, आणि डोळे वटारून, हात लांब करून चहूंकडे चाचपूं लागली. तें विलक्षण स्वरूप पाहून **सगुणाबाई** अतिशय घाबरली, आणि भयानें जागचेजागीं कांपूं लागली. **सत्यभामेनें** प्रथम **सगुणाबाईच्या** बिछान्यावरील एक गिरदी आणि उशाखालची एक चित्रांची वही असे दोन पदार्थ बगलेंत मारले, आणि मोठ्या आनंदानें हांसून ह्मणाली कीं— "चला, हेंही काम संकेताप्रमाणेंच पार पडलें; आतां हीं दोन्हीं विहिरींत टाकून दिलीं, ह्मणजे ती टौळी **सगुणा** लवकरच भिकेस लागेल, आणि त्या कारट्याच्या शोकानें थोडक्याच दिवसांत बाबाच्या भेटीस जाईल." इतकें बोलून **सत्यभामा** आरशामागले चोरवाटेनें मागीलदारचे सज्जांत गेली, आणि जिन्यानें खालीं उतरून, बागेंत एक पडकी विहिर होती, तींत, ती गिरदी आणि चित्रांची वही टाकून, मनांत परम संतोष मानून ह्मणाली — " जा, आतां तुह्मी खालीं स्वस्थ असा, आणि आह्मी वरतीं स्वस्थ असतों."

**वैद्यबावा, रंगरावजी, शामरावजी** व **सगुणाबाई** हीं चौघें **सत्यभामेस** नकळतां तिच्या मागोमाग विहिरीपर्यंत गेलीं, तेव्हां तिचें तें कृत्य अवलोकन करून त्यांच्या आंगावर रोमांच उभे राहिले. **सगुणाबाईस** आपल्या पुत्राची अशीच अवस्था झाली असेल, असें समजतांच

तिचें दुःख दुणावलें, आणि तिनें पुनः पूर्ववत् शोकास आरंभ केला. 'अरे माझ्या बाळा! आतां मी काय करूं आणि कोठें जाऊं! धावारे धांवा, आतां काय पाहतां'! असें ह्मणून तिनें विहिरीकडे धांव घेतली, आणि आंत उडी टाकणार, तों—**शामरावजीनीं** पुढें होऊन तिला बळकट धरिलें, आणि धांवा! धांवा! ह्मणून मोठी आरोळी मारिली. इकडे **सत्यभामा** ही गलबल ऐकतांच शुद्धीवर आली, आणि आतां माझी गत कशी होईल, असें ह्मणून मोठा आक्रोश करून रडूं लागली. तेव्हां तो कर्कश शब्द ऐकून, जवळच बागेंतील माळी आणि त्याचा मुलगा असे दोघे आपल्या झोंपड्यांत निजले होते, ते जागे होऊन धांवत आले, तेव्हां त्यांस सांगितल्यावरून त्यांनीं विहिरींत उतरून, पाव घटकेंचे आंत **सगुणाबाईचा** मुलगा आणि तिच्या नांवच्या वारिसपत्राचा लखोटा—असे दोन्ही काढून तिचे स्वाधीन केले. **सगुणाबाईनें** मुलास पाहतांच बळकट मिठी मारिली, तेव्हां तिच्या आनंदास पार नाहींसा झाला.

**यशवंतरावजींच्या** बागेंत एक जुनी विहीर अगदीं कोरडी पडलेली होती, तिचा कांहीं उपयोग नाहीं असें समजून, माळी लोक व मोतद्दार प्रतिदिवशीं गवत, पातेरा, लीद वगैरे सर्व कचरा तींत टाकित असत; त्यायोगानें आंतील जागा चांगली मऊ असल्यामुळें, **सगुणाबाईच्या** मुलास फारसें न लागतां, तो सहा प्रहरपर्यंत आंत जिवंत राहिला होता. मग **वैद्यबावानीं** त्यास कांहीं औषध देऊन लागलाच सावध केला. **सत्यभामेनें** ज्या वेळेस मुलगा आणि वारिसपत्राचा लखोटा असे दोन्ही बगलेस

मारिले, त्यावेळेस मुलानें आपले चिमुकले हातांनीं त्या लखोट्यास मिठी मारिली होती, यामुळें, त्यास बाहेर काढिलें, तेव्हां त्याचेबरोबर लखोटाही निघाला.

**सगुणाबाई** ही आपले बहिणीचे सर्व अपराधांची क्षमा करून, तिला तिच्या कर्मानुसार राजदंड करविण्याचा उद्योग करणार नाहीं, असें **रंगरावजीस** वाटल्यावरून, त्यानीं **सगुणाबाईस** न विचारितां **सत्यभामेस** कोतवालाकडे रवाना केलें.

नंतर कांहीं दिवसांनीं या खटल्याची चौकशी होऊं लागली, तेव्हां, **सत्यभामेच्या** वकिलानें मोठ्या चतुराईनें तिजकडे कांहीं अपराध नाहीं, असें सिद्ध करून दाखविलें असतांही, **सगुणाबाईचे वकील रंगरावजी** यानीं, **सत्यभामेस** दोन वर्षें सक्त मजुरीची शिक्षा करण्यास लाविलें.

**सुबराव** हा लागलाच बर्तर्फ झाला, आणि पुढें एक वर्षाचे आंत, तो एका खुनाचे खटल्यांत सांपडल्यामुळें अंतकाच्या हातानें मरण पावला.

**परमेश्वरानें, सगुणाबाईचा** पुत्र काळाचे हातून परत आणून तीस दिला, व तिनेंही त्यास उत्तम रीतीनें लहानाचा मोठा केला. पुढें **सुंदरराव** फार चांगला गुणवान् झाला, तेणेंकरून ती पतीचे व बापाचे मरणाचें बहुतेक दुःख विसरली, आणि आपल्या शहाणपणाच्या बळावर तिनें लोकांत पुष्कळ कीर्ति मिळविली.

## ३.

## हिराबाइची सचोटी व राधाबाइचें कृत्रिम.

कांहीं वर्षांपूर्वी **बऱ्हाणपूर** शहरांत **गणपतसिंग** नांवाचे एक गृहस्थ राहत होते. त्यांस स्त्री, पुत्र, धन आदिकरून संसारसंबंधीं सुखाचीं सर्व साधनें अनुकूळ असल्यामुळें ते फार आनंदानें काल क्रमित असत; व प्रपंचसुख अगदीं अशाश्वत आहे, हें त्यांचे मनांत कधींच येत नसे. परंतु या गोष्टीचा अनुभव घेण्याचा प्रसंग त्यांस लवकरच प्राप्त झाला.

**गणपतसिंग** यांचा पुत्र **मोहनलाल** हा पांच वर्षांचा होण्याच्या पूर्वींच त्यांची स्त्री आकस्मात् मरण पावली; त्यायोगानें त्यांचें मन संसारांतून अगदीं उठलें; व तें-आईच्या वियोगामुळें दीन झालेलें बालक त्यांचे डोळ्यांपुढें नेहमीं असल्यामुळें त्यांस आपले आवडत्या स्त्रीचें स्मरण वारंवार होऊन, तिचें स्वरूप त्यांचे मनांतून जाईनासें झालें. उत्तरोत्तर त्या मनोव्याधीनें ते फारच व्याप्त होत चालले, आणि द्वितीय-संबंध करण्याविषयीं कोणी गोष्ट काढिली असतां त्यांस फार राग येऊं लागला. हें पाहून, त्यांचे परम मित्र **जगन्नाथ** ह्मणून होते, त्यानीं त्यांस देशांतरीं जाण्याची सल्ला दिली. **गणपतसिंग** आणि **जगन्नाथ** यांची मैत्री इतकी दृढ होती कीं, ते एकमेकांच्या शब्दास मान देत असत, आणि परस्परांच्या हितास अत्यंत जपत असत; यामुळें **गणपतसिंग** यानीं

आपले मित्राचे मर्जीसाठीं दूर-देशीं जाण्याचा निश्चय करून, आपले चुलते **रामसिंग** यांस आपला बेत कळविला.

**रामसिंग** हे **बऱ्हाणपुरच्या** राजाच्या लश्करांत एका मोठ्या हुद्द्यावर होते, यामुळें त्यानीं थोड्याच दिवसांत **गणपतसिंग** यांस शंभर स्वारांची सरदारी देऊन, कांहीं सैन्य दूर-देशीं जात होतें त्यासमागमें त्यांची रवानगी केली. **गणपतसिंग** हे धीट, चंचल आणि मेहनती होते, यामुळें त्या लश्करी चाकरींत त्यांचें मन लवकरच चांगलें रमलें; व, इतर थोरथोर सरदारांप्रमाणें आपणही मोठमोठ्या कामगिऱ्या बजावून उदयास यावें आणि मोठी कीर्ति मिळवावी, अशी त्यांस इच्छा उत्पन्न झाली. ते लहान हुद्द्यावर असतां, कामकाजाचे व आणीबाणीचे प्रसंगीं नेहमीं पुढें सरसावत, आणि आपणाकडे सोंपविलेलें काम मनापासून करीत. याप्रमाणें सुमारें वीस पंचवीस वर्षें चाकरी करून **गणपतसिंग** हे मोठ्या योग्यतेस चढले, आणि राजानें त्यांस दुय्यम सेनापतीचा हुद्दा देऊन "समशेर बहाद्दर" असा किताबही दिला. **गणपतसिंग** हे जरी आटोकाट शहाणे नव्हते, तरी शौर्य, स्मृति आणि सदाचरण, हे तीन गुण त्यांचे आंगीं पूर्ण वसत होते, व कामकाजांत कोणी तरी एखादा चतूर मनुष्य हाताशीं धरून, त्याचे मतानें चालत होते, ह्मणून त्यांची फार प्रख्याति झाली. परंतु, पुढें जेव्हां इतकें मोठें काम आपणाकडे आलें, आणि तें आपल्या हातून बरोबर रीतीनें चालणार नाहीं, असें त्यांस वाटूं लागलें, तेव्हां त्यानीं **जगन्नाथ** व इतर मित्रमंडळीचें अनुमोदन घेऊन, शरीर अशक्त झाल्याची सबब पुढें केली, आणि चाकरीचा राजीनामा देऊन, स-

रकारांतून दहा हजार रुपयांची सालीना नेमणूक करून घेतली.

**गणपतसिंग** यानीं राजाची चाकरी सोडल्यावर, ते **बऱ्हाणपूर** एथें आपले घरीं येऊन राहिले, आणि आनंदानें काळ घालवूं लागले; परंतु पूर्वींप्रमाणें कामकाजाप्रकरणीं कोणताही वेध त्यांचे पाठीस नसल्यामुळें त्यांस चैन पडेनासें झालें. एके दिवशीं ते विचार करीत बसले असतां, त्यांचे मनांत असें आलें कीं, आपण पुनः एक वेळ लग्न करण्याचें मनांत आणिलें असतां, योग्यतेनुरूप स्त्री मिळून, पाहिल्या स्त्रीबरोबर पूर्ववयांत ज्या सुखाचा अनुभव घेतला होता, तें सुख आतांही प्राप्त होईल.

परंतु, उत्तर-वयांत लग्न करणारानें ह्या गोष्टी मनांत ठेविल्या पाहिजेत कीं, वराचा हेतु— तरूण आणि रूपवती स्त्री आपणास मिळावी असा असतो, आणि स्त्रियांस— वयस्क पति आपणास न मिळेल तर बरें होईल, असें वाटत असतें. तसेंच निस्पृह आईबापांचेंही लक्ष तरूण आणि कुलीन जामात मिळण्याकडे विशेष असतें.

**गणपतसिंग** यांचा हेतु असा होता कीं, आपणास तरूण, रूपवान् आणि बरोबर पुष्कळ हुंडा आणणारी अशी स्त्री मिळावी; परंतु त्यांचे वयस्कपणामुळें तो योग आला नाहीं. कित्येक भिक्षुक लोकांत अशी चाल असते कीं, एखादे दिवशीं भोजनाचीं दोन तीन आमंत्रणें आलीं असतां, जिकडे उत्तम पक्वान्नांचा लाग असतो तिकडे ते जातात; परंतु ज्या दिवशीं घरीं जेवावें लागतें, त्या दिवशीं पुरणाच्या पोळीचें परान्न जरी मिळतें, तरी बरें

होतें, असें त्यांस वाटूं लागतें. **गणपतसिंग** यानीं वधूविषयीं पुष्कळ तजविज केली, परंतु मनाजोगें स्थळ कोठेंच आढळलें नाहीं. शेवटीं, त्यानीं एका गरीब मनुष्याच्या कुरूप आणि दुष्ट कन्येशीं लग्न करून आपला जीव घोरांत घातला; कारण, **गणपतसिंग** यांची नवी स्त्री **राधाबाई** हिनें घरांत पाय ठेवतांच, आपल्या सापत्न पुत्राचा द्वेष करण्यास आरंभ केला.

ह्या गोष्टीस सुमारें सातआठ वर्षे झाल्यावर, **मोहनलाल** यास राजाचे लश्करांत रिसालदारीचा हुद्दा मिळाला, आणि तो आपले रिसाल्याबराबर कामकाजास आणि स्वारीशिकारीस जाऊं लागला. ही गोष्ट त्याचे सापत्न मातेस मोठी सुखावह झाली; कारण, ती आपले मनांत असें समजूं लागली कीं:--'**मोहनलाल** यास, बापाप्रमाणें कीर्ति मिळविण्याची फार हौस आहे, यामुळें तो हूडपणा करून एखाद्या युद्धप्रसंगांत पुढें सरसावेल, व शत्रूच्या तावडींत सांपडून लवकरच मरेल; आणि मग असें झाल्यावर, **गणपतसिंग** यांचे मागें माझा पुत्र सर्व संपत्तीचा मालक होईल, आणि त्याच्या बाल्यावस्थेंत सर्व मुखत्यारी मजकडे राहील.'

**बऱ्हाणपूर** शहरांत पूर्वींपासून अशी चाल होती कीं, श्रीमान् लोकांची सर्व संपत्ति वडील घराण्यांतील पुत्राच्या वंशास प्राप्त होत असे. यामुळें, **राधाबाई** ही, **मोहनलाल** यास संतति होईल या भयास्तव, त्याचे लग्नाची गोष्ट **गणपतसिंग** यानीं काढिली, ह्मणजे नेहमीं मोडून काढित असे.

**गणपतसिंग** यांस पूर्वी एका युद्धप्रसंगांत, शत्रूकडील बाजारबुणगे लुटतांना, एक लहान मुलगी सांपडली होती, तिचें त्यानीं स्वतःचे पुत्राप्रमाणें संगोपन करून, तिजकडून **मोहनलाल** याजबरोबर विद्याभ्यासही करविला होता. **राधाबाईस** ही मुलगी अगदीं आवडत नसे, यामुळें **गणपतसिंग** यानीं तिला, '**हिराबाई** इकडे ये,' अशी प्रीतीनें हांक मारिली असतां, **राधाबाईस** संताप होयी. तिनें, **हिराबाईकडून**, घरांत चाकरलोकांप्रमाणें काम करवावें, आणि दिवसांतून एक प्रहर आपले मुलांस लेखनवाचन शिकविण्यास बसवावें; वस्त्रपात्राविषयीं तिचे फार हाल करावे, आणि हलक्या भाषणांनीं नेहमीं तिचें मन दुखवित असावें. परंतु **हिराबाइचें** मन विद्येच्या संस्कारानें फार शांत झालें होतें. तिनें आपल्या धर्ममातेचा सर्व जाच सोसून, होईल तितकें काम आनंदानें करावें, आणि तिच्या मुलांस नानाप्रकारच्या युक्तिप्रयुक्तींनीं विद्येच्या नादास लावावें. कधीं **बाईची** आज्ञा घेऊन बागेंत फिरावयास न्यावें. कधीं कल्पित किंवा पुस्तकांत वाचलेल्या लहान मुलांच्या गोष्टी त्यांस सांगून, सत्य आणि दया हे गुण त्यांच्या मनांत ठसवून द्यावे. सारांश, तिचें वय अगदीं लहान असून, तिच्या ज्ञानाची प्रौढी विलक्षण होती, आणि तिला आनंदानें काळ घालविण्याची युक्ति उत्कृष्ट साधली होती. असो; याप्रमाणें **गणपतसिंग** यांची धर्मकन्या आपल्या मातापितरांचे मर्जीप्रमाणें वागत असतां, एके दिवशीं, काळानें आपणाकडे वक्र दृष्टीनें पाहिलें, असें तिला वाटलें.

**मोहनलाल** आणि **हिराबाई** ही उभयतां एकाच छायेखालीं लहानाची मोठीं झालीं, यामुळें त्यांस परस्परांच्या गुणदोषांची चांगली माहिती होऊन, त्यांची परस्परांविषयीं प्रीति दिवसेंदिवस इतकी वृद्धिंगत होत चालली कीं, एकास दुसऱ्यावांचून चैन पडेनासें झालें. शेवटीं, एके दिवशीं **मोहनलाल** यानीं **हिराबाई** एकटीच बसली आहे अशी संधि पाहून, तिला आपला मनोभाव कळविला.

**मोहनलाल** – हिराबाई, आजचा रंग मला कांहीं विपरितसा दिसतो ! आज तूं अशी उदास कां आहेस, तें खरेंच सांग पाहूं; हा पूर्ण-चन्द्र अभ्रांनीं आच्छादिलेला मी आजपर्यंत कधींच पाहिला नाहीं, ह्मणून विचारितों.

**हिराबाई** -- ( गालांत हांसून ) शाबास, मी तुह्मांस जो प्रश्न करणार, तो तुह्मी मलाच करितांना! खरेंच. आलीकडे तुमचे वृत्तींत असा पालट कां पडला आहे बरें ? कांहीं तरी कारण झालें असावें; आतां एकवेळ मोठें मन करून सांगाच; मग कसेंही असो. मला सांगितलें तरी, मी कोणाशीं बोलणार नाहीं.

**मोहनलाल** – ( सुस्कारा टाकून ) ज्याचे हातून एखादें संकट दूर होण्याजोगें असेल, त्यास तें सांगितलें तर त्याचा उपयोग; तुला सांगून काय करावयाचें आहे !

**हिराबाई** – एकूण माझी इतकीचना किंमत ! ( विनोदानें ) हो, ठीकच आहे. कालेंकरून सर्व पदार्थांच्या किंमती कमजास्ती होत असतात, त्याप्रमाणेंच हीही गोष्ट समजली पाहिजे; आणि,आलीकडे जिकडेतिकडे लोक, उपयो-

गैरउपयोगाचा विचार सर्व बाबतींत करूं लागले आहेत, याकरितां ज्या कामांत माझा उपयोग होण्याजोगा नाहीं, त्या कामाविषयीं तुह्मीं मजपाशीं बोलत नाहीं, हें योग्यच आहे.

**मोहनलाल** — पुरे पुरे, पुष्कळ पूजा झाली! आतां माझें चित्त स्वस्थ नसण्याचें कारण सांगतों, ऐक. गतवर्षी **आशीरगडच्या** आसपास **भानूजी नाईक** रामोशानें मोठें बंड केलें होतें, तें मोडून त्यास घेऊन आह्मीं परत आल्यापासून, त्याचा मुलगा **रघोजी नाईक** यानें त्या प्रान्तांत अनर्थ उडविला आहे. यासाठीं गेले शुक्रवारीं **आयुबखानाच्या** आणि आमच्या रिसाल्यांस असा हुकूम झाला आहे कीं, हुकुमाचे तारखेपासून दोन महिन्यांचे आंत तयारी करून **आशीरगडास** निघून जावें, आणि **सातपुड्या**-जवळच्या प्रांतांतील दंगा अगदीं मोडून, स्वस्थता होईपर्यंत तेथेंच रहावें. आतां, तूं ह्मणशील कीं, शिपायगिरीच पत्करली आहे, त्यापेक्षां आलेली कामगिरी बजाविली पाहिजे; तर ती गोष्ट मलाही मान्य आहे, आणि अशा जिवावरच्या चाकऱ्या मी आजपर्यंत केल्याही आहेत; परंतु, त्या प्रसंगांत आणि आजच्या प्रसंगांत पुष्कळ अंतर आहे. ( सुस्कारा टाकून स्तब्ध राहतो. )

**हिराबाई** — ( मनांत दुःखी होते, परंतु बाहेर दाखवित नाहीं. ) त्या आणि ह्या प्रसंगांत कोणतें अंतर आहे बरें? त्या वेळेस तर तुमच्या एकाच रिसाल्यानें **भानूजी नाइकास** धरून आणिलें, आणि आतां तर लहानसें काम असून, सोबतीस **आयुबखान**ही आहे.

**मोहनलाल** – काय सांगूं हिराबाई! माझे हृदयांत हल्लीं जे तरंग उठताहेत, ते जर तुझे दृष्टीस पडते, तर तुलाही मजसारिखेंच वाटलें असतें. असो, ईश्वरेच्छा. माझे मनांत, एक गोष्ट तुला ऐकवावयाची आहे, परंतु ती तोंडाशीं येऊन मागें जाते, यामुळें माझा इलाज नाहीं. आजपर्यंत तुजपाशीं कोणतीही गोष्ट बोलण्यास मला संकोच वाटला नाहीं, परंतु आज – ( स्तब्ध राहतो; व त्याचें मुख म्लान होतें. )

**हिराबाई** – तर मग आतां बोलाच काय तें. पुरें झालें हें वाक्कौशल्य; हं, होऊं द्या मनाचा खुलासा एकदांचा.

**मोहनलाल** – ( आनंदी होऊन ) तर मग मी तुला एक प्रश्न विचारितों; याचें उत्तर सांग कसें ! तुझे मनांतून लग्न कर्तव्य आहे, किंवा तूं अशीच राहणार ?

**हिराबाई** – हं हं हं, ही ग कोण बाई विचारण्याची तऱ्हा! लग्न करणार कीं अशीच राहणार ह्मणजे? बाबांनीं आणि तुह्मी हा विचार करावयाचा कीं मी ?

**मोहनलाल** – या पुढील मार्गशीर्षांत तुझें लग्न व्हावें, असें आमचे मनांत आहे, आणि आह्मी ( गालांत हांसून ) सर्व योजनाही करून ठेविली आहे.

**हिराबाई** – एकूण वरयोजना झाली आहेना ? आतां वाग्निश्चयाचा बेत कधींचा आहे.

**मोहनलाल** – तुझें सम्मत असल्यास आजच कां होईना, आणि आतांच कां होईना ! वधु आणि वर सन्निध असल्यावर वाग्निश्चयास विलंब कशास पाहिजे ?

**हिराबाई** – ( **मोहनलालचा** मनोभाव समजते. ) परंतु, वधु आणि वर सन्निध असतील तेव्हांनां ! वरास ठिकाण नाहीं, आणि वाग्निश्चयाच्या गोष्टी सांगून काय उपयोग आहे ? मला पक्कें ठाऊक आहे कीं, बाबा मला एखाद्या मूर्ख आणि कुरूप मनुष्याच्या गळ्यांत बांधणार नाहींत.

**मोहनलाल** – ( आनंदानें ) बाबानें तुजसाठीं मजसारिखा वर योजिला असला तर ?

**हिराबाई** – रूपानें आणि गुणांनीं तुह्मासारिखा पति मिळाला, तर मग आणखीं काय पाहिजे ? परंतु मला गरिबाला तुमच्यासारखे मोठ्या कुळांतले कोणी गृहस्थ पत्करणार नाहींत, हें उघडच दिसत आहे.

**मोहनलाल** – ( मोठ्या आयासानें ) तर मग मला वाटतें कीं, बाबानें तुला आपली सूनच केली, तर त्यांत तुझा संतोष राहील ? **हिरा,** आतां तूं समजून उमजून माझा अंत कां पाहतेस बरें ? लहानपणापासून आपण एकमेकांवर बहीणभावंडांपेक्षांही जास्त प्रीति करीत आलों, आणि बाबानेंही तुला आपल्या कन्येप्रमाणें मानून तुझें आजपर्यंत पालनपोषण केलें; परंतु आतां तुला सोळावें वर्ष लागेल, यामुळें आह्मांस अशी काळजी पडली आहे कीं, तुझ्यासारखें अमोलिक रत्न कोणाचे गळ्यांत बांधावें ! आणि तुला दुसऱ्याच्या स्वाधीन केल्यानंतर, तुझ्या वियोगाचें दुःख विसरण्यास काय युक्ति योजावी ? **हिरा,** मला वाटतें, ही आमची काळजी निवारण्यास एक फार उत्कृष्ट युक्ति आहे, परंतु ती तुला मात्र आवडली पाहिजे.

आतां मी मोठें मन करून बोलतोंच, मग कसेंही असो; आपण उभयतां आजपर्यंत बहीणभावंडांप्रमाणें वागलों खरें, परतु, तूं आणि मी सहोदर नसून एका कुळांतीलही नाहीं, याजकरितां इतःपर तो कल्पितपणा एकीकडे ठेवून, आपण उभयतां खरे आप्त होऊं !! ह्मणजे वर सुचविलेल्या सर्व अडचणी दूर होतील! समजलीस माझे बोलण्यांतील भाव ?

याप्रमाणें **मोहनलाल** हा युक्तीच्या वाटेनें, **हिराबाईस** आपले मनांतील हेतु सुचवीत असतां, त्याची सावत्र मातोश्री खोलीचे दाराशीं हळूच कानोसा घेत उभी राहिली होती, तिनें त्या उभयतांचीं सर्व भाषणें ऐकिलीं, आणि तेव्हांपासून तिनें **हिराबाईच्या** निष्कलंक आचरणास हरतऱ्हेनें डाग लावण्याचा निश्चय केला.

दुसरे दिवशीं **राधाबाई** आणि **हिराबाई** ह्या दोघी संध्याकाळचे सुमारास गाडींत बसून, गांवाबाहेर **देवीचे** दर्शनास जात असतां, **राधाबाईनें** आकस्मात् गाडी उभी करवून, **हिराबाईस** ती नानाप्रकारचीं दुरूत्तरें बोलूं लागली.

**राधाबाई – हिरे**, अगे, तूं आमच्या येथें आलीस तेव्हां तुझ्या तोंडावरची माशी देखील उडत नव्हती, आणि आतां तुला हे चाळे आठवले आहेत काय? तूं अशा गुणांची निघशील असें मला पूर्वींच समजतें, तर मी तुला कधींच वाटेस लाविलें असतें; माझ्या मुलास धुळाक्षर शिकविण्यासाठीं, दिवाणखान्याजवळचे खोलींत बसाव-

याची मी तुला परवानगी दिली, ह्मणूनना तुला असे वेडे-वेडे ढंग करावयास संधि फावली? आह्मी आजपर्यंत पोटच्या पोराप्रमाणें तुला वागविलें, त्याचा परिणाम असा व्हावा काय? परंतु तूं काय करशील! या असल्या आगलाव्या पोरींचीं कामेंच हीं; तूं जेव्हांपासून अशी वेणीफणी करून थाटमाट करूं लागलीस, आणि जरीकांठी चोळ्या फलकावूं लागलीस, तेव्हांच मी ताडिलें कीं, एथें कांहीं तरी काळेंबेरें असावें; त्या वेळेसच जर तुला दोन पावलें दूर ठेवण्याचें मला सटविला सुचलें असतें, तर असें कां होतें? असो. आतां मी पुरती जागी झाल्यें, समजलीस? याजकरितां तूं इतःपर आमच्या **मोहनकडे** पाहून सोंगें ढोंगें केलीस तर खबरदार. ( **हिराबाई** बोलणार इतक्यांत ) अगे, पुनः आणखीं माझ्यासमोर नाक वर करून बोलतेस; तूं तोंडांतून एक शब्द काढशील तर माझ्या कामास पडणार नाहीं. हें ग काय बाई, ज्याचा अपराध करावा त्यास पोटभर बोलूं देखील देऊं नये! ही कुठली चाल!

**हिराबाई** — बाई, तुह्मास इतका राग येण्याजोगा मी कोणता अपराध केला आहे बरें?

**राधाबाई** — कोण बाई निर्लज्ज आहे ही पोरगी! तुला बोलूं नको ह्मणून हजारदां सांगितलें, तरी पुनः तेंच. परवां, मीं तुला आणि **मोहनला**, माझ्या लेंकरांच्या देखत, शाळेच्या खोलींत लाडीगोडीच्या गोष्टी बोलतांनां पाहिलें, तें विसरलीस काय? थांव तूं, आतां लवकरच मी तुझी चांगली सोय करित्यें.

**हिराबाई** – बाई, माझे हातून इतका रागें भरून घेण्याजोगा अपराध झाला नाहीं, असें मला वाटतें; असें असून आपण बोलूंच लागलां, तर मला ऐकून घेतलें पाहिजे; कारण, मी आपल्या अन्नवस्त्राची ओशाळी आहे. **मोहनलाल** हे मजपाशीं कांहीं गोष्टी बोलले, त्या मी ऐकून घेतल्या हा माझा दोष नाहीं; कारण, जशा तुह्मी तसेच ते माझे अन्नदाते आहेत, आणि त्यानीं ती गोष्ट आपले वडिलांचे सांगण्यावरून मजपाशीं काढिली होती. या गोष्टीची खातरी पाहिजे असल्यास, आपण बाबाचे तोंडून करून घ्यावी.

**राधाबाई** – मला काय गरज पडली? मी अशा मूर्ख लोकांच्या नादीं लागत नसतें. तें ह्मातारडें हवें तें बोलेल, आणि लोकांसही बोलूं देईल; कदाचित् तुझें नटणेंमुरडणें पाहून तो देखील तुझे नादीं लागला असेल; परंतु याचा बंदोबस्त आतां मी लवकरच करीन. ( **हिराबाई** बोलावयास जाते तोंच ) मी नको नको ह्मणत असतां, तूं पुनःपुनः तोंडास तोंड देण्यास सरसावतेस, याचा परिणाम मला नीट दिसत नाहीं. संभाळ, नाहीं तर मला, तुला गाडीबाहेर लोटून द्यावें लागेल.

**हिराबाई** – बाई, मी निर्दोषी आहें.

**राधाबाई** – कोण बाई निरगट्ट आहे ही अवदसा! मी तुला एकदां, दोनदां, तीनदां सांगितलें कीं, मला तुझ्या बोलण्याचा तिटकारा आला आहे, असें असून, पुनःपुनः तुझ्यानें तोंड उघडवतें तरी कसें? मी तुला

आतां हजार गोष्टींतली एक गोष्ट सांगतें कीं, तूं ज्या मतलबांत आहेस, तो मतलब तुला साध्य होणार नाहीं समजलीस? कारण, आमचा **मोहन** उद्यां आपल्या रिसाल्याबरोबर निघून गेला आणि एखाद्या लढाईंत गोळी लागून पडला, ह्मणजे माझा **रामकृष्ण** त्याचें सर्वस्व बळकावून बसेल, आणि तुझ्या हातीं नरोटी येईल, समजलीस! आतां, तुला त्यांचा कांहीं भरंवसा वाटत असेल, तर ते काय पिकलेलें पान, आज आहेत आणि उद्यां नाहींत.

**हिराबाई** – ( श्रमी होऊन सुस्कारा टाकिते ) अरे **देवा**! बाई, आपल्याच्यानें असें भलतें भलतें बोलवतें तरी कसें?

**राधाबाई** – वाहव्वा! तें काय पुसावें! कोणी ह्मणेल सर्व जगांतील कोमलपणा हिच्याच ह्रदयांत सांठवला आहे. लबाड बायका अशाच लाघवी असतात; पुरे आतां हीं ढोंगें. छोटू, चल हांक गाडी.

**हिराबाई** – बाईसाहेब, मला काहो असें भाषण! ( रडूं लागते. )

**राधाबाई** – हो, हो, तुला. तूं झालीस ह्मणून काय झालें? खबरदार, तोंडांतून ब्र काढशील तर.

**हिराबाई** – मी कधीं जन्मांत ऐकिले नाहींत ते शब्द आपण आज ऐकवितां, तेव्हां माझ्यानें उगीच कसें राहवेल? आपण जीं जीं विशेषणें मला दिलींत, तीं मला कांहीं शोभत नाहींत, हें मी आपणास खचित् सांगतें.

**राधाबाई** – शाबास! याचें नांव काम! ज्याचें अन्न खावें, त्यासच लबाड ह्मणावें. असो, माझे तोंडावर मला लबाड ह्मणणारी मला आजपर्यंत कोणी भेटली नव्हती. मी लबाड, आणि ही मात्र खरी!

**हिराबाई** – नाहीं, मी तसें ह्मटलें नाहीं; आपणास माहीतच आहे कीं, मला असले हलके शब्द बोलण्याचा अभ्यास अगदीं नाहीं.

**राधाबाई** – नाहीं, तुला हलके शब्द बोलतांच येत नाहींत, आणि मला मात्र येतात. हाचना तुझ्या बोलण्याचा अर्थ?

**हिराबाई** – या गोष्टीचा विचार आपणच करावा. सटवी, अवदसा वगैरे जे जे शब्द आपण उच्चारिले, त्यांसच हलके शब्द ह्मणतात असें मला वाटतें.

याप्रमाणें कांहीं वेळ बोलणें झाल्यावर, अशा बोलण्यानें योजिलेल्या कार्यास विघ्न येईल, असें **राधाबाईस** वाटून तिनें आपली जीभ आटोपिली. परंतु तिचें तें उग्र स्वरूप पाहून, **हिराबाईस** असा धाक पडला कीं, आतां ही रागाचे आवेशांत मला मारील किंवा गाडीखालीं ढकलून देईल कोण जाणें!

**राधाबाईचें** चित्त सदासर्वकाळ स्वार्थसाधनाकडे असे, यामुळें, दुसऱ्याचे मनांतली गोष्ट कशी काढून घ्यावी, आणि कोणी कितीही मर्मभेदक भाषण केलें, तरी त्याचा राग न मानितां, शांततेचा आव कसा घालावा– हें तिला फार चांगलें साधलें होतें. तिनें **हिराबाईचे** शेवटचे शब्द ऐकतांच, मोठ्यानें हांसून

आपल्या मनांतील राग अगदीं गेला असें दाखविलें; व पुनः बोलूं लागली:-

**राधाबाई** – असो, आतां झालें तें झालें; पोरपणांत अशा गोष्टी घडतच असतात; परंतु, 'इतःपर मी **मोहनशीं** अगदीं भाषण करणार नाहीं, आणि त्याच्या वाऱ्यास देखील उभी राहणार नाहीं.' असें तूं मला वचन दे, ह्मणजे मी तुझ्या पूर्वींच्या सर्व अपराधांची क्षमा करीन.

**हिराबाई** – ( रागानें ) मला असें वचन देण्याची गरज काय ? आणि आपणासही मजवर इतका अम्मल चालविण्याचा संबंध काय ?

**राधाबाई** – ( शांततेनें ) संबंध मिळून इतकाच कीं, तूं आजपर्यंत मला वडील समजून माझें ऐकत आलीस, आणि मी तुजशीं त्याप्रमाणेंच वागत गेल्यें.

**हिराबाई** – आपण वडीलपणाच्या नात्यानें ज्या गोष्टी सांगत आलां, त्यांपैकीं ज्या ज्या मला योग्य दिसल्या त्याच मी ऐकिल्या, आणि इतःपरही त्याप्रमाणेंच करीन; परंतु ज्या गृहस्थानें मला आपली धर्मकन्या मानून हा दिवस दाखविला, त्याच्या प्रत्यक्ष पुत्राशीं मी विनाकारण अबोला धरावा, ही कृतघ्नतेची गोष्ट माझे हातून कधीं होणार नाहीं.

**राधाबाई** – असें काय ! ( पुनः किंचित् रागावून ) तर मग तुझ्या हलकटपणाची पराकाष्टा झाली.

**हिराबाई** – बाईसाहेब, आतां मला हीं भाषणें सोसवत नाहींत, याजकरितां कृपाकरून मला गाडीखालीं

उतरूं द्याल तर बरें होईल ! मी आपले आश्रयानें इतके दिवस आहें, परंतु कधीं कोणाशीं कारणावांचून बोलल्यें किंवा कोणाकडे पाहिलें असलें तर सांगा; उगीच एखाद्याशीं चावटपणा करित बसणें हा माझा स्वभाव नाही, आणि **मोहनलाल** यांशीं मी होऊन कधीं भाषणही केलें नाहीं. आतां, त्यानींच होऊन मला एकदोन वेळ कांहीं गोष्टी विचारिल्या, त्यांचें उत्तर देणें मला प्राप्त झालें.

**राधाबाई** – त्यानें तुला काय विचारिलें आणि तूं काय सांगितलेंस ?

**हिराबाई** – त्यांचे मनांतील हेतु तुह्मास ठाऊकच आहे; मी सांगावा असें नाहीं; आणि मला आपली सून करावी असा बाबांचा बेत आहे.

**राधाबाई** – खासें ! खासें ! मग तर मोठा उत्कृष्ट जोडा जमला. ( हळूच फुटफुटते ) बनातीच्या आंगरख्यास कांबळ्याचें ठिगळ. ( मोठ्यानें ) तुला **मोहनचें** बोलणें खरें वाटतेंना पण ?

**हिराबाई** – यांत काय संशय ! ते तसेच प्रामाणिक आहेत; परंतु मी त्यांस असा जबाब दिला कीं, आपण श्रीमान् आणि मी गरीब, तेव्हां बनातीचे आंगरख्यास कांबळ्याचें ठिगळ कसें शोभेल ! तेव्हां त्यानीं लागलेंच बाबांस बोलावून आणून, त्यांजकडून माझी खातरी करविली कीं, आमचा उभयतांचा योग होण्यास त्यांची प्रतिकूलता नाहीं; आमचीं तिघांचीं भाषणें चाललींच होतीं, इतक्यांत आपली स्वारी आली.

**राधाबाई** – बरें. मग पुढें तुमचा कसा काय बेत ठरला ?

**हिराबाई** – माझा गरिबाचा बेत तो काय ठरावयाचा आहे ? मीं उभयतांसही स्पष्ट सांगितलें कीं, या जन्माच्या गांठी आहेत, याजकरितां जें करणें तें विचारपूर्वक केलें पाहिजे; नाहीं तर आपल्या अविचाराचीं पारणीं आझास जन्मभर फेडावीं लागतील.

**राधाबाई** – इतकेंच ?

**हिराबाई** – आतां आपल्याशीं ह्मणजे मी खुलाशानें बोलावें, असें आपलें परस्परांचें प्रेम राहिलें नाहीं, परंतु, ज्यापेक्षां या वक्रतेचा पाया आपलेच हातून रचला गेला आहे, आणि मजकडून अझूनपर्यंत कोणतीच आगळीक झाली नाहीं, त्यापेक्षां झालेलें वर्तमान सांगतें; ऐका :– मला बाबांचे समक्ष **मोहनलाल** यांनीं ही गोष्ट विचारिली, तेव्हां मी त्यांस सांगितलें कीं, आजपासून एक वर्षानंतर तुमची प्रीति माझे ठिकाणीं आहे तशीच राहिली, तर मी तुमची आहें; आणि मी असेंही सुचविलें कीं, इतःपर तुह्मी आणि मी एका घरांत राहण्यांत शोभा नाहीं, कारण, दुसऱ्याची कीर्ति हरण्यास जनास विशेष निमित्त लागत नाहीं.

**राधाबाई** – वाः ! एकूण या नाजूक कामांत तूं मोठी अक्कल चालविलीस ! शाबास तुझी !

**हिराबाई** – कसेंही ह्मणा. झालेली हकीगत आपण विचारिलीत ह्मणून सांगितली.

**राधाबाई** – नाहीं, हो, तें ठीकच आहे. ( हळूच आपल्याशीं बोलते. ) आतां समजल्यें काय तें. ( पुनः मोठ्यानें ) पण तूं मघां ह्मटलेंस त्याप्रमाणें आह्मांस सोडून जाणार कीं काय ?

**हिराबाई** – बाईसाहेब, आतां माझें चित्त स्वस्थ नाहीं, याजकरितां आपले प्रश्न संपले नसले, तरी मी आपलीं उत्तरें संपविल्यें, ह्मणजे बोलणें वाढणार नाहीं.

**राधाबाई** – हँ, हँ, आतां मी समजल्यें! तुह्मी तिघेंजण शहाणीं एक झाल्यावर मग त्या बेतांत पाहणेंच नको. **मोहनचा** मुक्काम अझून एक महिनाभर एथें आहे, तितक्या दिवसांत तुह्मी निदान एकदोन वेळां तरी एकमेकांस भेटाल; तें ह्मातारडें तुमच्या पुढें पुढें नाचेल; **मोहन** तुझ्याजवळ येऊन रडेल, बकेल, आणि तुह्मी उभयतां एक व्हाल, हें उघडच दिसतें; आणि असें केल्यावांचून त्या राजेश्रीस कोठचें चैन पडावयाचें आहे; तो एक वेळ आपली तरवार बरोबर नेण्यास आळस करील, परंतु, इतःपर तुजवांचून त्याचें क्षणभर देखील चालणार नाहीं. बरें असो; मला त्या गोष्टीची उठाठेव कशाला पाहिजे? ( सुस्कारा टाकून ) जसजसें व्हावयाचें असेल तसतसें होईल! (गाडीचे पुढील बाजूचें तावदान उघडून गाडीवाल्यास हाक मारते ) छोटू, छोटू.

**गाडीवान** – बाईसाब काय आज्ञा आहे ?

**राधाबाई** – मला **विठ्ठलदास** जव्हेरी याचे घरीं उतरावयाचें आहे समजलास ? मागले दाराशीं गाडी उभी कर, पुढले दाराशीं पुरुषांची दाटी असेल.

**गाडीवान** – बाइसाब, **विठ्ठलदास शेटचें** दुकान कोठेंसें बरें आहे? गेल्या आदितवारीं सरकारस्वारी भोजनास आली होती तेंचना घर.

**राधाबाई** – होय तेंच. बाहेरल्या बाजूस हिरवा कठडा आहे, आणि पायऱ्यांचे दोन बाजूंस फुलझाडांच्या कुंड्या ठेविल्या आहेत, तें घर; समजलास आतां?

**गाडीवान** – जी बाइसाब आतां नको सांगायला.

**राधाबाई** – ( **हिराबाईकडे** तोंड फिरवून, आपला राग गेला असें दाखविण्यासाठीं बोलूं लागते ) हें पहा **हिरे**, मी घरून निघाल्यें तेव्हांच मी रागांत होत्यें, यामुळें दोन शब्द कमजास्ती बोलल्यें, त्याचा कांहीं राग मानायला नको; मला मेली ही संवयच पडून गेली आहे– ज्यावर त्यावर तोंड टाकायची. तुमचे तिकडे कांहीं का होईना. त्यांत मन घालायची मला काय गरज आहे? आणि मी उगाच कशाला तुमच्याशीं वाईट होऊं? ( असें ह्मणून मोठ्या दिमाखानें तक्क्याशीं टेकून बसते.)

**हिराबाई** – पण बाई मला इतःपर आपल्या एथें राहणें नको, ह्मणून मी मघांच विनंती केली आहे, ती ध्यानांत असेलच.

**राधाबाई** – तें नीटच आहे; जेथें आप्तपणा होण्याचा रंग दिसूं लागला, तेथें इतर संबंध शोभेनासे होतात. असो, चल आपण **शेटाणीस** (**विठ्ठलदास** यांचे स्त्रीस) भेटून येऊं; आणि मला **शेटजीशींही** थोडेंसें काम आहे.

**हिराबाईच्या** मनांत या दुष्ट यजमाननीचा संग कधीं सुटेलसें झालें होतें, यामुळें त्या जव्हेऱ्याच्या दुकानांत जाण्यापेक्षां, ती परत येईपर्यंत, गाडींतच बसून राहण्याचें तिच्या मनांत होतें; परंतु तिनें बोलाविलें असतां, आपण न जावें यांत उध्धटपणा दिसतो, असें समजून ती **राधाबाई**बरोबर गेली. **विठ्ठलदास** यानीं असलें जवाहिराचें उपभोगतें गिऱ्हाईक पाहून, ते हांसत हांसत पुढें आले, आणि बाईसाहेबाशीं आर्जवी भाषणें बोलत बोलत, त्यांस आपले दुकानांत घेऊन गेले.

**विठ्ठलदास** – काय हुकूम आहे बाईसाहेब ? आज फार दिवसांनीं येणें झालें ! आमचा कांहीं नवा माल यावयाचा होता–तो गेले बुधवारीं आला; तेव्हांपासून त्याची मोजदाद करण्याकडे मी गुंतलों होतों, यामुळें आलीकडे सरकारच्या भेटीस यावयास मला बनलें नाहीं. आतां कांहीं घेण्याची मर्जी आहे, किंवा सहज येणें झालें ?

**राधाबाई – शेटजी**, आपणापाशीं कांहीं उंच उंच हिरे आणि माणक्या शिल्लक आहेत, ह्मणून आपण एक वेळ मजपाशीं बोललां होतां, तें आपले ध्यानांत आहे ?

**विठ्ठलदास** – गेल्या शनवारचीच गोष्ट ; त्या दिवशीं आपण आल्यावर, मागाहून लागलीच सरकारची स्वारीही आली, तेव्हां आपलें बोलणें तितकेंच राहिलें.

**राधाबाई** – खरी गोष्ट. त्या जिनसा आतां दृष्टीस पडतील ? हाताशीं असल्या तर दाखवा.

**विठ्ठलदास** – हें काय विचारावें ! हाताशीं नसल्या तरी पेटींतून काढावयास किती अवकाश लागणार आहे ?

आपले सारख्यांस तसलीं रत्नें न दाखवावीं, तर तीं आ-ह्मापाशीं असून काय कामाचीं ?

**राधाबाई** – आमच्या **रामनाथा**साठीं एक पोहोंचीचा जोड करवावा, असें माझ्या मनांत फार दिवस आहे; याजकरितां दोन हिरे, आठ पाचा, आणि आठ माणकें, असे अठरा खडे मला घ्यावयाचे आहेत. जर दर एक पदकाच्या मध्यभागीं एक हिरा बसवून, त्याचे सभोंवतीं एका आड एक माणकाचे आणि पाचेचे खडे बसविले, तर, तो दागिना चांगला दिसेल, नाहीं बरें ? तुह्मास कसें वाटतें ? कीं पाचेच्या बदला निळाचे खडे बसवावे ?

**विठ्ठलदास** – उत्कृष्ट, उत्कृष्ट! आपल्या कल्पनेपुढें मी ह्मणजे एखादी युक्ति सुचवावी असें नाहीं. दागिना पण एक दागिना होईल, आणि चार लोक त्याकडे पाहतच राहतील ! एक वेळ जवाहिराचे खोलीपर्यंत येणें झालें असतें, ह्मणजे पाहिजे तसे खडे निवडून काढण्यास नीट पडतें.

**राधाबाई** – चला. ( **हिराबाईस** ) चल **हिरे,** मौज पहायास आपलें काय गेलें ?

असें ह्मणून ह्या दोघी आणि **विठ्ठलदास**, अशीं तिघेंजण जवाहिराच्या खोलीजवळ गेलीं, तेव्हां जिकडे तिकडे सोन्याच्या आणि जवाहिराच्या दागिन्यांचा चकचकाट पाहून, **राधाबाईच्या** मनास फार संतोष झाला, आणि ती ज्या हेतूनें या जागीं आली होती, तो हेतु ती क्षणभर विसरली; परंतु जेव्हां तिची दृष्टि **हिराबाईकडे** गेली, तेव्हां योजिलेल्या कार्याचें तिला पुनः स्मरण झालें,

आणि तिनें **विठ्ठलदास शेटच्या** हातून एक मोठा रत्नांनीं भरलेला डबा आपल्या पुढें घेऊन, त्यांतील एकएक रत्न ती निरखून पाहूं लागली.

**राधाबाई** – ( एक हिरा हातीं घेऊन ) **शेटजी**, हा पहा बरें खडा कसा आहे तो? याच्या जोडीला असाच दुसरा मिळाला पाहिजे, तर उपयोग.

**विठ्ठलदास** – ( उपनेत्र लावून त्या हिऱ्याकडे पाहतो आणि मोठ्यानें हांसतो ) हँ हँ हँ, जितका त्रिनऐबी माल– तितका नेमका निवडून काढायचाना! ठीक आहे. आज्ञा होईल तर याच्या जोडीचा दुसरा असाच हिरा आपण मिळवूं; कळलें बाईसाहेब? आपला हुकूमच झाला, तर नाहीं ह्मणून चालणार आहे?

**राधाबाई** – बरें, हिरे तर झाले; आतां पाच, माणकें, आणि नीळ येऊं द्या. ( **शेटजी** दुसरी पेटी उघडूं लागतो. )

**विठ्ठलदास** – या अमोलिक रत्नांस आह्मास डोळ्यांत तेल घालून जपावें लागतें! बरें तर बरें; नाहीं तर एखादे वेळेस या व्यापारांत मोठी घस लागते. गतवर्षी आमचे दुकानांतून दोन आंगठ्या गेल्याच कीं नाहीं. एथें हजार जण येणार, त्यांतून कोणाचें नांव घ्यावें? ( दुसरा जवाहिराचा डबा पुढें करतो. ) हे पहा महाराज, पाचेचे, माणकांचे आणि निळाचे खडे; असा माल आज शहरांत दुसऱ्या ठिकाणीं नाहीं. हे एकंदर साठ खडे होते, पैकीं विकतां विकतां आज पंधरा दिवसांत ३७ विकले, बाकी तेवीस राहिले आहेत. गिऱ्हाइकांनीं

हलका हलका माल जितका होता तितका सर्व नेला. आतां राहिला आहे— तो भारी किंमतीचा आहे, याकरितां दोन दिवसांनीं मागून खपेल.

**राधाबाई** – ( डबा उघडून पाहते ) वाः, काय रंग तरी आहे या खड्याचा? **शेटजी**, आतां मी हें काम आपणावरच सोंपविलें. कृपा करून आपण आपल्या परीक्षेनें यांतले चांगले खडे निवडून काढून, मला एक उत्कृष्ट पोहोंचीचा जोड तयार करून द्या, आमच्या **नाथानें** रात्रंदिवस माझें डोकें उठविलें आहे. याजकरितां होऊं द्या त्याची हौस एकदांची पुरी. या दागिन्यास एकंदर काय बरें खर्च पडेल? अठरा खडे, तीन तोळे सोनें, आणि सोनाराची मजुरी– मिळून २००० रुपयांत सर्व आटपलें पाहिजे.

**विठ्ठलदास** – बाईसाहेब, हा दागिना आपल्या हुकमाप्रमाणें अगदीं फरमाशी केला, तर निदान चोवीसशें रुपयांस पडावयास जाईल, आणि तितक्या किंमतीस महागही नाहीं ह्मणायाचा; कारण, हा सर्व माल नुकताच पंधरा दिवसांचे मागें आलेला आहे; याजकरितां त्याचे किंमतीवर व्याजाचा खर्च चढला नाहीं; नाहीं तर बाईसाहेब, हाच पोहोंचीचा जोड आपणास सव्वीसशें रुपयांस पडला असता!

**राधाबाई** – बरें, कांहीं पाचेच्या आंगठ्या चांगल्या उंचीपैकीं आहेत? ते परवांच एक पाचेची आंगठी घ्यावयाची आहे ह्मणून मजपाशीं ह्मणत होते: बरी बाई आठवण झाली.

**विठ्ठलदास** – तयार आहेत, पांच चार तऱ्हेच्या आणतों. मग त्यांतून हवी ती पसंत करा. ( आंगठ्या आणायास जातो. )

**राधाबाई** – **हिरे,** धर अंमळ हा डबा; माझी तर बाई मांडीच दुखूं लागली; मघांची मी घेऊन बसल्यें आहे किं नाहीं ! ( डबा **हिराबाईचे** हातीं देते. ) आग आई ग ! आतां अंमळ बरें वाटलें !

**राधाबाईचें** कृत्रिम **हिराबाईच्या** लक्षांत न येऊन, तिनें तो जवाहिराचा डबा आपल्या हातीं घेतला. इतक्यांत, **विठ्ठलदास शेटजींनीं** चारपांच पाचेच्या आंगठ्या आणून **राधाबाईच्या** हवाली केल्या, आणि **हिराबाईच्या** हातचा डबा आपण घेऊन, तिकडील तिकडे नेऊन ठेविला.

**राधाबाई** ही शरिरानें पुष्ट, उंच आणि बळकट होती, यामुळें जवाहिराच्या डब्याच्या भारानें तिची मांडी दुखूं लागली, वगैरे भाषणें ऐकून, **विठ्ठलदास शेट** किंचित् हांसले,– तें **राधाबाईस** आवडलें नाहीं.

**राधाबाई** – कां **शेटजी,** आपण आज फारसे आनंदांत आहां, आणि आपल्याशींच हांसत आहां ?

**विठ्ठलदास** – बाईसाहेब, काय विचारावें ! आज आनंदांत नसावें तर कधीं असावें ? आपले चरण माझे दुकानास नेहमीं लागत असल्यावर मला आनंदास काय कमी आहे !

**राधाबाई** – नाहीं, तें असो, पण कारणावांचून हसूं आलें नाहीं, ही गोष्ट क्वचित् आहे.

**विठ्ठलदास** – मला हसूं इतक्यावरूनच आलें कीं, **गणपतसिंग** महाराज स्वतः जवाहीर घेण्यास आले, ह्मणजे आह्मास त्यांचे हातून दोन रुपये मिळतात, ही गोष्ट त्यांचे लक्षांत वागून, त्यांस एक आंगठी पाहिजे तीही त्यानीं आपणास पाहवयास सांगितली, आतां आपल्यापुढें आमचें काय चालावयाचें आहे ? आपल्यासारखी जवाहिराची परीक्षा आज या **बऱ्हाणपुरांत** फारच थोड्या लोकांस असेल! स्त्रीपुरुषांच्या प्रेमाची आतां परमावधि झाली! अहो, जे **गणपतसिंग** महाराज पाहिजे .तेव्हां माझे दुकानीं येऊन आपले परीक्षेनें हवा तो माल नेत असत, त्यांस आतां कोणताही पदार्थ घेणें झाला, तरी, तो प्रथम आपल्यास पसंत झाला पाहिजे ! याचें नाव प्रीति; नाहीं तर आमच्या बायका ! आह्मी एखादा जिन्नस दाखविल्यावांचून विकत घेतला कीं त्यानीं नाक मुरडलेंच ! या गोष्टी केवळ दैवाधीन आहेत.

**राधाबाई** ज्या कार्यासाठीं **विठ्ठलदास शेटजींच्या** घरीं आली होती, तें कार्य झाल्यावर, तिला घरीं जाण्याची इतकी घाई झाली कीं, **शेटजींचे** आर्जवी भाषणाचा तिला अगदीं कंटाळा आला.

**राधाबाई** – शेटजी, बरें तर मी येतें आतां; घरीं मुलें वाट पाहत असतील.

**विठ्ठलदास** – ठीक आहे. अशीच मेहेरबानी नेहेमीं होत जावी, इतकाच आमचा आश्रितांचा हेतु आहे.

**राधाबाई** – ( बाहेरचे दरवाज्यापाशीं जाऊन, पहारेकऱ्यास ऐकूं जाण्याजोग्या स्वरानें **हिराबाईस** ह्मणते. ) अगे, पण हो, तुलाच एक घरीं जायाचें आहे, आणि मला एथेंच मुक्काम करावयाचा आहे कीं काय? घटकेचा प्रहर होत नाहीं! ( दोघी गाडींत बसतात ) गाडीवान, चल आता घरीं जाऊं; आमच्या **हिराबाईस** घरीं केव्हां जाईनसें झालें आहे.

**हिराबाई** – मला लवकर घरीं जाऊन काय करावयाचें आहे? आणि मला घरीं जाण्याची घाई झाली आहे असें आपण कशावरून ह्मणतां बरें? ( ह्याप्रमाणें त्यांचीं भाषणें होत असतां गाडी चालू झाली. )

## प्रकरण २ रें.

**राधाबाईची** स्वारी चालती झाल्यावर **विठ्ठलदास शेट** नित्यक्रमाप्रमाणें आपली शिल्लक मिळवूं लागले, तेव्हां बाहेर काढलेल्या जवाहिराच्या एका डब्यांतील एक मोठ्या किंमतीचें माणीक कमीं भरलें; तेव्हां तें शोधून काढण्याविषयीं त्यानीं आपली पराकाष्टा केली, परंतु त्याचा ठिकाण लागला नाहीं. शेवटीं त्यानीं असें ठरविलें कीं, **राधाबाई**-खेरीज हें माणीक इतर ठिकाणीं गेलें नसावें; कारण, त्या दिवशीं तो डबा तिच्याशिवाय आणखीं कोणास दाखविला नव्हता, व त्यांतील माणकें **राधाबाईचे** समक्ष मोजून पाहतां बरोबर भरलीं होतीं. आतां, **विठ्ठलदास शेटनीं** केलेलें अनुमान जरी खरें होतें, तरी, **गणपतसिंग**सारख्या मोठ्या लोकांच्या स्त्रीनें चोरी केली, ही गोष्ट लोकांत प्रसिद्ध केली असता, त्या गृहस्थाची अपकीर्ति होईल, असें समजून, **विठ्ठलदास शेट** यानीं ती गोष्ट प्रथम सरकारांत न कळवितां, सामोपचारानें होईल तितकी तजवीज करावी असा निश्चय केला; परंतु तशानें कार्य नच झालें, तर दुसरी तयारी असावी, अशा बेतानें आपला मित्र **हंबिरराव** पोलीसखात्यांतील सुभेदार यास बराबर घेऊन, ते त्याच दिवशीं संध्याकाळीं सहा वाजण्याचे सुमारास **गणपतसिंग** यांचे घरीं गेले.

**विठ्ठलदास** – सुभेदार साहेब, मी आंत जाऊन येईंपर्यंत आपण बाहेरच बसावें; बहुधा हें प्रकरण आपल्यापर्यंत येणार नाहींसें वाटतें.

**हंबिरराव** – माझी तरी हीच इच्छा आहे: कीं तुमचें काम होऊन **गणपतसिंग** महाराजांचा आब राहिला ह्मणजे झालें.

**विठ्ठलदास** – ( **गणपतसिंग** यांचे देवडीवरील पहारेकऱ्यास ) शिपाईबावा, घरांत जाऊन बाईसाहेबास कळवा कीं, **विठ्ठलदास जव्हेरी** आपल्या भेटीस आले आहेत.

**पहारेकरी** – बर, बसा ह्माराज त्या गालिच्यावर. बाइसायेब जेवनाचे तयारीत अस्तील वाटत, आनी सरकार पन आताच भाएरून आले हायेत. आज समस्त मंडूळी रात्रीची कथेस जानार अशी बोलवा हाये. फार करूनशी भेट व्हण्याच कठीण दिस्त.

**विठ्ठलदास** – माझें काम फार जरूरीचें आहे, याजकरितां कसेंही करून एवढा माझा निरोप त्यांच्या कानावर तर घाला.

**पहारेकरी** – ( डोकें हालवून विचार करितो ) मी बाईच्या हुजऱ्याला हाक मारतो ( घरांत जातो ) ए **लिंबाजी**, ए **ह्मादबा**, भाएर कोनी गिरस्त आले हायेत ते काय ह्मनतात ते ऐका. त्याना बाइसायबाची भेट घेयाची हाये. जरा **चिमाबाई**कडून त्या गिरस्ताचा निरोप तर आत कळवा; तेन्च काम फार जरूरीच हाये ह्मनुनशेनी, नाहीतर मी त्यांस जायास सांगितल अस्त.

**लिंबाजी** – ( पागोटें सरसावून, श्रीमंत लोकांच्या हुजऱ्याप्रमाणें डौल घालून **विठ्ठलदास** यास ह्मणतो ) छे,

म्हाराज, आज तेन्ची कोन गडबड होऊन ऱ्हायली हाये; आपली भेट आज कशाची व्हनार; आज सरकार सवारी मुलाबाळास्नी घेऊन सरकारवाड्यात नाटक पाह्यास जानार हाये. ( घड्याळाकडे पाहतो ) हे बघा सात वाजले. इतक्या-उपर तेन्च जेवनखान होऊन, पोशाकाची तयारी व्हन्यास नऊ ऱ्हायल पण साडेआट तर वाजतील, आनी आपल्याशी बोलायला त्याना वखत कुठून ऱ्हानार हाये ?

**विठ्ठलदास** – (हें ऐकून चेहरा अगदीं उतरून जातो) तें कसेंही असो. मला बाईसाहेबाशीं दोन **शब्द** तरी बोललेच पाहिजेत; परंतु त्यांची गांठ पडावयाचीच नाहीं, असें असल्यास सरकारची भेट झाली तरी चालेल.

इतक्यांत घरांतून एक म्हातारा रोडका गृहस्थ भांगेच्या नादांत झुकत झुकत येत आहे असें पाहून, **विठ्ठलदास** पुढें झाले, आणि, ते **गणपतसिंग** महाराजच आहेत, असें पक्कें ओळखून त्यांशीं बोलण्यास आरंभ केला.

**विठ्ठलदास** – राम राम महाराज, आज्ञा होईल तर-मी इतक्या रात्रीस कां आलों, त्याचें कारण सरकारास कळवीन.

**गणपतसिंग** – ( गुंगींत बोलतो ) कोण आहे तें दरवाजाशीं ? वैद्यबावा, आपली स्वारी केव्हां आली ? या.

**विठ्ठलदास** – महाराज, वैद्यबावा नाहींत, मी आहें तो; मला **विठ्ठलदास** म्हणतात. मी इतक्या रात्रीस ज्या कामासाठीं आलों आहें, तें ऐकून घ्यावें महाराज; मी गरीब आहें, मी, मी लाचार आहें; माझें मोठें, मोठें नुकसान ............

**गणपतसिंग** – हं, हं. गडबड कशाची आहे ? कांहीं कामकाजाप्रकरणीं किंवा देण्याघेण्याच्या बाबतींत बोलावयाचें असल्यास, उद्यां किंवा परवां या; आज रात्रीस आह्मास एक क्षणभर फुरसूद सांपडावयाची नाहीं. ( घरांत जाऊं लागतात. )

**विठ्ठलदास** – **गणपतसिंग** महाराज, माझा मजकूर प्रथम ऐकून घ्यावा, नंतर घरांत जावें. सांप्रत मजवर मोठा चमत्कारिक प्रसंग आला आहे, याजकरितां मी आपला मजकूर थोडक्यांत सांगतों, तो ऐकावा. ( **गणपतसिंग** जों जों लांब जातात, तों तों **शेटजी** आपला स्वर चढवून बोलतात. ) एक क्षणभर माझें गरीबाचें बोलणें ऐकावें, नाहीं तर ही गोष्ट विकोपास जाईल.

( हे शब्द ऐकतांच **गणपतसिंग** कांहींसे घाबरले, आणि पहिल्यापेक्षां अधिकाधिक झोंके खाऊं लागले. हें पाहून पहारेकऱ्यानें खुर्ची पुढें केली तिच्यावर स्वारी बसली. )

**गणपतसिंग** – या तर मग इकडे या. हं, बोला काय बोलायचें असेल तें. तुमचें नांव काय सांगितलें तें, **विठ्ठलदास** किं **पिठ्ठलदास** तें मी विसरलों, हं, चालूं द्या आतां तुमचें चऱ्हाट.

**विठ्ठलदास** – महाराज, आज संध्याकाळीं पांच वाजायाचे सुमारास बाईसाहेब **राधाबाई** – आपली पत्नी– ( महाराजांस राग येईल या भयानें घाबरतो. )

**गणपतसिंग** – अरे वा:, कोण विलक्षण मनुष्य आहे हा ! बरें मग, आमच्या पत्नीनें आज दोनप्रहरीं काय केलें ?

**विठ्ठलदास** – ( धीर धरून हात जोडून बोलूं लागतो ) महाराज, आज बाईसाहेबांची स्वारी माझे दुकानीं आली, त्यावेळेस मी त्यांचे हातीं माणकांनीं भरलेला एक डबा दिला होता, त्यांतील एक माणीक १२०० रुपयांच्या किमतीचें नाहींसें झालें आहे ! धनीसाहेब ! मी फार गरीब मनुष्य आहें, व हें नुक्सान सहन करून उगीच राहण्याचें काम माझ्या जिवापलीकडचें आहे. मी ही खबर आपले चरणापाशीं निवेदन करण्यास धांवत आलों याचें कारण इतकेंच कीं, तो डबा मी आजचे दिवसांत **राधाबाई**खेरीज आणखीं कोणास दाखविला नव्हता, व बाईसाहेबांचे समक्ष तीं रत्नें मी मोजून पाहिलीं, तेव्हां बराबर भरलीं होतीं. ( खिन्न होऊन ) तें माणीक हरवल्यापासून मला चैन पडेनासें झालें आहे, कारण, ज्या डब्यांत तें रत्न होतें– तो डबा माझ्या थोरल्या पेटींत होता, आणि त्या पेटीची किल्ली व जवाहिरखान्याच्या खोलीची किल्ली– अशा दोन्ही मजपाशींच होत्या; यावरून तें रत्न, खोली व पेटी उघडून कोणी नेलें असेल, असें ह्मणण्यास अगदीं आधार नाहीं.

**गणपतसिंग** – ( रागानें संतप्त होऊन ) काय, काय? पुन: बोला ! वा:, काय चमत्कारिक गोष्ट बनवून आणिली आहे ! तूं **गणपतसिंगास** अजून पक्कें ओळखत नाहींस असें दिसतें. अरे शतमूर्खा ! प्रत्यक्ष माझेच स्त्रीनें

चोरी केली– ही गोष्ट मजपाशींच येऊन सांगतांनां तुला शरम कशी वाटत नाहीं? ( रागाचे आवेशानें खुर्चीवरून उठूं लागतो, परंतु वृद्धापकाळचा अशक्तपणा व भांगेचा अंमल– या दोन कारणांमुळें झोंक जाऊन पुनः खुर्चीवर आपटतो. )

**विठ्ठलदास** – ( ओशाळ्यासारिखा होऊन ) महाराज, माझ्या बोलण्याचा आपण असा अर्थ केला, तर माझा नाइलाज आहे; परंतु....

**गणपतसिंग** – जव्हेरीबावा फार शहाणे होऊं नका, आल्या वाटेनें निमूटपणें चालते व्हा; नाहीं तर विनाकारण आपली आब्रू मात्र घालवाल. मी अशा ठक लोकांस चांगलें शासन करवित असतों, समजलांत? ( भांगेचा अंमल कांहींसा कमी होतो ) तुमच्या मनांत, मी आपले आब्रूसाठीं तुह्मास १२०० रुपये देऊन तुमची समजूत करीन; परंतु असें समजूं नका, कीं– ही तुमची फसविण्याची विद्या मजपाशीं चालेल, मी छप्पन्न देशचें पाणी प्यालों आहें बरें?

**विठ्ठलदास** – महाराज, हा प्रसंग– केवळ आपण मला रागानें झिडकावून टाकल्यानेंच निवारण होतो असें नाहीं; याजकरितां कृपा करून माझा सर्व मजकूर ऐकून घ्यावा. माझें ह्मणणें इतकेंच आहे कीं, बाईसाहेबांनीं विनोदानें अथवा आमच्या हुशारीची परीक्षा पाहण्यासाठीं, डब्यांतील माणीक काढून ठेविलें असल्यास, मला तसें कळविलें, ह्मणजे माझें चित्त स्वस्थ होईल; नाहीं तर मी रात्र-दिवस त्या काळजींत राहून, मला कामकाजही सुचणार नाहीं. सरकार, आमचें गरीबाचें भांडवल तें किती?

**गणपतसिंग** — माझे स्त्रीस तुमच्यासारिखे हलके लोकांशीं विनोद करण्याचा संबंध काय? तुह्मी जों जों आपली चतुराई मला दाखवायास लागाल, तों तों तुमचा मूर्खपणा आणि लबाडी—हीं उघडकीस येतील; याजकरितां आतां आपलें शहाणपण आपलेपाशींच ठेवून चालते व्हा कसे!

**विठ्ठलदास** — महाराज, आतां मला कांहीं सुचेनासें झालें आहे. माझें बाराशें रुपयांच्या किमतीचें रत्न आज हरवलें, आणि ज्या डब्यांत तें रत्न व आणखी दुसरीं रत्नें होतीं, तो डबा मी आजचे दिवसांत बाईसाहेबांखेरीज आणखी कोणास दाखविला नाहीं; या दोन्हीं गोष्टी खऱ्या आहेत. याजकरितां याचा विचार आपणच निस्पृहपणानें करून मज गरीबास या संकटांतून बाहेर काढण्यास आपण समर्थ आहां.

याप्रमाणें भाषण चाललें असतां, घरांतून बाईसाहेब नाटकास जाण्याचा बेतानें थाटमाट करून बाहेर आल्या, आणि सरकारसाहेबांजवळ येऊन उभ्या राहिल्या.

**राधाबाई** — ( रागानें ) गडबड कशाची आहे रे?

**विठ्ठलदास** — ठीक ठीक, बाईसाहेबांची स्वारी आली! आतां माझें कार्य झालेंच!

**गणपतसिंग** — अगे, हें काय प्रकरण आहे, तें तुझें तूं आपलें पाहून घे, मला त्यांत कांहीं समजत नाहीं.

**राधाबाई** — कोण! **विठ्ठलदास**! केव्हां आलां आपण! कां यावेळेससें येणें झालें? परभारेंच कांहीं आंग-

ठ्या आणून दाखवायाच्या असतीलनां? आग बाई बाई, शर्थ झाली आतां! पण, मी आणिल्या आहेत त्याही आपल्याच दुकानच्या आहेत ह्मणून बरें आहे!

**विठ्ठलदास** – बाईसाहेब, मजवर मोठा बिकट प्रसंग आला आहे, याकरितां इतक्या रात्रीस सरकारास व आपणास मला तस्दी द्यावी लागली.

**गणपतसिंग** – ह्या गृहस्थाच्या ह्मणण्यांत, त्याचे दुकानांतून एक माणीक चोरून आणिलें आहेस! कां, असेंच नाही जव्हेरीबावा! हँ हँ हँ, चोरी न करील तर काय करील बिचारी! घरांत दारिद्र्य अठरा विस्वे!!

**राधाबाईनें** आपले उतार वयास तारूण्याची शोभा आणण्यासाठीं कपाळीं कुंकू चांगलें रेखून लाविलें होतें, व जेव्हां तिनें **गणपतसिंग** यांच्या मुखानें, माणीक चोरल्याचा मजकूर ऐकिला, तेव्हां एकाएकीं भयानें तिच्या कपाळाची त्वचा आकुंचित् होऊन, कुंकुमाच्या बारीक बारीक खपल्या खालीं पडूं लागल्या.

**राधाबाई** – ( मनाची उद्विग्नता लपविण्यासाठीं कांहींसें हांसून बोलते. ) **शेटजी,** शाबास! मी काहो तुमचे दुकानांतून माणीक चोरून आणिलें? हे शब्द तुमच्या मुखांतून निघावेत तरी!

**गणपतसिंग** – अस्सें अस्सें! चांगली, त्याच्या तोंडांत चांगली साखर घाल! कुठला **विठ्ठलदास** नि कुठला **पिठ्ठलदास** आणला आहे! यापेक्षां चांगला जव्हेरी तुला शहरांत सांपडलाच नाहीं काय?

**विठ्ठलदास** – बाईसाहेब, मी जो माणकांचा डबा आपल्यास दाखविला, त्यांपैकीं जें माणीक आपण पसंत केलें होतें, तेंच नाहींसें झालें, आणि आपणाखेरीज आजच्या दिवसांत तो डबा मी आणखीं कोणास दाखविलाच नाहीं. मी या बाबतींत, शहरचे फौजदार यांचा विचार घेऊन, त्यांचा एक मनुष्य देखील बरोबर आणिला आहे. बाईसाहेब, आपण सुज्ञ आहांत, याकरितां मी विनंती करितों कीं, हाच प्रसंग आपणास किंवा सरकारास आला असता, तर आपण कसें केलें असतें बरें? आतां माझी इतकीच विनंती आहे कीं, आपण मला तारा किंवा मारा; परंतु या संकटांतून मुक्त होण्याचा मार्ग दाखवा; मी आपले पाय सोडून कोणापाशीं जावें!!

**राधाबाई** – ( मान हालवून ) आतां माझ्या ध्यानांत आलें तें सर्व प्रकरण! पण बाई मला इतकी उठाठेव कशाला पाहिजे! **शेटजी**, तुह्मी हवी तशी चौकशी करा हो बाबा, मजकडून अगदीं हरकत नाहीं. कर असेल त्यास डर. ( **गणपतसिंग** यांजकडे पाहून ) ते सरकारचा मनुष्य घेऊन आले आहेत, ह्मणून तुह्मी घाबराल हो! आधींच प्रकृती अशक्त झाली आहे, आणि तशांत भलतीच एखादी धास्ती घेतली, ह्मणजे माझ्या जिवाभोंवता नसता घोर! आपल्या जिवांत जीव आहे, तोंपर्यंत मला काय कमीं आहे!! आणि मी कशाला लोकांच्या वस्तु चोरीत बसूं! खोट्या कपाळीं कुऱ्हाडीचा घाव. ज्याचें कर्म तो भोगील!

**विठ्ठलदास** – ( संतोष पावून ) तर मग बाईसाहेब, या गोष्टीची आपणास कांहीं तरी माहिती आहे, असें

उघड दिसतें. हें कृत्य कोणी केलें असावें बरें! ज्यापेक्षां मी आपला आश्रित आहें, त्यापेक्षां माझा जिन्नस सांपडल्यावर, मी सरकारदरबार न करावें अशी आपली इच्छा असल्यास, त्याही गोष्टीस मी कबूल आहें.

**गणपतसिंग** – ( **राधाबाईस** ) तर मग तुला या प्रकरणाविषयीं कांहीं तरी गुणगुण कळली आहे. हूँ सांग लवकर; उगीच कां त्या गृहस्थास नाद लाविला आहेस!

**राधाबाई** – (हांसून) मी हो कसूचा नाद लावला आहे? वा:, हें ग काय बाई!

**गणपतसिंग** – ( जवळ जाऊन हात धरितात ) नाहीं नाहीं, सांगच आतां, कसेंही असो; तुला माझ्या गळ्याची शपथ आहे.

**विठ्ठलदास** – आतां कां महाराज माझा गरिबाचा अंत पाहतां!

**राधाबाई** – हो, तो रंग तेव्हांच दिसला! आजपर्यंत आह्मी आपल्या मुलांप्रमाणें तिचें संगोपन केलें असून, आतां आह्मांस सोडून जाण्याच्या गोष्टी सांगते, तेव्हां यांतच समजा काय तें! ( **गणपतसिंग** यांस ) आजचीच गोष्ट! आज संध्याकाळीं आह्मी गाडींत बसून फिरायास गेलों होतों कीं नाहीं, तेव्हां हीं भाषणें झालीं; आणि, **विठ्ठलदास शेटचे** दुकानांतून मी उठल्यें मात्र, तेव्हांपासून तिला घरीं येण्याची जी कांहीं घाई झाली होती, ती सांगतां येत नाहीं! असें बाई आजपर्यंत त्या पोरीनें कधीं केलें नव्हतें, आणि आतांच तिला ही बुद्धि कोठून आठवली कोण जाणें!

**गणपतसिंग** – तूं कोणाची गोष्ट सांगतेस ही ?

**राधाबाई** – **हिराबाईसाहेबांची**, आणखी दुसरी कोणाची सांगायची ?

**गणपतसिंग** – छे, छे, ती असल्या कामांत कधीं पडणार नाहीं, मग कोण जाणें बा ! आतांच्या काळांत कोणी कोणाविषयीं खातरी देऊं नये, असे दिवस आले आहेत; पण मला हजार हिश्शानीं वाटतें कीं, तिनें हें कृत्य केलें नसेल. (अंमळ विचार करून ) जा, मी खचित् सांगतो कीं, माझी **हिराबाई** असलें कृत्य करणारी मुलगी नव्हे.

**राधाबाई** – मला वाटलें तें मी सांगितलें ! तुह्मी खरें माना किंवा खोटें माना.

**विठ्ठलदास** – खरें, खरें, बाईसाहेब, आपण ह्मणतां तेंच खरें, आणि त्या गोष्टीचा संभवही दिसतो.

**राधाबाई** – खरें कीं नाहीं बरें ? ( हांसून ) तुह्मास पाहातांच मी मनांत चरकल्यें. मी जेव्हां तिच्या हातांत तो डबा दिला, तेव्हांच तिनें त्यांतून एक माणीक लांबविलें असेल, असें मला वाटतें.

**विठ्ठलदास** – याचा संशयच नको.

**राधाबाई** – ज्या वेळेस तुह्मी **हिरेच्या** हातांतून तो डबा घेतलात, त्या वेळेस त्यांतलीं माणकें मोजून पाहिलीं होतीं काय ? तेव्हां जर बरोबर भरलीं असतील तर मात्र तिचें कृत्य नव्हे, असें ह्मणायास चिंता नाहीं.

**विठ्ठलदास** – बाईसाहेब, तो डबा इतर कोणाच्या हातून घेतला असता, तर त्यांतील माणकें मी मोजून पाहिलीं असतीं, परंतु **हिराबाई** आपल्या घरची आणि आपल्या कन्येप्रमाणें, असें समजून मी तो डबा उघडून देखील पाहिला नाहीं.

**राधाबाई** – झालें, मग बोलायासच नको, तिचेंच काम तें ! ( सुस्कारा टाकिते) आतांच्या काळांत बाई कोणी कोणावर विश्वास ठेवूं नये असें झालें. अशा द्वाड माणसाच्या संगतीनें माझ्यासारख्या भोळ्या बायकोची एका क्षणांत आब्रू जायाची. ( खिजमतगारास हाक मारिते ) **खिंबाजी**, थोडें प्यावयाचें पाणी आणायास सांग बरें, ताहनेनें माझ्या तोंडास कोरड पडली आहे.

**विठ्ठलदास** – ( बाहेर जाऊन आपल्या सुभेदार मित्रास बोलावितो ) **हंबिरराव**, इकडे या.

**हंबिरराव** – कां, कसें झालें ? लागला कांहीं थांग ? हो, तो चेहराच वेगळा दिसतो; बहुधा काम आकारास आलें असावें.

**विठ्ठलदास** – हो, इतकें झालें कीं, पक्का वहीम धरण्यास जागा झाली; पण मुद्दा सांपडेल तेव्हां खरें ! ( उभयतां घरांत जाऊं लागतात ) इकडून या असे, या दारानें; **गणपतसिंग** यांच्या घरांत **हिराबाई** म्हणून एक स्त्री आहे, तिनें माझें माणीक चोरिलें, यांत अगदीं संशय नाहीं.

हें शेवटचें बोलणें, **मोहनलाल** आंतून बाहेर येत

होते त्यांचे कानीं पडलें, तेणेंकरून त्यांस इतका संताप आला कीं, त्यानीं मोठ्या आवेशानें **विठ्ठलदास** यांची मानगोटी धरून त्यांस तेथेंच उभें केलें.

**मोहनलाल** – अरे दुष्टा, आमचे **हिराबाईच्या** नांवास कलंक लावणारा असा तूं कोण आहेस? आणि कोठून आलास, तें मला लवकर सांग? नाहीं तर अशीं अप्रयोजक भाषणें बोलण्यापासून काय परिणाम होत असतो, तें मी तुला आतांच दाखवितों ( ताडण करायास जातात. )

**हंबिरराव** – छे छे, असा अविचार करणें आपलेसारख्यांस योग्य नाहीं. कारण, **विठ्ठलदास शेट** यांनीं आपला अपराधही केला, तरी ते शिक्षेस पात्र आहेत किंवा नाहींत, हा विचार करणें व पात्र असल्यास शिक्षा देणें, या दोन्ही गोष्टी सरकारानें आपल्या हातीं ठेविल्या आहेत, हें आपणास ठाऊक असेलच, मी सांगावें असें नाहीं.

**मोहनलाल** – खरी गोष्ट; पण, हा खटला तरी काय आहे, तें मला पाहिल्यानें समजून घेऊं द्या.

ही बोलाचाली, घरांत **राधाबाई** व **गणपतसिंग** यांचे कानीं पडतांच तीं उभयतांही बाहेर आलीं. **मोहनलाल** वगैरे तिघेजण उभे होते, त्यांस पाहून **राधाबाईनें** भोंवळ आल्याचें सोंग करून, आपल्या पतीचे आंगावर डोकें टेंकलें, परंतु त्यांचे अशक्त शरिरास तो भार सहन न होऊन त्यांचा झोंक गेला, तेणेंकरून बाईसाहेबांचे कपाळ भिंतीवर आपटून त्यांची भोंवळ एक क्षणांत नाहींशी झाली.

**विठ्ठलदास** — ( **मोहनलाल** यांस ) तें सगळें प्रकरण आपले मातोश्रीस आणि वडिलांस विचारावें; त्यांस चांगलें माहीत आहे, आणि उभयतांही जवळच आहेत.

**गणपतसिंग** — थांबारे थांबा, उगीच गलबला करूं नका; मी त्यास सगळें वर्तमान सांगतों. **मोहन,** ऐक; हे सर्व लोक असें ह्मणतात कीं, आज तिसऱ्या प्रहरीं **हिराबाई** तुझ्या आईबरोबर या गृहस्थाचे दुकानीं ( **विठ्ठलदास शेट**कडे बोट दाखवून ) गेली होती, तेथून तिनें एक माणीक चोरून आणिलें. कां हो असेंचना? चोरलें कीं उपटलें, कसें ह्मटलेंत तुह्मी तें! हं हं. बरी आठवण झाली, एका माणकावर ताव दिला, नाहीं का?

**मोहनलाल** — कोणी ! **हिरानें** रत्न चोरलें ? कशावरून ? यास प्रमाण काय ? छेः अशी गोष्ट घडावयाची नाहीं. ती स्वतःच इतकें अमोलिक रत्न आहे कीं तिला इतर रत्नांची कधींच गरज पडावयाची नाहीं.

**राधाबाई** — काय असेल कोण जाणें ! मला तर ही गोष्ट अगदीं अप्रमाण वाटते! असें होईल तरी कसें ! छीः हें कृत्य तिनें केलें असेल, असें मी तर बाई कधीं ह्मणणार नाहीं ! ( **विठ्ठलदास**कडे पाहून, नेत्रसंकेत करिते, तो त्यास न समजतां **मोहनलाल** यांचे मात्र लक्षांत येतो. )

**मोहनलाल** — आईसाहेब, आपल्या मनांत **हिराबाई**विषयीं इतका चांगलेपणा आहे, हें पाहून मला फार आनंद वाटतो.

**राधाबाई** – चोरी, चहाडी आणि व्यभिचार या तीन गोष्टींचा आरोप आपल्यावर आला असतां, तो दूर करण्याविषयीं अब्रूवानास अवश्य यत्न केला पाहिजे, आणि ज्यापेक्षां आपण सर्व **हिराबाईचे** हितेच्छु आहों, त्यापेक्षां आपणच होऊन या उभयतांचा संशय घालविण्यासाठीं तिच्या खोलीचा झाडा त्यांस घेऊं दिला, ह्मणजे पुनः त्यांस बोलायास जागा राहणार नाहीं. **बाळा** जा रे, **हिरा** आपले खोलींत आहे कीं काय, तें पाहून ये लवकर. हो, असलें काम ज्याचें त्याचेसमक्ष झालें ह्मणजे बरें; नाहीं तर मग लोक हजार कुतर्क काढितात.

**विठ्ठलदास** – ( संतापून ) बाईसाहेब, ही हो काय आपली रीत? मघां आपणच ह्मणत होतां कीं, हें कृत्य अमुक मनुष्यावांचून झालें नसेल, आणि आतां अगदींच उलटून पडता, यास काय ह्मणावें ?

**राधाबाई** – आतां, या भाषणांत काय अर्थ आहे ? तुह्मी आपलेबराबर पोलीस कामगार आणिला आहे, त्यास जी गोष्ट योग्य दिसेल ती केली पाहिजे. आपले सत्रा विचार त्याचे उपयोगीं थोडेच पडावयाचे आहेत ? ( पोलीस कामगारास ) पहा हो बाबा! तुह्मी आपलें काय असेल तें! तुह्मास हवी तशी चौकशी करा, झाडे घ्या, जबान्या घ्या, आमचेकडून कोणत्याही गोष्टीची मनाई नाहीं; आतां इतकेंच कीं, करणें तें विचारपूर्वक मात्र करा.

**विठ्ठलदास** – आज्ञा बाईसाहेब. हं, सुभेदार, चला

आतां **हिराबाईच्या** खोलीकडे; उगीच हजार बेत करून फळ काय?

**मोहनलाल** – ( अतिशय रागावून ) ही गोष्ट कधीं घडावयाची नाहीं; ती बिचारी गरीब पडली, ह्मणून का हे खेळ आरंभले आहेत? तुह्मास आमचे घरांत येऊन झाडा घेण्याचा अधिकार काय? असें करण्याविषयीं तुह्मापाशीं सरकारचा हुकूम कोठें आहे तो दाखवा? नंतर काय तो विचार.

**गणपतसिंग** – **मोहन,** असें करण्यांत काय फायदा? त्यांस तिचाच संशय आहे, तो, झाडा घेतला ह्मणजे नाहींसा होईल; आपण दोघे तिघे बरोबर असलों ह्मणजे झालें. चला, या हो **शेटजी**; तुमची कां समजूत होईना.

**मोहनलाल** – बाबा, हा सर्वस्वीं अविचार होत आहे! परंतु तुमच्यापुढें माझा इलाज नाहीं. आपण सगळेच हो कसे या गोष्टीस प्रवृत्त झालांत? **हिराबाईच्या** खोलीचा मात्र झाडा घ्यावा, आणि–

**गणपतसिंग** – असूं दे आतां तुमच्या शिपायगिरीच्या गोष्टी; चला **शेटजी,** जिन्यांतून सावकाश या.

इकडे **हिराबाई** आपले खोलींत एकटीच बसून, **राधाबाईचें** व तिचें जे भाषण गार्डींत झालें, त्याचा विचार करीत बसली असतां, आकस्मात् दाराशीं कोणी ठोठावतो आहे असें तिनें ऐकिलें.

**गणपतसिंग** – **हिरा,** अंमळ दार उघड, कांहीं काम आहे.

**हिराबाई** – या बाबा, आंत या. ( दार उघडते, आणि पुष्कळ मंडळी पाहून चकित होते.)

**गणपतसिंग** – **हिरा**, तूं आपली स्वस्थ बसली होतीस तशीच वाचित बैस, आणि या उभयतांनां खुशाल तुझ्या खोलीचा झाडा घेऊं दे; भिऊं नको, यांत कांहीं अर्थ नाहीं. त्यांचें आटपलें, ह्मणजे मी तुला सगळें सांगीन, समजलीस बाई अगदीं काळजी करूं नको, आणि दुसऱ्या कोणास कांहीं विचारूं नको.

**हिराबाईच्या** हातून कोणताही अपराध झाला नसतां, एकाएकीं तिचा झाडा घेण्यापर्यंत मजल येऊन पोहोंचली, हें पाहून तिला फार आश्चर्य वाटलें; परंतु **मोहनलाल** आणि **गणपतसिंग** हे उभयतां तिचें शांतवन करीत होते, यामुळें ती कांहींशी स्वस्थ होती. **विठ्ठलदास शेट** यांनीं दरवाजा संभाळला होता, आणि पोलीस कामगार हे– सावकाश पेट्या, फडताळें आणि गांठोडीं तपासून पाहात होते. **हिराबाईची** स्वभावतः सुवासिक पदार्थांवर अतिशय प्रीति असे; ह्मणून ती प्रतिदिवशीं बागेंत जाऊन नाना प्रकारचीं पुष्पें जमा करून आणी, आणि त्यांचे दोन सुंदर तुरे करून, एक **गणपतसिंग** यांचे खोलींत व एक आपले खोलींत एका कांचेच्या पेल्यांत घालून ठेवीत असे. पोलीस अम्मलदार या कांचेच्या पेल्यांतील तुरा बाहेर काढून आंत पाहातो तों गेलेलें माणीक दृष्टीस पडलें.

**हंबिरराव** – या माणकानें पुष्पाश्रय केला होता, त्यायोगानें त्यास किंचित् सुगंधही येत आहे.

**गणपतसिंग** – ( घाबरून ) काय? सांपडलें माणीक? पाहूं, पाहूं!

**मोहनलाल** – सांपडलें! ( सुस्कारा टाकून ) दगा झाला!! यांत अगदीं संशय नाहीं!

**विठ्ठलदास** – ( आनंदानें खुलून ) सांपडलें तर खरें. तें पहा पाहिजे तर; मला त्याविषयीं अगदींच संशय नाहीं.

**हंबिरराव** – हा तुमचाच जिन्नस आहे, असें कशावरून ह्मणावें? न्यायाअंतीं ज्याचा ठरेल त्याचा खरा. सध्यां कृपा करून हें रत्न मजपाशींच असूं द्या; ( एका कागदाचे तुकड्यांत गुंडाळून खिशांत ठेवितो ) **हिराबाई,** आपलें नांव **हिराबाईच** ना? तुह्मास आतांच मजबरोबर फौजदारसाहेबांकडे आलें पाहिजे, समजलां? आटपा लवकर.

**हिराबाईनें** फौजदारसाहेबांचें नांव ऐकतांच, तिच्या सर्वांगास घाम येऊन ती भूमीवर प्रेतवत् पडली.

**मोहनलाल** – घात केलात रे घात केलात!! तुह्मी या आनाथ स्त्रीचा जीव घेण्याचा बेत योजिला आहे! परंतु **परमेश्वरास** ही गोष्ट कधीं सहन होणार नाहीं! हें पक्कें समजा!! अरे मूर्खहो, जी **हिराबाई** आमच्या मातोश्रीच्या कृपेंकरून इतक्या दैन्यदशेंत असतांही, गरीबगुरीबाचा यथाशक्ति समाचार घेते, जी आपल्या धर्ममातेपेक्षां शंभरपट विद्वान् आणि पापभिरू असून आपले स्थितीस पूर्ण ओळखिते, तिच्या हातून हें साहस झालें! असें तुह्मी सिद्ध करितां? तस्मात् तुमची चित्तवृत्ति ठिकाणीं नाहीं, असें ह्मणायास चिंता नाहीं!

याप्रमाणें वर्तमान झाल्यावर पोलीस अम्मलदारानें **हिराबाईस** कैद करून आपल्याबरोबर नेलें, आणि फौजदारापुढें रिवाजाप्रमाणें तिची चौकशी झाल्यावर, तिला नजरकैदेंत ठेविलें.

पुढें कांहीं दिवसांनीं **हिराबाईच्या** खटल्याच्या तपासणीची तारीख न्यायाधिशानें नेमल्यावर, **गणपतसिंग** व **मोहनलाल** या उभयतांनीं, **माधवराव** नामेंकरून एक वकील होते त्यांस सर्व खटला समजावून, **हिराबाईच्यातर्फें** कोर्टांत बोलण्याचें काम त्यांजकडे सोपविलें. **माधवराव** यांनीं तो सर्व प्रकार ऐकून घेतांच, या खटल्यांत यश येणें कठीण आहे— असें त्यांस वाटलें. कारण, **हिराबाईच्या** बचावास उपयोगी पडण्याजोगे साक्षीदार किंवा इतर कोणतींही साधनें नव्हतीं. शेवटीं, **काशीनाथपंत** वकील ह्मणून त्यांचे एक मित्र होते, त्यांची सल्ला घेण्यासाठीं **माधवराव** त्यांच्याकडे गेले.

**माधवराव** — रावसाहेब, आज मजकडे एक चमत्कारिक प्रकरण आलें आहे, त्यांत माझी मति अगदीं चालत नाहीं. न्यायाच्या कामांत आपली नजर फार चांगली चालते, ह्मणून आलीकडे जी प्रसिद्धि झाली आहे ( विनोदानें ) तिचा प्रत्यय पाहण्यास ही अनायासें संधि आली आहे.

**काशीनाथपंत** — कां अण्णासाहेब, आज फार दिवसांनीं येणें झालें. आपणास कामाचे गर्दींत आमचें स्मरण कोठून व्हावयाचें. असो; या बसा.

**माधवराव** – महाराज, हें प्रकरण तर ऐका. ( सर्व हकीकत सांगतात. ) आतां, अशा खटल्यांत वकिलानें आपली अक्कल ती काय चालवावी? लोकांत ह्मण आहे कीं, अमका मनुष्य सुतानें स्वर्गास जातो, त्या न्यायानें पाहिलें तर स्वर्गास जाण्यास सूत तरी पाहिजेनां? त्या बिचाऱ्या **हिराबाईच्या** खटल्यांत, तिनें चोरी केली हें सिद्ध करण्यास पुष्कळ प्रमाणें आहेत, परंतु तिनें **विठ्ठलदास** यांचें रत्न चोरिलें नाहीं– अशा विषयींचें एकही प्रमाण नाहीं.

**काशीनाथपंत** – अण्णासाहेब, आपण दुःखांत सुख इतकेंच माना कीं, अजून तुह्मास या प्रकरणाचा विचार करण्यास चार पांच दिवसांची तरी सवड आहे, आणि **हिराबाईचे** नशिबानें ह्या खटल्याची चौकशी चांगले सुज्ञ आणि विचारशील न्यायाधिशापुढें होणार आहे; नाहीं तर या असल्या लंगड्या प्रकरणांत तुह्मास कोणी पोटभर बोलूं देखील दिलें नसतें. ( इतक्यांत बाहेरील दरवाजा उघडून **मोहनलाल** येतो.)

**मोहनलाल** – ( वकिलांजवळ येतो, आणि **माधरावास** ह्मणतो ) मी आपले घरीं गेलों होतों, परंतु आपले कारकुनानें, आपण रावसाहेबांचे घरीं गेलां, असें सांगितल्यावरून मी एथें आलों. ( **काशीनाथपंतांस** ) रावसाहेब, आपली माझी आजपर्यंत कधींच प्रत्यक्ष गांठ पडली नव्हती खरी, परंतु मी आपल्या नांवास ओळखीत होतों, व आपला थोरपणाही मला ऐकून ठाऊक होता; हल्लीं मी मानअपमान सर्व एकीकडे ठेवून, अण्णासाहे-

बांस भेटण्याच्या उद्देशानें आपल्या एथें आलों आहे; तर कृपा करून आह्मास आपल्या चातुर्यरूप नौकेच्या साह्यानें या संकट– समुद्रांतून पार न्यावें, आणि कोणापाशीं कितीही भीड खर्च करावी लागली, तरी अनमान न करितां या वेळेस एका अनाथ स्त्रीच्या कल्याणाकडे लक्ष द्यावें. या प्रसंगीं माझे मित्रमंडळीपैकीं कोणाचाही या कामांत उपयोग होण्याजोगा असता, तर मी आपणास इतकी तस्दी दिली नसती; आतां सर्व भरंवसा आपला आहे !

**माधवराव** – ( **मोहनलाल**कडे पाहून ) **मोहनलाल**, आपण येण्यापूर्वींच मी सर्व हकीकत रावसाहेबांस निवेदन केली आहे; परंतु, एक गोष्ट– जी माझ्या मनांत फार खुपत आहे, ती मात्र मी अझूनपर्यंत कोणास ऐकविली नाहीं; आपली मर्जी असेल, तर सर्व संकोच एकीकडे ठेवून, ती मी आपणास सांगतों.

**मोहनलाल** – या प्रसंगीं आपण कोणताही संकोच न धरितां, सर्व शंकांचें निवारण करून घ्यावें.

**माधवराव** – प्रथम आपणास माझ्या एका प्रश्नाचें उत्तर दिलें पाहिजे. आपले मातोश्रीनेंच कांहीं हेतूस्तव तें माणीक जव्हेऱ्याचे दुकानांतून आणून, **हिराबाईच्या** खोलींत नेऊन ठेविलें असावें, असें मला खचित् वाटतें. तर या गोष्टीविषयीं आपलें मत काय आहे? ही शंका त्या दिवशींच माझ्या मनांत आली होती, परंतु आपणास कळविण्यास आमचें धैर्य होईना.

**काशीनाथपंत** – त्याविषयीं अगदीं संशय नको. **हिराबाईचे** हातून असें काम कधींच व्हावयाचें नाहीं.

**मोहनलाल** – ( घामाघूम होऊन सुस्कारा टाकितो ) हे विचार माझ्या मनांत त्यावेळीं आले होते, परंतु काय करूं ! आतां तर मला अगदीं सुचेनासें झालें आहे; याजकरितां, आपण जो विचार ठरवाल तो मला कबूल आहे. ( श्रमी होऊन घरीं जातो. )

**काशीनाथपंत** – अण्णासाहेब, आपण ह्मणता त्या सर्व गोष्टी यथार्थ आहेत; त्याविषयीं माझी पूर्ण खातरी आहे; परंतु **गणपतसिंग** महाराजांच्या स्त्रीनें माणीक चोरिलें, ही गोष्ट आपल्याच्यानें तोंडांतन तरी काढवेल? बरें असेंही असून, कदाचित् मजसारख्या एखाद्या निर्भीड मनुष्यानें ती गोष्ट न्यायाधिशांस सुचविली, तर त्यापासून दुसरा कांहीं उपयोग न होतां त्यांच्या मनांत इतकेंच येईल कीं, हे गृहस्थ आपल्या यजमाननीवरील दोष उडविण्यासाठीं दुसऱ्याचे घरास आग लावण्यास प्रवृत्त झाले आहेत. दुसरा असा एक विचार करा कीं, **राधाबाईच्या** घरीं आज हजारों रुपयांची घडामोड चालली आहे, आणि तिला आज कोणत्याही गोष्टीची प्रतिकूलता नाहीं; व **हिराबाई** ही यःकश्चित् स्त्री, **गणपतसिंग** महाराजांच्या घरीं, केवळ अन्नवस्त्राच्या लोभानें आपलें आयुष्य घालवीत आहे; तस्मात् लोकदृष्ट्या पाहिलें असतां, या उभयतां स्त्रियांपैकीं ही चोरी कोणाच्या हातून होण्याचा संभव दिसतो बरें? **राधाबाईचा** मूर्खपणा, दुर्बुद्धि व मत्सर, आणि **हिराबाईचा** सुशीलपणा, प्रौढ बुद्धि आणि विद्-

त्ता हीं थोड्याच लोकांस ठाऊक असतील; याजमुळें, न्यायसभेंत, **राधाबाईनें** तें रत्न चोरिलें, असें ह्मणण्यापासून उपयोग न होतां, उलटा आपल्या पक्षास कमीपणा मात्र येईल. तर, इतःपर **हिराबाई** निर्दोषी आहे, हें सिद्ध करण्यास अगदीं पुरावा नाहीं, हें लक्षांत वागवून, केवळ **परमेश्वराच्या** न्यायीपणावर भरंवसा ठेवण्याखेरीज दुसरा इलाज नाहीं.

**माधवराव** – आपण सांगितल्या त्या सर्व गोष्टी शब्दशः खऱ्या आहेत; परंतु **पंत**, जर आपण एक वेळ त्या बिचाऱ्या **हिराबाईस** पाहिलें असतें, आणि तिच्या अप्रतीम स्वरूपावर तिच्या निर्दोषपणाची छाया कशी शोभत आहे, हें आपल्या दृष्टीस पडतें, तर आपल्या अंतःकरणास द्रव आल्यावांचून कधींही राहिला नसता. माझे मनानें असें घेतलें आहे कीं, या प्रकरणांत **परमात्मा** खचित् यश देईल, आणि **हिराबाईचा** निष्कलंकपणा लोकांत प्रगट करील ! असो; चला, आतां कोर्टांत जाण्याची वेळ झाली. मी तिकडे जाण्याचे तयारीनेंच आलों आहे.

याप्रमाणें भाषण झाल्यावर, उभयतां वकील कोर्टांत जाऊन **हिराबाईचा** खटला निघण्याची वाट पाहत बसले; परंतु त्या दिवशीं न्यायाधिशांस इतकें काम होतें कीं, रात्रीचे सुमारें आठ वाजेपर्यंत त्यांचा वेळ, किरकोळ खटले तपासण्यांत मोडला; हें पाहून **काशीनाथपंत** आणि **माधवराव** यांस असें वाटलें कीं, आतां आमचा खटला उद्यांपर्यंत तहकूब राहील. परंतु न्यायाधि-

शांनीं थोडक्याच वेळानें, हरवलेल्या रत्नाच्या खटल्यांतील वादी, प्रतिवादी व साक्षीदार लोकांस बोलाविलें; आणि 'या प्रकरणाचा निकाल होईपर्यंत कोर्टाचें काम चालेल,' असा हुकूम फर्माविला. नंतर न्यायाधिशांनीं वादीकडील वकिलांचें सर्व बोलणें ऐकून घेऊन, ते **काशीनाथपंताक**-डे वळले.

**न्यायाधीश** – आतां, कैदीकडील वकिलानें आपला मजकूर सांगावा.

**काशीनाथपंत** – न्यायाधीश आणि पंच हो, हा आह्मी हातीं घेतलेला खटला, कांहीं विलक्षण रीतीनें घडून आला आहे, व या खटल्याची चौकशी अशा विचारी, सुज्ञ आणि दयाभूत न्यायाधिशाकडे नेमिल्याचें वर्तमान आह्मांस कळल्यावरून, आह्मी ह्या निर्दोषी स्त्रीस तिच्या दुर्दैवाच्या हातून सोडविण्यासाठीं ही वकिली पत्करिली आहे; तर आतां या कामांत आह्मांस यश मिळणें, हें न्यायदृष्टीचें कार्य आहे. आरोपी **हिराबाई**कडे कांहीं अपराध नाहीं, हें सिद्ध करण्यास आह्मांपाशीं काय साधनें आहेत, असें आपण विचाराल, तर आह्मी सांगतों कीं, त्या बाबदींत आमचा पक्ष साधारण आहे; कारण, आमच्या तर्फेच्या पुराव्यापासून आपले मनाची जरी खात्री झाली, तरी त्या पुराव्याचा उपयोग करून घेणें हें आपल्यावरच अवलंबून आहे. त्यांतून, **हिराबाईच्या** मनांतूनही त्या घरगुती गोष्टी भरकचेरींत प्रसिद्ध करावयाच्या नाहींत; याजकरितां, आरोपीच्या हातून हें साहस झालें असेल किंवा नसेल, या गोष्टीचा विचार आपण सर्वांनीं

करावा; आणि तिचा कुलीनपणा, सदाचार, विद्वत्ता, आणि धर्मनिष्टपणा यांविषयीं, **राधाबाई**खेरीज तिच्या ओळखीच्या इतर सर्व लोकांचे मुखांनीं आपली हवी तशी खात्री करून घ्यावी, इतकीच आमची विनयपूर्वक प्रार्थना आहे.

**हिराबाई** ही कोर्टांत येतांच, तिची मुखचर्या पाहून, ही निर्दोषी असावी असें सर्वांस वाटलें, आणि न्यायाधिशांस ऐकूं जाण्याजोग्या स्वरानें सर्व लोक "ती निरपराधी आहे" "तिजकडे खचित् कांहीं दोष नाहीं," "कोणी तरी दुष्टानें शत्रुत्व उगविण्यासाठीं, तिजवर हा प्रसंग आणिला आहे," असें आपआपल्यांत बोलूं लागले.

**विठ्ठलदास** – (डोळे अश्रूनीं भरून येतात) न्यायाधीश महाराज! मी फार नम्रतेनें अर्ज करितों, त्याकडे लक्ष देऊन माझी विनंती ऐकावी, नाहीं तर मला जन्मभर हृद्रोगाची पीडा होईल, आणि एका अनाथ स्त्रीस मी केवळ द्रव्यलोभानेंच दंड करविला, असें माझे मनास वाटून मला रात्रंदिवस चैन पडणार नाहीं; तर माझें इतकेंच ह्मणणें आहे कीं, आतां कृपा करून **हिराबाई**कडे कांहीं अपराध नाहीं, असें समजून तिला आपण मुक्त करावें; माझें चोरीस गेलेलें रत्न पुनः माझ्या हातीं आल्यापासून मला जें समाधान होईल, त्याच्या शंभरपट दुःख, **हिराबाईस** कारागृह प्राप्त झाल्यानें मला होणार आहे; याजकरितां, ज्यापेक्षां आपण न्यायासनावर बसलां आहांत, त्यापेक्षां न्याय यथार्थ होईल अशी अशा आहे.

**गणपतसिंग** महाराजासारिख्या थोर गृहस्थाच्या आश्रयास मी मुकावें, आणि मला एक मोठी मनोव्याधि जडावी, ह्या दोन शिक्षा, अपराधावांचून मला भोगाव्या लागणार, तर याचा आपण पूर्ण विचार करावा.

**न्यायाधीश** – ( सभेकडे अवलोकून ) सभासदहो हल्लीं वादी **विठ्ठलदास शेट** यांनीं जें भाषण केलें, तें सर्वांनीं ऐकिलेंच आहे. या भाषणावरून बहुतेक गृहस्थांचें अंतःकरण सद्गदित होऊन, वादीचें ह्मणणें सुयुक्तिक आहे, असें अपणांस वाटेल; व वादीचा अर्ज आह्मी कबूल केला नाहीं, तर, आह्मी व पंचमंडळी कठोर अंतःकरणाचे आहों असेंही आपल्या मनांत येईल; परंतु या आपल्या स्तुत्य दयाभूतपणास सदसद्विचाराचा संस्कार झाला असतां, आमची आणि आपल्या मनाची स्थिति सारखीच होईल, आणि न्यायाच्या कामांत न्याय करणारांस आरोपी याची किती जरी दया आली, तरी त्यांनीं पुराव्याअंतीं जी गोष्ट सिद्ध होईल तीच खरी मानावी, हें योग्य आहे असें सर्वांस वाटूं लागेल. वादी **विठ्ठलदास शेट** यांनीं ही गोष्ट मनांत ठेविली पाहिजे कीं, कोणत्याही फौजदारी खटल्याचा तपास करण्याकरितां जी न्यायसभा भरते, तिचे मुख्य उद्देश दोन असतात; ते असे कीं, प्रथम– फिर्याद करणाराचें नुकसान त्यास भरून मिळावें, किंवा इतर कोणत्याही रीतीनें, माझा न्याय यथार्थ झाला अशी त्याची समजूत व्हावी; व दुसरा–अपराध करणाराची पूर्ण चौकशी होऊन त्यास कायद्याप्रमाणें यथायोग्य शिक्षा मिळावी. आतां, सांप्रतच्या प्रसंगीं **विठ्ठलदास**

**शेट** यांचें असें ह्मणणें आहे कीं, **हिराबाईस**, तिजवर शा-बीत झालेल्या अपराधाची क्षमा व्हावी, कारण आपलें झालेलें नुकसान भरून येत आहे; यामुळें, वर सांगितलेल्या दोन उद्देशांपैकीं प्रथम उद्देश सिद्ध झाला; परंतु पुराव्यानें जो अपराधी ठरला, त्यास शिक्षा करणें– हा आमचा दुसरा हेतु सिद्धीस गेल्यावांचून न्यायदेवतेचा क्रोध शांत होणार नाहीं. तर आतां सर्वांनीं हे सूक्ष्म विचार मनांत आणून, ज्या कायद्याचा मीं ताबेदार आहें, त्याच्या अनुसंधानानें मी आपलें काम करितों; यांत मजकडे कांहीं दोष नाहीं, असें पक्कें समजावें. **विठ्ठलदास शेट,** या प्रसंगीं आपलें औदार्य आणि दयाळूपणा पाहून, मला फारच संतोष झाला आहे. ( कांहीं वेळ स्तब्ध राहून ) आरोपी **हिराबाई** ही आपले यजमाननीबरोबर, फिर्यादी **विठ्ठलदास** जव्हेरी यांचे दुकानांत गेली, आणि परत येतांनां, येथून एक मोठ्या किंमतीचें माणीक तिनें चोरून आणिलें, या अपराधाचा पुरावा, आमची आणि विद्यमान् पंचांची खातरी होण्याजोगा झाल्यावरून, कैदी **हिराबाईस** ( अमुक शिक्षा दिली आहे, असें न्यायाधीश सांगणार, इतक्यांत कोर्टांत कांहीं गलबला झाल्यामुळें न्यायाधीश स्तब्ध राहिले.)

## प्रकरण ३ रें.

इकडे **विठ्ठलदास** यांच्या फिर्यादीवरून, कोर्टांत **हिराबाईचा** खटला चालला असतां, **गणपतसिंग** महाराजांचे वडील चिरंजीव **मोहनलाल** हे आपल्या घरीं **हिराबाईच्या** खोलींत एकांतीं, मानसिक दुःखाच्या तीव्र वेदनेंत निमग्न होते, व आतां, आपल्या प्राणाहून प्रीय जी **हिराबाई** तिची काय अवस्था होईल, या काळजीनें त्यांचे नेत्रांतून अश्रुधारा चालल्या होत्या. इतक्यांत, त्यांचा सावत्र भाऊ **रामनाथ** आणि बहीण **गंगू** हीं उभयतां ( **राधाबाईचीं** सख्खींमुलें ) **हिराबाईस** शोधित शोधित तेथें आलीं, आणि पाहातात तों 'बाई' खोलींत नसून 'दादा' मात्र एका खिडकीपाशीं कपाळास हात लावून चिंताक्रांत बसला आहे, आणि त्याचे मुखचर्येवर त्याच्या हृदयांतील सर्व दुःख, त्या बालकांच्याही ललक्षांत येण्याजोगें स्पष्ट उमटलें आहे.

**गंगू** – दादा, तूं कारे एथें एकटाच येऊन रडत बसला आहेस ? आई आपल्याला टाकून मावशीच्या घरीं मौज पाहवयास गेली ह्मणून ? ( **रामनाथकडे** वळून ) भाऊ, दादाला समजाविनास रे ? मी त्याच्या गळ्यास मिठी घातली तरी मजकडे पाहत देखील नाहीं. ( पुनः **मोहनलालजवळ** जाते ) दादा, एकदां बोल ह्मणजे झालें. इतका काय मेला राग करावा कोण जाणे ! जा, मग मी तुला मुकाच नाहीं द्यावयाची ! भाऊ चल आपण आपले बाबाकडे जाऊं ! दादा, तूं नाहींना बोलत

आमच्याशीं ! मग मी कध्धीं कध्धीं तुझ्याजवळ यायची नाहीं, सांगतें बरें !

**रामनाथ.**– ताई, थांब. मी त्याला गुदगुल्या करितों. (**मोहनलालच्या** कांखेंत आणि गळ्यांत हात घालून हांसतो ) हांसलारे हांसला दादा ! हें काय बरें दादा ? ( बहिणीकडे वळून ) ताई, आपण कनी गडे दादाला त्या पेल्यांत तांबडी तांबडी लाल गारगोटी आहे ती आणून देऊं, ह्मणजे तो हांसेल. आपण कसें गे त्या दिवशीं बाईला भिवडावयासाठीं त्या फडताळांत लपून बसलों होतों !

हें **रामनाथाचें** भाषण ऐकून, **मोहनलाल** हे अधिकच रागावल्यासारखें करून, त्या उभयतां मुलांचा संवाद लक्षपूर्वक ऐकूं लागले.

**गंगू** – पण बाई यायची, ती आईच खोलींत आली; ( हांसून ) आन् भाऊ तिनें त्या पेल्यांत ती तांबडीं गारगोटी टाकतांच कशीरे लागलीच पळून गेली ! मला वाटतें, त्या दिवशीं आई भारीच रागांत होती, नाहीं बरें भाऊ ?

**रामनाथ** – ( पेल्यांत 'तांबडी गारगोटी' पाहावयास जातो, परंतु ती सांपडत नाहीं ) ताई, ती मौज या पेल्यांत नाहींगे; कोणी नेली वाटतें. आपण कनी ताई, संध्याकाळीं बाई आली ह्मणजे तिला विचारून तिजपासून ती खेळायला मागून घेऊं बरें. पण दादाचा राग कसा जाईल ? आतां कनी ताई, आपण दोघेजण दोहींकडे उभीं राहून दादाला पुष्कळ गुदगुल्या करूं, आणि

त्याचे मुके घेऊं ! मग पाहूं कसा नाहीं बोलत तो ! तो आपल्याला कधीं रागें भरत नाहीं ! ( असें बोलून तीं उभयतां सुंदर बालकें त्याप्रमाणें करितात. )

हीं मधुर बालभाषणें ऐकून **मोहनलालचे** अंतःकरणास समाधान वाटलें. आणि आपलें कार्य झालें असें त्यांस वाटून त्यांचे हृदयांत आनंद माईनासा झाला. त्यांनीं प्रथम त्या गोड मुलांचें प्रीतिपूर्वक चुंबन घेऊन, नंतर त्यांस आपल्या खांद्यावर बसविलीं, आणि ते त्यांस हांसवित खेळवित कोर्टांत घेऊन आले.

**मोहनलाल** – ( गाडींवरून मोठ्यानें कचेरीचे दरवाजापासूनच बोलतात. ) थांबा थांबा, न्यायाधीश महाराज, थांबा; मी ऐन समयास येऊन पोहोंचलों आहें, याकरितां माझ्या साक्षीदारांच्या जबान्या घेऊन, नंतर **हिराबाईच्या** खटल्याचा निकाल करा. पंचमहाराज, ज्या **परमेश्वरानें** आपलें दीनदयालुत्व प्रगट करण्यासाठीं आयते वेळेस हे चमत्कारिक साक्षीदार पाठविले आहेत, तोच याप्रसंगीं त्यांचा यथार्थ उपयोग करून घेण्याविषयीं आपले मनांत प्रेरणा करील, आणि आपल्या निर्मळ कीर्तीस अन्यायाचा कलंक लागूं देणार नाहीं; अशी आशा धरून मी आपल्या चरणांपाशीं आलों आहें, तर आतां कृपा करून माझ्या विनंतीकडे लक्ष द्यावें.

**हिराबाई** – ( आनंदानें प्रफुल्लित होऊन ) आलारे माझा पाठीराखा आला ! आतां मी या संकटांतून खचित पार पडेन ! **परमेश्वरा** या प्रसंगीं मज दीनाचा धांवा ऐकून धावणें केलेंस, आतां हे उपकार मी कोठे फेडूं ! !

(**मोहनलाल** यांस) मी या यमसदनाच्या द्वारापाशीं आल्यापासून मजला तुह्मावांचून दुसरा कोणाचा निजध्यास नव्हता. बरें झालें, **देवानें** मला पुनः एक वेळ हे चरण दाखविले ! आतां कसाही प्रसंग आला, तरी धैर्य धरून मी सहन करीन, असें मला वाटतें.

**मोहनलाल** – भिऊं नको **हिरा, परमेश्वराच्या** घरीं अझून न्याय अगदीं नाहींसा झाला नाहीं !

**रामनाथ व गंगू** – (उभयतां मुलें) बाई, तूं मात्र मौज पाहाण्यास आलीस ! आणि आह्मांस घरींच टाकिलें-सनां ? दादा, आह्मी बाईकडे जातों. (मुलें **हिराबाई**-कडे जावयास ओढ घेतात, आणि खालीं मान घालून रडूं लागतात.)

हें प्रेमभरित भाषण ऐकून **हिराबाईच्या** नेत्रांतून अश्रुधारा चालल्या, आणि दुःखानें तिचे हातपाय कांपूं लागले; परंतु धैर्य धरून, कठड्याच्या आश्रयानें खालीं मान घालून ती उभी राहिली. **मोहनलालचे** दोहीं-कडे दोन मुलें उभी होतीं, त्यांनीं आपली बाई रडत आहे असें पाहतांच, तींही रडावयास लागलीं; त्या-योगानें सभेंतील कित्येक लोकांचे नेत्र भरून आले, आणि कित्येक वृद्ध आणि कोंवळ्या मनाचे होते, त्यांनीं डोळ्यांस हात लाविले. याप्रमाणें जिकडे तिकडे गडबड होऊन गेली आहे असें पाहून न्यायाधिशांनीं लोकांस चुप्प कर-ण्याकरितां चोपदारास हुकूम केला, आणि **मोहनलाल** यांनीं आणिलेल्या साक्षीदारांची जबानी घेण्याचा आपला बेत सर्वांस कळवून त्याप्रमाणें वकिलांसही सुचविलें.

**काशीनाथपंत** – **मोहनलाल**, आपण नवीन साक्षीदार आणिले आहेत ते कोठें आहेत, आणि इतक्या रात्रीस त्या लेंकरांची झोंप मोडून, आपण त्यांस एथ कशासाठीं आणिलें ? याचें उत्तर द्या.

**मोहनलाल** – ( मुलांस फुसलावणिच्या गोष्टी सांगतो. ) तुह्मांस बाईजवळ जायाचें आहेना ? अंमळ थांबाल तर, ( **काशीनाथपंताकडे** वळून ) आपण काय ह्मटलेंत ? साक्षीदार काय ? हे पहा आमचे साक्षीदार ! ! ( मुलांकडे बोट दाखवितो, तें पाहून सभेंतील सर्व लोक हांसतात. )

**चोपदार** – काय गडबड आहे, चुप्प.

**न्यायाधीश** – ( **मोहनलाल** यांस ) हं, बोला, तुमचें काय बोलावयाचें असेल तें, साक्षीदार आहेत ह्मणतां ते कोठें आहेत ? खुद्द तुह्मींच साक्षीदार कीं काय ?

**मोहनलाल** – नाहीं महाराज; साक्षीदार हजर आहेत, ( मुलांकडे बोट दाखवून ) हे पहा माझे साक्षीदार. आपणास या बालकांचा सहवास असता तर आपली खातरी होती कीं, हीं मुलें इतर मुलांप्रमाणें नसून; खरेपणा आणि पापाची भीति– हे दोन गुण त्यांचे आंगीं पूर्ण वसत आहेत ! आतां, खऱ्याचा खरेपणा प्रगट करण्यासाठीं कांहीं एक गृहछिद्र उघड करावयाचें या बालकांच्या नशीबीं आलें आहे त्यास इलाज नाहीं; परंतु त्यांनीं एक घटकेपूर्वीं मला ज्या गोष्टी सांगितल्या– त्या आपण ऐकाल तर आपली खातरी होईल कीं, **हिराबाईकडे** कोणताही

दोष नाहीं आणि तिजवर हा प्रसंग येण्यास केवळ शत्रुत्व कारण आहे.

**न्यायाधीश** — हीं सहा सात वर्षांचीं बालकें आहेत, यांजकडून शपथ घेवविली तर त्यांस काय समजणार आहे?

**मोहनलाल** — महाराज त्यांस आपण जवळ घेऊन कांहीं प्रश्न विचाराल, तर आपल्या संशयाची निवृत्ति होईल.

**न्यायाधीश** — बरें आहे. आतां तुमचें ह्मणणें काय? कीं या दोघांही मुलांस हा सर्व प्रकार ठाऊक आहे; कीं एकासच?

**मोहनलाल** — दोघांसही माहीत आहे.

**न्यायाधीश** — चोपदार, त्या मुलीस माझ्या खोलींत घेऊन जा, आणि तिला भिंतीवरील चित्रें वगैरे दाखविण्याच्या नादीं लावा. ( चोपदार **गंगूस** घेऊन जातो; आणि न्यायाधीश **रामनाथास** जवळ घेऊन त्याशीं बोलतात ) मुला इकडे ये. तुझें नांव काय बाळा? पुढें ये; भिऊं नको, मी तुझ्या बाबाला ओळखतों.

**रामनाथ** — माझें नांव **रामनाथ** आणि ताई मला **नाथा** ह्मणते.

**न्यायाधीश** — असें काय? ठीक ठीक! **रामनाथ,** तूं किती वर्षांचा आहेस?

**रामनाथ** — आठ वर्षांचा.

**न्यायाधीश** — शपथ घेऊन खरें बोलणें ह्मणजे काय हें तुला समजतें?

**रामनाथ** — हो; तें मला 'बाईनें' चांगलें शिकाविलें आहे.

हीं मधुर बालभाषणें ऐकण्याकडे लोकांचें इतकें लक्ष लागलें होतें कीं, जर कोणाचे हातून एखादा पैसा किंवा

पावली भुयींवर पडली असती, तर तिचा आवाज सर्वांस ऐकूं जाता!

**न्यायाधीश** – तर मग सांग बरें शपथ घेणें ह्मणजे काय तें?

**रामनाथ** – ज्या **देवानें** आपणास सर्वांस उत्पन्न केलें, आणि चांगले आंगरखे, चांगल्या टोप्या आणि चांगलें आईबाप दिले, त्याचें नांव घेऊन खोटें बोललें असतां त्याला राग येईल आणि आपल्याला पाप लागेल; यासाठीं **गंगू**देखील कधीं खोटें बोलत नाहीं! व मीही कधीं खोटें बोलत नाहीं.

**न्यायाधीश** – शाबास **नाथा** शाबास! या गोष्टी तुला कोणी शिकविल्या बाबा?

**रामनाथ** – आमची 'बाई' आहे कीं नाहीं (**हिरा-बाईकडे** बोट दाखवितो) तिला खोटें बोलणें अगदीं सोसत नाहीं. आह्मांला पाढे आणि बाराखड्या तिनेंच शिकविल्या. आतां मला ज्ञज्ञापर्यंत बाराखड्या येतात. आह्मी दांडगाई केली तर ती रागें भरत नाहीं, पण खो-टें बोललों किंवा कोणास शिव्या दिल्या तर मात्र ती दोन दोन दिवस मला, आपला **नाथा** असें ह्मणत नाहीं! (हें मुलाचें भाषण ऐकून सर्व लोक चकित होतात.)

**न्यायाधीश** – (पंच व मंडळीकडे पाहून) मला वाटतें हा जरी वयानें लहान आहे तरी अशा समजूतदार मुलास शपथ देण्यास कांहीं हरकत नाहीं; कारण खोटें बोलणें हें पाप आहे, ही गोष्ट ह्याच्या मनांत पक्की बिं-बली आहेशी दिसते (मुलास) कां खरेंना **रामनाथ.** (मुलगा लाजून खालीं पाहतो.)

**रामनाथ** अल्पवयस्क खरा, परंतु त्याची बुद्धि बरीच प्रौढ आहे, अशी न्यायाधिशांची पूर्ण खातरी झाल्यावर त्यानीं त्याजकडून प्रतिज्ञा ( शपथ ) घेवविली; आणि प्रश्न विचारायास आरंभ केला.

**न्यायाधीश** – बरें तर आतां; तुला या तांबड्या खड्याविषयीं ( माणीक हातांत घेऊन दाखवितात ) जी कांहीं हकीकत ठाऊक असेल, आणि जी तूं आपल्या दादाला घरीं सांगितली असशील, ती मला सांग बरें पाहूं.

**रामनाथ** – होजीहो ! हीच ती गारगोटी ! त्या दिवशीं आमची 'बाई' ( **हिराबाई** ) आईच्याबरोबर बाहेर फिरायास गेली होती, आणि आह्मी दोघेही बाबाच्या खोलींत बसलों होतों, नंतर संध्याकाळीं आई परत आली असें पाहून, मी आणि ताई असीं दोघेंजण आमच्या 'बाईच्या' खोलींत जाऊन तिला भिवडिवण्यासाठीं फडताळांत लपून बसलों होतों; इतक्यांत खोलीचें दार उघडून आई आंत आली, आणि इकडे तिकडे पाहूं लागली, तेव्हां आह्मांस असें वाटलें कीं, आईही 'बाईस' भिवडिवण्यासाठीं लपून बसावयास जागा पाहात आहे !

**न्यायाधीश** – वाः, हा मुलगा वयानें लहान असून काय सुंदर आणि अस्खलित बोलतो आहे पहा ! **रामनाथ**, मग तुमची आई **हिराबाईच्या** खोलींत खरीच लपून बसली होती काय ?

**रामनाथ** – नाहीं, तिनें खिडकीजवळ घडवंचीवर एक फुलांचा पेला होता, त्यांत ही 'गोटी' टाकून, लागलीच रागें भरत भरत बाहेर गेली.

**न्यायाधीश** – मुला, तुझी आई खोलींतून बाहेर जातांनां काय ह्मणाली, हें तुझ्या ध्यानांत आहे ?

**रामनाथ** – त्याची मला आठवण नाहीं. ताईस असली तर कोण जाणें, पण तिला भारींच राग आला होता, आणि ती कोणालाशीं शिव्या देत होती, इतकेंमात्र मला ठाऊक आहे.

हें **रामनाथाचें** भाषण ऐकून, कोर्टांतील सर्व लोकांस अतिशय आश्चर्य वाटलें, आणि **विठ्ठलदास शेट** हे या प्रकरणांत मुख्य फिर्यादी असतांही, **हिराबाईची** मुक्तता होण्याचा संभव दिसून आल्यामुळें त्यांस फार आनंद झाला; व अशा आनंदाचे समयीं, कोणी कसेही असोत, परंतु **गणपतसिंग** महाराजांचे घराचा आत्र न जावा, असें ह्मणणारे होते,– त्या सर्वांस अतिशय दुःख वाटलें. तेव्हां त्यांतील एकानें कोर्टांत झालेलें सर्व वर्तमान, **राधाबाई** जेथें गेली होती तेथें जाऊन तिला कळविलें.

**न्यायाधीश** – **रामनाथ**, ह्या गोष्टीस किती दिवस झाले, हें तुझ्या ध्यानांत आहे ?

**रामनाथ** – हो ! त्या दिवशीं संध्याकाळीं हा बुवा ( पोलीस अम्मलदाराकडे बोट दाखवून ) आमच्या घरीं आला होता, आणि रात्रीं आह्मीं सगळेजण मामाच्या घरीं कथेस जाणार होतों.

**न्यायाधीश** – बरें असो. ( **मोहनलाल** यास ) या मुलांची साक्ष तुह्मी आतां देतां याचें कारण काय ? हे चिमणे साक्षीदार ( **रामनाथाची** पाठ थोपटून ) तुह्मी पूर्वींच कां हजर केले नाहींत ?

**मोहनलाल** – महाराज, तो सर्व प्रकार मी आपणास सांगूं लागलों, तर माझ्या डोळ्यांस पाणी आल्यावांचून कधीं राहणार नाहीं, आणि कदाचित् आपलेही नेत्र भरून येतील ! आज दुपारीं, मी ज्वरानें इतका हैराण झालों होतों कीं, मला जागच्याजागीं उठून बसण्याचें देखील सामर्थ्य राहिलें नव्हतें, आणि जसजशी संध्याकाळ होत आली, तसतशी माझ्या मनास **हिरा**विषयीं अधिकाधिक काळजी वाटून, मला कांहीं सुचेनासें झालें. शेवटीं, मी **हिराबाईच्या** खोलींत जाऊन बिछान्याशीं टेकून स्वस्थ बसलों, आणि अगदीं विमनस्क होऊन तोंडावर पांघरूण घेतलें; नंतर सुमारें अर्ध घटकेनें हीं माझीं लाडकीं भावंडें मजपाशीं येऊन, दादा दादा, ह्मणून मला बोलविण्यासाठीं अतिशय प्रयत्न करूं लागलीं; परंतु त्यांची अमृतासारखीं मधुर भाषणें मला विषतुल्य वाटून मी त्यांस अगदीं उत्तर दिलें नाहीं ! शेवटीं गळ्यांत मिठ्या घालणें, गोड बोलणें, गुदगुल्या करणें आणि चुंबन देणें, हे सर्व उपाय हरलेसे पाहून, **रामनाथानें गंगूस** सुचविलें कीं, काल आईनें **हिराबाईच्या** फुलांचे पेल्यांत जी ‘ तांबडी गारगोटी ’ आणून ठेविली आहे, ती आपण दादाला खेळावयास आणून देऊं; ह्मणजे त्याचा राग जाईल, आणि तो नेहमींप्रमाणें आपल्याशीं बोलेल. **गंगूनें** लागलेंच जाऊन पेल्यांत पाहिलें, तों ‘तांबडी गारगोटी,’ नाहीं; तेव्हां परत येऊन दीनवाण्या शब्दानें मला ह्मणाली कीं, “ दादा, नाहींरे ती गोटी सांपडत, नाहीं तर मी तुला दिली असती; असें काय बरें करावें! माझा

दादा कसा." ( हे शब्द बोलतांनां **मोहनलाल** यांचें अंतःकरण सद्गदित होऊन त्यांचे नेत्रांतून अश्रु आले ) महाराज, हीं अमृतासारखीं भाषणें ऐकून, कोणाचे नेत्र कोरडे राहतील बरें? असो. याप्रमाणें बालकांचा संवाद माझ्या कानीं पडतांच, माझें सर्व दुखणें नाहींसें झालें, व मी तसेंच त्यांस आपणाजवळ घेऊन आलों.

**मोहनलाल** यांचें भाषण संपल्यावर, न्यायाधिशांनीं **रामनाथाचे** बहिणीस बोलावून आणून, तिच्या मुखानें त्यानें सांगितलेली सर्व हकीकत पुनः वदविली; तेव्हां त्या उभयतां मुलांच्या भाषणाचा अगदीं सारखेपणा पाहून, **हिराबाईच्या** निर्दोषपणाविषयीं पंचमंडळीची इतकी खातरी होऊन गेली कीं, त्यांनीं आपल्या प्रमुखांच्या द्वारानें; **हिराबाईस** कैदीच्या कठड्यांतून बाहेर काढण्याविषयीं लागलाच कोर्टास अर्ज केला; व तो न्यायाधिशांनींही मोठ्या आनंदानें मान्य केला!

आहाहा! **हिराबाई**सारखी तरूण, रूपवान, गुणवान्, आणि सदाचारसंपन्न स्त्री अशा घोर संकटांतून मोकळी झाली, या गोष्टीचा **राधाबाईखेरीज** कोणास आनंद होणार नाहीं बरें? त्या सभेंतील भावार्थी व धर्मनिष्ट लोकांस असें वाटलें कीं, तिजवर आलेल्या आरोपाचें परिमार्जन करण्यासाठीं, साक्षात् **रामनाथ** व **गंगू** यांचे रूपानें **परमात्माच** प्रगट झाला कीं काय !! अथवा त्यानें आपलें दीनदयालुत्व दाखविण्यासाठीं न्याय आणि दया या उभय-गुणांस, बालकांच्या वेशानें या न्यायसभेंत आपापलीं कार्यें करण्यासाठीं पाठविलें कीं काय !! असो.

याप्रमाणें सर्व सभेंत आनंदाच्या लहरी माईनाशा झाल्या, आणि **हिराबाई** कैदीच्या कठड्याबाहेर आली !! हें थोर थोर मंडळींनीं पाहतांच, तिला मोठ्या प्रीतीनें आपल्याजवळ बसवून तिचें शांतवन करण्यासाठीं तिला समाधानाच्या गोष्टी सांगितल्या, व **रामनाथ** आणि **गंगू** हे तिचे आवडते विद्यार्थी तीस आणून भेटाविले.

**न्यायाधीश** – कैदी **हिराबाईस** या कोर्टाचा शेवटला ठराव कळविण्यांत येतो कीं, तुह्मावर चोरी केल्याचा आरोप येऊन तुमच्या निष्कलंक कीर्तीस जो डाग लागला होता, तो आतां अगदीं दूर झाला. कारण तुह्मी अगदीं निर्दोषी असून, तुमचे धर्ममातेनें केवळ शत्रुत्वानें, तुह्मावर हा विपरीत प्रसंग आणिला होता, अशी कोर्टाची पक्की खात्री झाली. इतःपर, **राधाबाई** या नांवाच्या स्त्रीस तिच्या कर्मानुसार शासन कराविण्याचें दुःखकारक काम शेवटास नेण्याचें आमच्या नशीबीं आलें आहे, त्याविषयीं आह्मी उदईक विचार करूं. ( असें बोलून, न्यायाधिशानें नाईकास हाक मारिली ) नाईक, तुह्मी एक शिपाई बरोबर घेऊन, असेच **गणपतसिंग** महाराजांचे घरीं जा, आणि हा आमचा हुकूम त्यांस दाखवून, त्यांचे स्त्रीस कैद करून तुरुंगांत पोंचती करा. आपलें काम फार हुशारिनें आणि इमानानें करा, समजलां; जर कैदी तुमच्या गाफिलपणानें किंवा लबाडीनें पळून गेला, तर त्याचा जबाब तुह्मास द्यावा लागेल.

**हिराबाई** – ( उदास होऊन **मोहनलाल** यांस ह्मणते. ) अरे नशीबा, काय प्रसंग हा ! आईसाहेबांस

या संकटातून बाहेर काढण्यास कांहीं इलाज नाहीं काय? कांहीं तरी युक्ति काढाल तर रावसाहेब, ( **काशिनाथपंतांस** ) तीं आपले उपकार जन्मभर विसरणार नाहींत! आईसाहेबांस फाशांत पाडण्यास त्यांचीं तीं अज्ञान मुलें कारण झालीं; या गोष्टीचें मला फार वाईट वाटतें.

**मोहनलाल** – तूं स्वस्थ ऐस. ( हळूच ) मी मघांच आईला सूचना पाठविली आहे कीं, **परमेश्वरानें** वास्तविक झालेला सर्व मजकूर उघडकीस आणिला, यासाठीं आपणास जीव वाचाविणें असल्यास पलायनाचा मार्ग मात्र मोकळा आहे! सहस्र वांच्यांनीं ती त्यांचे तावडीस सांपडणार नाहीं असें मला वाटतें.

त्या रात्रीं **राधाबाईची** स्वारी राजवाड्यांत गेली होती. हें वर्तमान न्यायाधिशांकडील शिपायांस कळतांच ते तिकडे गेले, आणि वाड्याजवळ जाऊन पोहोंचताहेत इतक्यांत, बाईसाहेबांची स्वारी मोठ्या त्वरेनें येऊन आपल्या मेण्यांत बसली, हें त्यांच्या दृष्टीस पडलें. नाईकानें प्रथम मोठ्या नम्रतेनें मुजरा करून नंतर सरकारचा हुकुम बाईचे हातीं दिला.

**नाईक** – आपनास कैईद करून तुरुंगांत पोचवाव, असा आह्मास **माजिस्टर** सायबांचा हुकूम हाये, आपणास कळाव.

**राधाबाई** – ( विलक्षण धैर्य करून ) ठीक आहे. सरकारच्या हुकुमाचा अनादर कोण करील? चला, तुह्मी न्याल तिकडे येण्यास मी सिद्ध आहें. कारण तुमच्याशीं बोलून उपयोग काय?

**राधाबाईनें** शिपाईलोकांस मोठ्या समजुतीच्या गोष्टी सांगून त्यांस बोलण्याच्या नादीं लाविलें, आणि त्यांची नजर चुकवून, आपल्या वेणीच्या बुचड्यांतून एक लहानशी कुपी काढून तींतील विष तिनें प्राशन केलें. त्यानंतर कांहीं वेळानें तुरुंगाच्या दरवाजापाशीं आल्यावर भोयांनीं मेणा उभा केला, तेव्हां शिपायानें मेण्याचीं दारें उघडून **राधाबाईस** बाहेर येण्याविषयीं एक दोन वेळ सूचना केली.

**शिपाई** – नाईक, तुह्मी तरी बाइसायबासनी हाक मारा की, आता दिवस उगवतो हाये की रात व्हती हाये?

**नाईक** – मोठ्या मानसाला अशी वेळ आली ह्मनजे लई अवगड वाटत; ती बिचारी आपल्याच येधात असल. जरा दमान घ्या की, इतकी रात झाली तशी आनीक एक घडी. (हाक मारतो) बाइसायेब उतरा कि आता, रात लई झाली. काय हो **गेनबा**, तुह्मी हाक मारा बर पाहूं; झोप तर नाय लागली?

**शिपाई** – बाईसायेब ह्माराज, जाग व्हा; आता उतरायची जागा आली की. उठा कि ह्माराज (हातानें हालवितो) दादा, काही गडबड दिसती. जरा मशाल इकड करा बर **दिपाजी**. (मशालजी मशाल पुढें करितो.)

**नाईक** – (मेण्यांत डोकावून **राधाबाईकडे** निरखून पाहातो आणि कानोसा घेतो) **गेनबा! गेनबा!** जरा इकड या बर; हे पायल काय झाल ते? बयान तर वैकुंटाची बाट धरली. आता आपली गत कशी व्हइल कोण जान!

असो. याप्रमाणें **राधाबाईनें** आपल्याच हातानें आप-ला शेवट करून घेतला, हें वर्तमान **गणपतसिंग** महाराज व **मोहनलाल** यांस कळल्यावर त्यांस फार दुःख वाटलें खरें, परंतु त्या दिवसापासून **मोहनलाल** व **हिराबाई** यांचें प्रेम दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊन, तें सर्व कुटुंब अत्यंत सुखी झालें.

आपल्या उभयतां ल्हान मुलांस आईचें स्मरण होऊन, तीं वारंवार दुःख करितील, अशी **गणपतसिंग** महाराजांस काळजी होती; परंतु **राधाबाईचा** अंत झाल्यावर, थोडक्याच दिवसांनीं **मोहनलाल** व **हिराबाई** या उभयतांचें लग्न झालें, यामुळें त्या मुलांची आवडती "बाई" त्यांजपाशींच राहिली, आणि तीही त्यांच्यावर आपल्या पोटच्या मुलांप्रमाणें प्रीति करूं लागली; व **गणपतसिंग** यांनींही आपलें राहिलेलें सर्व आयुष्य फार आनंदांत घालविलें

## ४.

## रंगनाथ व मदनराव.

पूर्वीं, **इंदूर** शहरांत **रघुनाथराव** ह्मणून एक सावकार राहात होते, त्यांनीं स्वपराक्रमानें पुष्कळ द्रव्य संपादन करून, व्यापारी लोकांत मोठी आब्रू मिळविली होती; ते आपला व्यवहार फार सचोटीनें व प्रामाणिपणानें करीत असत, त्यायोगानें त्यांचा व्यापार वाढत चालला होता.

**रघुनाथराव** यांच्या पेढीवर पुष्कळ कारकून होते, त्यांत **रंगनाथ** नांवाचा एक मुलगा सुमारें अठरा वर्षांचा होता, त्यावर त्यांची फार प्रीति असे. कारण कीं, **रंगनाथ** याचे आईबाप तो लहान असतांच वारले होते, तेव्हांपासून त्यास **रघुनाथराव** यांनीं आपल्याजवळ बाळगून लहानाचा मोठा केला होता.

**रंगनाथ** हा मनाचा निर्मळ, स्वभावानें थोर, सहनशील, व चालीनें संभावित असे; आणि या सर्व गुणांनीं संपन्न असल्यामुळें, त्याच्या यजमानास तो फार आवडत असे. आणि तो जसजसा मोठा होत चालला, तसतसें **रघुनाथराव** यांचें त्याजवर अधिकाधिक प्रेम जडत चाललें.

**रघुनाथराव** ह्यांस ख्यालीखुशाली फार आवडत असे,

यामुळें ते प्रतिदिवशीं दुकानचें काम बारांवर चार वाजे तोंपर्यंत करून नंतर घरीं जात असत; आणि तेव्हांपासून आपल्या मोतीबागेंत, आपली स्त्री व कन्या यांसुद्धां फिरायास जात; परंतु आजचें काम उद्यांस शिल्लक न राहवें, यासाठीं त्यानीं पेढीवर असा बंदोबस्त ठेविला होता कीं, आपण घरीं गेल्यावर, संध्याकाळपर्यंत आपल्या नांवाचे जे लखोटे येत, ते **मदनराव** नांवाचा एक कारकून होता त्यानें आपणास देऊन, नंतर आपल्या घरीं जावें.

**मदनराव** याची लखोटे घेऊन जाण्याची, आणि यजमानांची बागेंत जाऊन हवा खात बसण्याची वेळ एक होत असे; यामुळें यजमानाची अल्पवयस्क व अत्यंत रूपवती कन्या **विठाबाई** हिची व **मदनरावची** प्रतिदिवशीं दृष्टादृष्ट होत असे. तारूण्य, सौंदर्य, आणि मर्यादशीलपणा या तीन गुणांचें स्त्रीजातीच्या ठिकाणीं ऐक्य झालें, ह्मणजे पुरुषाचें अंतःकरण चंचल झाल्यावांचून राहणार नाहीं. **मदनराव** हा यजमानाचे लखोटे पावते केल्यावर, आपल्या घरीं जातांनां वाटेनें, **विठाबाईचें** स्वरूप मनांत आणून,—'कसेंही असो, परंतु तिला मी आपली स्त्री करीनच करीन.' असा आपल्या मतांत बेत करी, आणि यजमानास पुत्र नाहीं, याकरितां मजसारिखा जामात त्यास मिळाल्यावर तो मलाच आपल्या सर्व संपत्तीचा वारस करील; असें मनांत आणून फार संतोष मानीत असे.

**मदनरावास** असें वाटत असे कीं, माझ्यासारख्या पुतळ्यास अवलोकन करून, यजमानाच्या कन्येचें अथवा को-

णत्याही स्त्रीचें मन विव्हल झाल्यावांचून कसें राहील? मग माझ्या प्रीतीच्या लाभाविषयीं तीस इच्छा कां उत्पन्न होणार नाहीं? परंतु असे विचार मनांत येणें, हा त्याचा दोष नाहीं; कारण आपले दुर्गूण आपल्या मनांत येणें, हें **मदनराव**सारख्या अविचारी, दुर्व्यसनी आणि मूर्ख मनुष्याचें काम नाहीं.

असो. इकडे **रंगनाथ** हा आपल्या कामांत फार तत्पर असून, आपल्या यजमानाच्या मर्जीनुरूप वागत असे; तेणेंकरून त्यावर **रघुनाथरावजींची** प्रीति आणि विश्वास विशेष बसत चालला. एके दिवशीं **रघुनाथराव** यांनीं, **रंगनाथ** आणि **मदनराव** हे दोघे पेढीवर बसले होते, तेथें येऊन **रंगनाथास** हाक मारिली.

**रघुनाथराव** – **रंगनाथ**, आजपासून—मी घरीं गेल्यावर माझे सर्व लखोटे तूं मजकडे पावते करीत जा, समजलास काय? ( इतकें सांगून **रघुनाथराव** घरीं गेले.)

**मदनराव** – ( रागानें अतिशय संतप्त होऊन ) हं हं, ठीक ठीक; याचें नांव काम! पत्रें नेण्याचें काम आजपर्यंत मजकडे होतें, तें आपल्याकडे यावें या हेतूनें आपण मजविषयीं नानाप्रकारच्या चहाड्या सांगून यजमानाचे कान भरलेत; असो. असा तोंडचाटेपणा आणि हलकटपणा मला अगदीं आवडत नाहीं.

**रंगनाथ** – मला चहाड्या करण्याची अगदीं संवय नाहीं, आणि मी कधीं तोंडचाटेपणाही केला नाहीं; यासाठीं तुमचें बोलणें अगदीं अप्रयोजक आहे, असें मला वाटतें.

**मदनराव** – वाहवारे वाहव्वा! तुझें हें खरें स्वरूप मी आजपर्यंत ओळखिलें नव्हतें. सुंदर मुखकमळ, वाचा चंदनाहून शीतळ, आणि हृदयांत रे कोठून इतका मळ!!

**रंगनाथ** – दादा हे तुमचे शब्द माझे मनास फार दुःख देतात; याजकरितां आतां थोडक्यांतच आटपाल तर बरें होईल.

**मदनराव** – असें काय! मी तुझ्या मनांतील भाव समजलों. तूं चोंबडेपणा करून यजमानाची मर्जी संपादन करावीस, आणि आमचा भाव कोणी विचारूं नये, हाचना तुझा उद्देश? राजेश्री, आपलीं सर्व कृत्यें माझे लक्षांत आहेत. गेल्या शनवारीं आपण यजमानापाशीं मजविषयीं जो मजकूर बोलत होतां, तो मी दरवाजाचे फळीस कान लावून सर्व ऐकिला. आपण एकजागीं बसणारेच जर एकमेकाच्या चहाड्या यजमानापाशीं सांगूं लागलों, तर आपल्या थोरपणास उपमाच राहिली नाहीं; असो. आजच्या काळांत अशा चोंबड्या लोकांचीच फार चाहा आहे.

**रंगनाथ** – दादा, तुह्मी अझून तरी आपलें पांडित्य पुरे करा. मी तुह्मांस साफ सांगतों कीं, चोंबडेपणा हा शब्द पुनः तुमचे तोंडांतून निघाला, तर मी काय करीन याचा नेम नाहीं!

**मदनराव** – अरे जारे: तुझ्यासारखीं मुलें मी आजपर्यंत पुष्कळ खेळविलीं आहेत:– तुझ्या हातून माझें काय होणार आहे?

**रंगनाथ** – तुह्मी चोंबडेपणा हा शब्द पुनः तोंडांतून काढिला असता, तर, माझ्या हातून काय व्हावयाचें आहे, तें तुह्मांस आतांच समजलें असतें; आतां तुह्मी शहाणे असाल तर तसे अपशब्द पुनः उच्चारूं नका.

**मदनराव** – असें काय? तर बाबा मला आतां तुझ्या रोडक्या शरिराचें भय वाटूं लागलें आहे!

**रंगनाथ** – तुह्माविषयीं मी यजमानापाशीं कांहीं मजकूर बोलत होतों, तो तुह्मी दारामागें उभें राहून ऐकिलात ह्मणून सांगतां, तर असें चोरटें काम करणाराचा हलकेपणा मनांत न आणितां, यजमानाचें व माझें काय बोलणें झालें, तें मी खुलाशानें सांगतों, ऐका.

**मदनराव** – ठीक आहे, चालूं द्या; ऐकूं द्या काय मुक्ताफळें मुखांतून निघतात तीं!

**रंगनाथ** – **रघुनाथराव** महाराज एके दिवशीं मजपाशीं सांगूं लागले कीं, **मदनचे** तोंडास तंबाखूचा वास येत असतो.

**मदनराव** – बरें मग त्यांस तुह्मी काय उत्तर दिलेंत?

**रंगनाथ** – मी त्यांस स्पष्ट सांगितलें कीं, **मदनराव** दादा हे, तंबाखू ओढतांना मला कधीं आढळले नाहींत.

**मदनराव** – तर मग त्या दिवशीं आपण माझी मोठीच गय केलीत!

**रंगनाथ** – मी गय केली असें मला वाटत नाहीं; कारण जर मी तुह्मास दुकानांत तंबाखू ओढतांनां कधीं पाहिलें असतें, तर मी तसें सांगण्यास कधीं चुकलों नसतों.

**मदनराव**–( **रंगनाथ**कडे मोठ्या त्वेषानें पाहून ) तें कसेंही असो, परंतु इतःपर तूं संभाळून ऐस. आणि, 'आपण भलें तर जग भलें' ही ह्मण पक्की लक्षांत ठेव, इतकेंच माझें सांगणें आहे.

**मदनरावच्या** दुर्भाषणानें **रंगनाथ** याच्या हृदयास बरींच क्षतें पडलीं; परंतु तीं सर्व त्यानें शांतपणानें सहन करून, त्याप्रकरणीं पुनः कोणापाशीं अगदीं उद्गारही काढिला नाहीं. नंतर संध्याकाळीं पांच वाजण्याचे सुमारास दुकानांतील सर्व लखोटे बरोबर घेऊन तो यजमानाच्या घरीं गेला, तेव्हां यजमान बागेंतील बंगल्यांत बसले होते, तेथें जाऊन त्यानें ते त्यांजपाशीं दिले.

**रंगनाथाची** वृत्ति फार सत्वस्थ होती, तथापि तो पहिल्याच दिवशीं **मदनराव**प्रमाणें त्या **विठाबाईच्या** सौंदर्यरूप फाशांत सांपडला गेला, आणि त्या दिवसापासून त्यास तिच्या सान्निध्याखेरीज इहलोकसंबंधीं सर्व सुखें अगदीं तुच्छ वाटूं लागलीं; व रात्रंदिवस तिचें स्वरूप त्याच्या डोळ्यापुढून जाईनासें झालें.

इकडे **विठाबाईचें** मनही **रंगनाथाच्या** उत्तम स्वरूपानें इतकें आकर्षित झालें कीं, ती आपल्या बापाच्या आज्ञेवरून **रंगनाथास** देण्याकरितां पेल्यांत चहा ओतीत असतां, पेला एकीकडे राहून चहाची धार भलतीकडेच पडूं लागली; व ती त्या दिवशीं मध्यानरात्र होईपर्यंत चांदण्यांत बसून, 'उद्या **रंगनाथ** येईल काय? पुनः तें स्वरूप माझ्या दृष्टीस पडेल काय?' अशा अनेक प्रकारचा विचारांत निमग्न होती. याप्रमाणें **विठाबाई** आ-

णि **रंगनाथ** हीं उभयतां आपआपल्या जागीं परस्परांच्या प्रीतीचा मानसिक अनुभव घेत असतां, सुमारें पंधरा दिवस लोटल्यावर एके दिवशीं **मदनराव** यानें **रंगनाथास** आपल्या बोलण्याचा प्रत्यय दाखविला.

**रघुनाथराव** यांचा **श्रीनिवासराव** ह्मणून एक मित्र होता; त्यास कारणपरत्वें ६००० रुपयांची गरज लागल्यावरून, **ग्वाल्हेरहून** आलेल्या शाहाजोग असून, बिनमुदतीच्या व तितक्याच रकमेच्या तीन हुंड्या **रघुनाथराव** यांचेजवळ होत्या, त्या त्यानीं **श्रीनिवासरावचे** घरीं नेऊन पोंचत्या करण्यासाठीं **रंगनाथ** याजपाशीं दिल्या व ह्मणाले:—

**रघुनाथराव** – **रंगनाथ**, तूं स्वतः जाऊन ह्या हुंड्या **श्रीनिवासरावास** लवकर नेऊन दे.

**रंगनाथ** – बरें आहे. **मदनराव**कडून आजच्या मितीस ह्या हुंड्यांचा जमाखर्च करवून, नंतर अण्णासाहेबांस नेऊन देतों.

**रघुनाथराव** – होय, बरी आठवण केलीस; पण लवकर जा बरें. त्या ऐवजावांचून अण्णाची मोठी हरकत झाली असेल.

**रंगनाथ** – ( हुंड्या **मदनरावचे** हातीं देऊन ) दादा, ह्या हुंड्यांचा जमाखर्च लवकर करा; यजमानांनीं आतां काय सांगितलें तें ऐकिलेंत ना ?

**रंगनाथानें** हुंड्या **मदनरावचे** हवालीं करून, आपण दुसरें कांहीं फार जरूरीचें काम होतें, तें करायास लागला. इतक्यांत **मदनरावनें** आपली पेटी उघडून, आंतून एक

बिलोराची कुपी काढिली, आणि खालीं तोंड करून तींतील सुधारसाचा (* * चा) एक घोंट घेतला; **रंगनाथास** हा अविचार सहन न होऊन, त्यानें **मदनराव** यास लागलेंच सांगितलें:—

**रंगनाथ**— दादा, अशा कर्मांचीं फळें काय होत असतात हें तुह्मांस ठाऊकच आहे, मी सांगावेंसें नाहीं. या व्यसनाच्यापायीं पुष्कळ मोठे मोठे गृहस्थ धुळीस मिळाले आहेत.

**मदनराव** – ( मोठ्या त्वेषानें **रंगनाथकडे** अवलोकन करून ) तुझा माझ्या खासगी कामांत मन घालण्याचें कांहीं एक प्रयोजन नाहीं; व इतःपर मजपाशीं अशा गोष्टी बोललास तर खबरदार. आतां मी किंवा तूं धुळीस मिळणार, तें लवकरच तुला समजेल. ( हे शेवटले शब्द बोलून गेल्यानंतर **मदनरावास** किंचित् पश्चात्ताप झाला.)

**मदनरावची** ती क्रोधाविष्ट मुद्रा पाहून, **रंगनाथ** यानें त्याशीं कांहीं एक भाषण न करितां, हुंड्यांचे कागद मात्र त्याजपासून मागून घेतले; आणि ते एका लखोट्यांत घालून त्यावर मोहोर करीत आहे, इतक्यांत यजमानानीं त्यास बोलाविलें ह्मणून तो तिकडे गेला. जातांनां हुंड्यांचा मोहोरबंद लखोटा त्यानें आपल्या पेटींत ठेवून पेटीस कुलूप लाविलें. परंतु तो परत येऊन पाहतो तों— लखोटा पेटीवर मोकळाच पडला आहे !

**रंगनाथ** – ( चकित होऊन ) यजमानाकडे जातांनां मी हा लखोटा स्मरणपूर्वक पेटींत ठेविला, असें असून, आतां हा बाहेर कसा निघाला कोण जाणें !!!

**मदनराव** – ( स्वाभाविक रीतीनें ) तुह्मी लखोट्यावर मोहोर केलीत, तेव्हां लाखेचा तुकडा मात्र पेटींत ठेविलात, आणि लखोटा बाहेरच विसरलात.

**रंगनाथ** यास **मदनरावचें** बोलणें खरें वाटून, त्यानें पेटीवरील लखोटा खिशांत घातला, आणि यजमानाच्या आज्ञेप्रमाणें तो **श्रीनिवासरावकडे** जावयास निघाला; इतक्यांत **मदनराव** कांहीं चमत्कारिक रीतीनें हांसून वेडेचाळे करीत आहे, असें त्यास वाटल्यावरून, बाहेरील खिडकींतूनच त्यानें त्यास विचारिलें कीं,– दादा असें काय करितां; तुह्मास इतका आनंद कशाचा झाला आहे? **मदनरावनें** उत्तर दिलें कीं, 'आज माझी प्रकृति नीट नसल्यामुळें मी औषध घेतलें होतें, त्याचेयोगानें मला हें असें झालें आहे.' हें मद्यप्राशनाचें फळ आहे, असें **रंगनाथ** समजला व आपल्या कामास गेला.

**रंगनाथ** यानें **श्रीनिवासराव** यांचे घरीं जाऊन हुंड्यांचा लखोटा त्यांच्या स्वाधीन केला, इतक्यांत घड्याळाचे पांच ठोके वाजले. ते ऐकून, त्यास पेढीवर परत येण्याची इतकी घाई झाली कीं, अण्णासाहेबांनीं लखोटा फोडून हुंड्या मोजून घेण्याचे पूर्वींच तो तेथून निघाला, आणि पेढीवर येऊन पेटींतील सर्व लखोटे त्यानें जमा करून, यजमानाच्या घरीं पोंचते केले. याप्रमाणें यजमानांनीं फर्माविलेलीं सर्व कामें आटपून, **रंगनाथ** आपल्या बिऱ्हाडीं जावयास निघाला, इतक्यांत ती सौंदर्यखाणी **विठाबाई** हांसत हांसत आपल्या पित्याकडे जात असतां, तिची आणि **रंगनाथाची** दृष्टादृष्ट झाली. तेव्हां उभय-

तांनीं एकमेकास पाहून लज्जेनें तीं क्षणभर स्तब्ध उभीं राहिलीं, आणि लागलींच चालतीं झालीं. **विठाबाईच्या** मुखावर उदासीनतेची छाया इतकी व्यक्त उमटली होती, तथापि त्यायोगानें तिच्या स्वरूपाची शोभा तिळभरही कमी न होतां, मोहकपणा मात्र पहिल्यापेक्षां दसपट जास्त दिसूं लागला; आणि **रंगनाथाचे** पंचप्राण त्या सुंदरीनें आकर्षण केल्यामुळें, तो आपल्या बिऱ्हाडीं येत असतां, तिचें तें हास्यवदन त्याच्या डोळ्यांपुढें दिसत होतें; आणि तिचें सान्निध्य होऊन, अशा प्रकारचें सुख उत्पन्न करणारे प्रसंग वारंवार प्राप्त होण्यास कोणती युक्ति योजावी, या विचारांत तो निमग्न होता. शेवटीं त्यानें आपल्या यजमानाच्या वाड्याजवळ जाऊन राहाण्याचा निश्चय केला, आणि हा आपला बेत त्यानें त्याच रात्रीं आपल्या बिऱ्हाडाच्या मालकिणीस कळविला.

**रंगनाथ** – मावशीबाई, मी आठ दिवसांच्या आंत आपलें बिऱ्हाड दुसरे ठिकाणीं नेण्याचा विचार केला आहे; आजपर्यंत तुमच्या छायेखालीं सुखानें दिवस काढिले, यामुळें आतां एथून जाण्याचें जिवावर आलें आहे, परंतु इलाज नाहीं.

**मावशी** – कांरे बाबा? एथें तुह्मास कोणती अडचण आहे? तुह्मी एथें हवे तसें नाचता, खिदळता, परंतु मी कधीं कोणास चकार शब्द तरी बोलस्यें आहे?

**रंगनाथ** – तें मावशी सगळें खरें; परंतु माझ्या मनांत कोठें तरी चांगल्या वस्तींत आणि हवाशीर जागेंत जाऊन राहाण्याची हौस आली आहे.

**मावशी** – हं हं असें काय ? आतां तुमचें प्रस्थ वाढत चाललें; ठीकच आहे ! पण बाबारे, ज्या घरांत आपण लहानाचे मोठे झालों, आणि ज्या जागेंत **ईश्वरानें** आपल्यास हा दिवस दाखविला, त्या जागेस कधीं कंटाळूं नये; बरें, तूं ह्मणशील कीं, मी गेल्यावर मावशीची जागा रिकामी पडेल आणि मावशीचे भाड्याचें नुकसान होईल; तर असें मुळींच समजूं नको. ही जागा आठ दिवस देखील रिकामी राहाणार नाहीं. मला तूं नेहेमीं मावशी मावशी ह्मणतोस, भाड्याचा पैसा वेळच्यावेळेस देतोस, कामकाज सांगितलें तर आस्थेनें करतोस, ह्मणून तुला मी तुझ्याच कल्याणाच्या दोन गोष्टी सांगितल्या, आतां हवें तसें कर.

**रंगनाथ** – छे, छे, मावशी तें कांहीं नाहीं. माझें मान जें आजपर्यंत होतें, तेंच आतांही आहे. ( **विठाबाईचा** मुखचंद्र मनांत आणून हर्षानें सद्गदित होतो ) परंतु मला एक ठेव लाधेल असें वाटतें. ( इतकें बोलून घरांत जाऊं लागतो; इतक्यांत मावशीबाई त्यास परत बोलावून ह्मणते. )–

**मावशी** – हो, हो, बरी आठवण झाली. **मदन** तुझा मित्र आतांच एथें येऊन तुला हाका मारीत होता रे बाबा; आणि जातांनां ह्मणाला कीं, "**रंगनाथ**बरोबर मला कांहीं जरूरीचें काम होतें."

**रंगनाथ** – केवढें आश्चर्य हें ! **मदनरावास** माझ्या घरीं येण्याचा बहुधा हा पहिलाच प्रसंग असेल.

या प्रमाणें बोलून, **रंगनाथ** आपल्या खोलींत गेला, आणि मावशीबाई आपल्या उद्योगास लागली. **रंगना-**

त्यास विठाबाईचा इतका निजध्यास लागला होता की, त्या रात्रीं बारांवर एक वाजे—तोंपर्यंत त्यास निद्रा आली नाहीं; व त्यायोगानें दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं खिडकी-च्या फटींतून सूर्याचें किरण त्याच्या अंगावर पडले, तरी तो जागा झाला नाहीं. पुढें सात वाजण्याचे सुमारास घाई-घाईनें उठून, नित्यक्रमाप्रमाणें प्रातःस्मरण करावयास बस-ला असतां, मावशीबाई कोणाशीं बोलत आहे, आणि म-दनरावसारख्या स्वराचा कोणी मनुष्य तिला प्रत्युत्तर देत आहे, असा भास झाल्यावरून, तो माडीवरून खालीं आला, आणि मदनरावास पाहून अत्यंत चकित झाला.

**रंगनाथ** — ओहोः, **मदनराव** दादा, आज आपली स्वारी इकडे कोणीकडेस झुकली !

**मदनराव** — आपली झोंप पुरी झाली का पण ? ए-कूण बराच लवकर उठण्याचा पाठ आहे !

**रंगनाथ** — आज आपली स्वारी येण्यास, आणि मी उशिरानें उठण्यास गांठ पडली इतकेंच, नाहीं तर मी नेहमीं सूर्योदयापूर्वीं उठत असतों; मावशीबाईस विचारा पाहिजे तर. असो. काय नवल विशेष वर्तमान आहे.

**मदनराव** — मला तुह्मापाशीं कांहीं मजकूर एकांतीं बोलावयाचा आहे.

**रंगनाथ** — तर मग अंमळ माडीवर बसा, मी मुख-मार्जन वगैरे आटपून येतों, समजलां दादा ?

( **रंगनाथ** शौचास जाऊन मुखमार्जन करून **मदनराव**-जवळ येतो. )

**मदनराव** — काल पेटीवर मी कांहीं एक अवि-

चाराचें काम करित असतां, तुह्मी प्रेमबुद्धीनें मला निषेधिलेंत, आणि माझी मुर्वत न धरितां माझा दोष मला कळविलात, परंतु त्या वेळेस तें, अमलाच्या नादांत मला अगदीं रुचलें नाहीं; परंतु घरीं आल्यावर, त्या गोष्टीविषयीं मला अतिशय पश्चाताप होऊन, इतःपर सर्व दुर्व्यसनें सोडून, चांगल्या रीतीनें वागण्याविषयीं मी दृढ निश्चय केला आहे, आणि मला ही सद्वासना उत्पन्न होण्यास तुह्मीच कारण झालां, हें मनांत येऊन, तुह्मापाशीं आजपर्यंत झालेल्या अपराधांची क्षमा मागण्यासठीं मी आलों आहे.

**रंगनाथ** – असें घडेल तर मग आणखीं काय पाहिजे!

**मदनराव** – तुमचा हेतु **परमेश्वर** पूर्ण करील, आणि, मी पूर्वींचा **मदन** नव्हे, असें तुह्मास लवकरच वाटूं लागेल. बरें तर येतों आतां, नमस्कार.

**मदनराव** जोंपर्यंत **रंगनाथाचे** घरीं बसला होता तोंपर्यंत त्यानें वाक्पांडित्य फार सुरस केलें खरें; परंतु त्याचे सर्व हावभाव **रंगनाथास** कृत्रिमासारखे वाटले. कारण, **रंगनाथानें मदनरावच्या** मुखाकडे पाहिलें, परंतु खऱ्या पश्चात्तापाची छाया त्याच्या मुखावर अगदीं दिसली नाहीं. **रंगनाथास** आधींच निजून उठवयास उशीर झाला होता, त्यांत अर्धा तास **मदनरावचे** वाग्विलासांत मोडला, यामुळें तो घाईघाईनें भोजन आटपून कचेरींत जाण्याची तयारी करीत होता. इतक्यांत खोलीच्या दाराशीं कोणी ठोठावित आहे, असें त्यास वाटून त्यानें दार उघडिलें, आणि पाहतो तों, एक मोठा दांडगा पुरुष, स्वरूपानें भयंकर आणि वेषानें पोलीस-

खान्यांतील यमदुतासारिखा असा त्याच्या दृष्टीस पडला; आणि त्याच्या हातांतील १० शेर वजनाचा सोंटा, तोंडाभोवतीं अर्धशेर वजनाच्या केंसाच्या झुपका, आंगठ्यासारख्या जाड भिंवया, खैराच्या निखाऱ्यासारखे त्याचे लाल डोळे आणि मध्यें गाजरासारखें मोठें नाक पाहून, **रंगनाथास** फार आश्चर्य वाटलें.

**रंगनाथ** – ( दार उघडून त्यास ह्मणतो ) या, आंत या; जमादार, काय हुकूम आहे ?

**जमादार** – तुमचें नांव **रंगनाथचना** ? तुह्मी **रघुनाथराव** महाराजांच्या पेढीवर चाकर आहांत ना ?

**रंगनाथ** – होय, मलाच **रंगनाथ** असें ह्मणतात.

**जमादार** – ठीक ठीक, ( विनोदानें ) आणि मला **शेखरहीम** जमादार ह्मणतात. माझें नांव आपल्या ऐकण्यांत असेलच.

**रंगनाथ** – नाहीं. मला आपलें किंवा इतर कोणत्याही पोलीस अम्मलदाराचें नांव कळण्याची आजपर्यंत कधींच गरज पडली नाहीं.

**जमादार** – असें काय; ( मी एवढा मोठा अम्मलदार असून माझें नांव यास ठाऊक नाहीं, हें पाहून जमादाराची मर्जी बेताल होते. ) ठीक ठीक, तुह्मावर कांहीं फौजदारी खटला झाला आहे, ह्मणून मी तुह्मास कैदी करून नेण्यासाठीं आलों आहें, यासाठीं तुह्मी अद्वातद्वा बोलून कायद्याच्या पेंचांत येऊं नका. नाहीं तर मला तें सर्व कोतवाल साहेबापाशीं सांगावें लागेल, समजलां ?

**रंगनाथ** – ( घाबरतो ) जमादार, आपण काय ह्मणतां हें? माझे नशीबीं कैदी हा शब्द लागावा, असें मी आजपर्यंत कोणतेंही काम केलें नाहीं; कारण मी कधीं कोणत्याही खटल्यांत पडत नाहीं. असो! ईश्वरेच्छा! ( कपाळास हात लावितो. )

**जमादार** – ( किंचित् दया येऊन ) तुह्मी धीर सोडलात कीं बुडलांच, माझें ऐकाल तर स्वस्थ असा; कारण तुह्मी निर्दोष असाल तर तुह्मास कांहीं भय नाहीं.

**रंगनाथ** – पण जमादार, मजवर आरोप ठेवणार कोण आणि कोणत्या बाबतींत हें तरी मला ऐकूं द्या?

**जमादार** – तें मी सांगतों, घाबरूं नका; तुह्मी आपल्या यजमानाच्या पेढीवर ६००० रूपयांची चोरी केल्याची तुह्मावर फिर्याद झाली आहे. दुसरें कांहीं नाहीं.

**रंगनाथ**– ( गोंधळेता ) मी – मी – मी – ( असलें काम करणारा मनुष्य नव्हें,–असें ह्मणणार तोंच जमादार मध्येंच बोलूं लागतो. )

**जमादार** – हं, हं, याचेंच नाव सावधगिरी; पुरी विद्या ती ही!

**रंगनाथ** – कशाचें नांव सावधगिरी? मी तुमच्या मनांतील भाव समजलों नाहीं.

**जमादार** – तुमच्या– मी मी मी ह्मणण्याचा अर्थ, मी सर्व गोष्टी नाकबूल करीन हाच कीं नाहीं? बस् झालें तर; अहो, आह्मी उडत्या पाखरांचे पंख मोजणारे लोक; आह्मापाशीं तुमचा गमजा तो किती चालणार आहे? बरें

असो; चला आतां माझ्याबरोबर. आपण हातांत हात घालून चालूं, ह्मणजे आपण उभयतां मित्र आहों असें लोकांस वाटेल, आणि कोणाच्या मनांत दुसरी कोणतीही शंका येणार नाहीं. हं, चला, चला लवकर, मला सावकाश चालतां येत नाहीं.

यापमाणें बोलत बोलत, जमादारानें **रंगनाथास** मुख्य कोतवालाच्या कचेरींत नेलें, आणि त्यावर चोरीचा खटला चालविला; त्यांत, **श्रीनिवासराव** यानीं आपल्या जबानींत असें लिहून दिलें कीं, आरोपी **रंगनाथ** यानें मजपाशीं जो लखोटा आणून दिला, त्यांत एकही हुंडी नव्हती, परंतु कांहीं रद्दी कागदांचे तुकडे मात्र होते. इकडे मुख्य कोतवालापुढें खटल्याच्या चौकशीस आरंभ झाला, असें पाहून, **शेखरहीम** जमादार, **रंगनाथाचे** घरीं गेला; आणि घराचा झाडा घेत असतां, हरवलेल्या हुंड्यांपैकीं एक १२०० रुपयांची हुंडी त्याच्या बंडीच्या खिशांत सांपडली, ती त्यानें ( जमादारानें ) खटल्याच्या पुराव्यास हजर केली. **रघुनाथराव** यानीं, त्या हुंडीचा उतारा त्यांच्या कचेरींत होता, त्यावरून असें सिद्ध केलें कीं, 'पूर्व-दिवशीं **रंगनाथपाशीं** दिलेल्या हुंड्यांपैकींच ही हुंडी आहे.' याप्रमाणें हकीकत झाल्यावर, सर्वांस या खटल्याचें स्वरूप स्पष्ट दिसूं लागलें; आणि मुख्य कोतवाल व त्याचे चिटणीस यांचे नेत्रसंकेत होऊन, त्यांस वाईट वाटलें, व त्यांचीं तोंडें उतरून गेलीं. यावरून **रंगनाथावर** चोरीचा गुन्हा खास लागू होतो, असें सर्वांस वाटलें.

**कोतवाल** -- आरोपीस कळविलें जातें कीं, या मोठ्या गुन्ह्याची चौकशी होण्यासाठीं हा खटला आह्मी वरिष्ट-अम्मलदारांकडे पाठवितों. आरोपी यानें आपल्या बचावासाठीं कांहीं बोलावयाचें असल्यास बोलावें, परंतु तें बोलणें आरोपीच्या विरुद्धपक्षास बळकटी आणील असें आह्मांस वाटतें.

**रंगनाथ** – मी अगदीं निर्दोषी आहे, हें मी **परमेश्वरास** स्मरून सांगतों. याखेरीज मला आणखीं कांहीं बोलावयाचें नाहीं.

**कोतवाल** – बरें बरें. हा गृहस्थ अल्पवयस्क असून बराच धीट आहे. असो. हें प्रकरण वरिष्ट-कोर्टाकडे रवाना करितों. व तेथें वादी **रघुनाथराव** यांनीं आपले तर्फेचा पुरावा करावा. चला, ७ नंबरच्या खटल्याचे लोक बोलवा.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं, **विश्वासराव** नांवाचे, **रघुनाथराव** यांच्या ओळखीचे एक संभावित गृहस्थ होते, त्यांच्या घरीं एका बाईनें (त्यांस नकळत) एक लखोटा आणून टाकिला. तो त्यांचे हातीं लागतांच त्यांनीं फोडून पाहिला, तेव्हां त्यांत एक २०० रुपयांची हुंडी, व '**रंगनाथ** हा खचित् निर्दोषी आहे, यासाठीं आपण या कामीं मेहनत घेऊन त्यास या संकटांतून मुक्त केल्यानें **परमेश्वर** फार संतुष्ट होईल.' अशा मजकुराचें एक पत्र– असे दोन कागद सांपडले. **विश्वासराव** यांस तें पत्र आणि हुंडी पाहून फार आश्चर्य वाटलें; व हें पत्र

आणि हुंडी कोणी पाठविली असावी, ह्याविषयीं ते बराच वेळ मनांत विचार करित होते, पण त्यांचा कांहींच तर्क चालेना. शेवटीं ते लागलेच तुरुंगांत गेले व **रंगनाथ** ह्यास भेटून आले. दोन प्रहरीं भोजनोत्तर, त्यांच्या मित्रवर्गापैकीं **जनार्दनपंत** ह्मणून एक प्रामाणिक आणि कुशल वकील होते, त्यांच्या घरीं जाऊन **विश्वासरावनीं** झालेली सर्व हकीकत, व **रंगनाथ** यानें सांगितलेला सर्व मजकूर त्यांस विदित केला. वकिलानीं **विश्वासराव** यांचें सर्व बोलणें ऐकून घेतल्यावर, पूर्वीं कोतवालानें व त्याच्या चिटणिसानें जशी दीनमुद्रा केली होती, तसेंच यांसही वाटून ते खालीं पाहूं लागले. व आपणास या कामांत यश मिळणार असें त्यांस वाटलें.

**विश्वासराव** – ( वकिलास ) बरें, आतां याविषयीं तुमचें काय ह्मणणें आहे ?

**वकील** – आमचें ह्मणणें हेंच कीं, आरोपीच्या कपाळीं– स्वदेशत्याग करणें, हीं अक्षरें स्पष्ट लिहिलीं आहेत, समजलात.

**विश्वासराव** यांस त्यांचें नांव शोभत होतें, कारण 'स्वदेशत्याग' हे शब्द वकिलाच्या मुखांतून येतांच त्यानां आतिशय दुःख वाटलें, व त्यांचे नेत्र अश्रूंनीं भरून आले.

**विश्वासराव** – **जनार्दनपंत**, चला. आपण दोघेही जाऊन पुनः एक वेळ कैदीस भेटूं; कारण तसें केल्यावांचुन तुमची खातरी होणार नाहीं.

**वकील** – तुमची मर्जी असल्यास चला. परंतु म-

ला वाटतें त्यांत कांहींच अर्थ नाहीं. ( उभयतां तुरुंगांत जाऊन येतात.)

**वकील** – कैदीस पाहिल्यावरून मला वाटतें कीं, तो निर्दोषी असावा, आणि कोणी दुष्ट मनुष्यानें त्याजवर हें तुफान घेतलें असावें; परंतु असें नसेल तर इतःपर मी मनुष्यमात्रांस कृत्रिमी असें समजून, कधींच कोणावर भरंवसा ठेवणार नाहीं. असो. आतां पुढें कर्तव्य काय, तें सांगा. आज कोण, सोमवार आणि **रंगनाथ** याचा खटला गुरुवारीं सुरू होणारना? तर मग आपल्यास विचार करावयास उद्यांचा व परवांचा असे दोनच दिवस राहिले आहेत. हो बरी आठवण झाली! मी तुह्मांस एक गोष्ट केव्हांपासून विचारणार होतों! **रघुनाथराव** यांचा मुख्य हेतु कोणता आहे? चोरी सांपडावी किंवा **रंगनाथ** याची आब्रू जावी? कारण, त्यांच्या मनांत केवळ चोरीचाच ठिकाण लागावा असें असल्यास, ते आपल्याशीं फारसा विरोध न बाळगतां, आपण त्यांजकडे कांहीं माहिती विचारावयास गेलों असतां सांगतील. **रंगनाथ** हाच चोर ठरवावा, असा त्यांचा हेतु बहुतकरून नसेल, मग कोण जाणे! नारळांतील पाण्याचें वचन कोणी सांगावें.

**विश्वासराव** – छे; छे; कोणत्याही युक्तीनें आपली चोरी सांपडावी, आणि अपराधावांचून कोणास शिक्षा न व्हावी, हीच **रघुनाथराव** यांची इच्छा आहे. कारण **रंगनाथ** याजवर त्यांची फारच ममता आहे.

**वकील** – तर मग चला, आपण **रघुनाथराव** यांचा कसा काय मानस आहे, त्याचा खुलासा काढूं. असल्या कामास त्वरा होईल तितकी चांगली. ( दोघेही **रघुनाथराव** यांचे पेढीवर जाऊन **मदनराव** यास भेटतात.)

**मदनराव** – ( संभावितपणाचा आव घालून ) यावें महाराज. आपण कोणाकडे आलां आहांत ?

**वकील** – आह्मांस तुमच्या यजमानास भेटावयाचें आहे.

**मदनराव** – उत्तम आहे. यजमानानीं आपलीं नांवें विचारिलीं तर काय सांगूं ?

**वकील** – मला **जनार्दनपंत** ह्मणतात, आणि ह्यांचें नांव **विश्वासराव** आहे. ( हीं नांवें ऐकतांच, हे गृहस्थ अमुक कामाकरितां आले असावेत, असें **मदनरावनें** आपल्या मनांत धोरण बांधिलें, आणि त्या गृहस्थांस तो यजमानाकडे घेऊन गेला.)

**रघुनाथराव** – यावें, यावें, आज हा अलभ्यलाभ ह्मटला पाहिजे ! ( उठून उभे रहातात. )

**विश्वासराव** – आपण बसावें; मला इतक्या मानपानाची गरज नाहीं, कारण मी आपल्या मंडळींतलाच आहें, आणि हे गृहस्थही ( वकिलाकडे पाहून) कोणी परकी नाहींत.

**रघुनाथराव** – ठीक ठीक; परंतु लोकव्यवहार असा आहे कीं, अत्यंत जिवलग मित्राची देखील फार दिवसांनीं गांठ पडली, ह्मणजे त्याचे योग्यतेप्रमाणें त्याचा आदरसत्कार ठेवावा लागतो. असो, आतां काय आज्ञा आहे ?

**विश्वासराव** – सांप्रतकाळीं असा कांहीं चमत्कारिक प्रसंग आला आहे कीं, मी आपला ह्मणवित असून, कारण परत्वें मला आपल्या विरुद्धपक्षाचा स्वीकार करावा लागला आहे, आणि **रंगनाथाचा** खटला बगलेस मारून, मी आणि **जनार्दनपंत** दादा, आपणाशीं कांहीं बोलावयास आलों आहोंत. दादानीं आपल्या **रंगनाथाचे** तर्फेनें वकिली पत्करिली आहे, याजकरितां माझी हात जोडून इतकीच विनंती आहे कीं, या प्रकरणीं जो मजकूर आपणास ठाऊक असेल तो आपण त्यांस सांगावा.

**वकील** – माझा आपला तादृश परिचय आहे, असें नाहीं; परंतु **विश्वासरावजींच्या** सांगण्यावरून माझी अशी खातरी झाली आहे कीं, आपला मुख्य हेतु खरा न्याय व्हावा इतकाच आहे. परंतु हा गुन्हा **रंगनाथावरच** शाबीत व्हावा, असा आपला आग्रह नाहीं.

**रघुनाथराव** – आपण ह्मणतां हेंच खरें. **रंगनाथास** लहानाचा मोठा मीच केला, आणि आईबापांच्या मागें मीच त्याचें सर्व प्रकारें चालविलें. असें असून, आतां त्यानें चोरी करून मला खालीं पाहावयास लाविलें! असो, **ईश्वरेच्छा**! परंतु मी आपणास मनापासून सांगतों कीं, हें कृत्य त्याच्या हातून झालें नाहीं. याविषयीं कोणी माझी खातरी होण्याजोगा पुरावा दाखवील, आणि खऱ्या चोराचा ठिकाण लावील, त्याचे उपकार मी जन्मभर विसरणार नाहीं. ज्या **रंगनाथानें** आपल्या हुशारीनें, प्रामाणिकपणानें आणि सभ्यपणानें दिवसेंदिवस माझें सर्व प्रेम आपल्याकडे ओढून घेतलें, त्याच्या हातून एकाएकी

एवढें मोठें साहस व्हावें, या गोष्टीचा प्रथम मला असंभव वाटला; परंतु, कोतवालाकडे चौकशी चालली असतां जो पुरावा झाला, त्यावरून मला अगदीं संशय राहिला नाहीं.

**वकील** – आतां माझी इतकीच विनंती आहे कीं, या कामाप्रकरणीं मला आपल्या पेढीवर कांहीं चौकशी करावयाची आहे, त्याविषयीं आपली परवानगी असावी.

**रघुनाथराव** – बरें आहे. तुह्मांस जी चौकशी करावयाची असेल ती खुशाल करा; मजकडून अगदीं हरकत नाहीं. माझा जीव सांप्रत फार घोरांत आहे; कारण संकटें येऊं लागलीं ह्मणजे एकामागून एक माळ लागते.

**वकील** – हें काय विचारावें ! ६००० रुपयांचें एकदम नुकसान झाल्यावर कोणाचें मन स्वस्थ राहणार आहे ?

**रघुनाथराव** – माझ्या **रंगनाथावर** हा भयंकर प्रसंग! आणि माझी एकुलती एक मुलगी **विठा** आज दोन दिवस झाले, दुखण्यानें पडलेली आहे; या दोन संकटांतून मी मोकळा झालों नाहीं, तोंच तिसरें एक प्रकरण तयार आहे !! हे प्राण घेणारे प्रसंग जर न येते, आणि माझें सहा तर काय, पण साठ हजारांचें नुकसान झालें असतें, तरी मी कधीं डगमगलों नसतों.

**वकील** – आपण तिसरें एक प्रकरण तयार आहे ह्मणून ह्मटलें, तें काय आहे बरें ?

**रघुनाथराव** – त्याचा पक्का खुलासा अजून समजला नाहीं. ज्या दिवशीं ही हुंड्यांची चोरी झाली, त्याच्या

दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं, आमच्या पेढीवर **सदू** ह्मणून एक पोरगा नुकताच चाकरीस ठेविलेला आहे, तो आकस्मात् बेशुद्ध होऊन पडलेला कचेरींत सांपडला! **सदूनें** सारा दिवस कचेरींत असून, रात्रीं निजावयास आपल्या बिऱ्हाडीं जावें, असा त्याचा नित्यक्रम असून, त्या दिवशीं तो रात्रींही कचेरींतच राहिला, आणि प्रातःकाळीं पाहतों तों त्याची अशी अवस्था झाली. **सदू** हा प्रकृतीनें सदृढ आणि निरोगी होता, यामुळें त्यास एकाएकीं इतकें दुखणें येईल असें वाटत नव्हतें!

**वकील** – तो मुलगा आतां आपल्या एथें आहे?

**रघुनाथराव** – होय. तो दुखण्यास पडल्यापासून एथेंच आहे, आणि आज कांहींसा बरा आहे; परंतु अझून त्याच्यानें साफ बोलवत नाहीं. मला वाटतें त्यास आतां वेड लागेल, कारण तो आतांच वेड्यासारखे चाळे करूं लागला आहे. ( इतक्यांत **रघुनाथराव** यांच्या घरांत **चंद्री** नांवाची एक स्त्री होती ती दुखणेकऱ्याच्या खोलींतून बाहेर आली. )

**चंद्री** – ( कष्टी होऊन ) महाराज, मजपासून एक अन्याय झाला आहे, त्याची मला क्षमा असावी. मी आपणास सर्व कळवित्यें, परंतु माझ्या अन्नावर पाणी पडूं नये! मी वेडी वांकडी, तोंडाळ, मूर्ख अशी जरी आहें, तरी आपल्या पायांपाशीं टिकल्यें आहें, दुसऱ्या जागीं माझा निभाव लागणार नाहीं, यासाठीं मला लातेनें ढकलून देऊं नये! ( रडते. )

**रघुनाथराव – चंद्रे**, सांग काय तें, मी तुझ्या अपराधाची क्षमा करीन. ( हें ऐकून **वकील व विश्वासराव** यांचे परस्परांशीं नेत्रसंकेत झाले. )

**चंद्री** – हा आपला **सदू** त्या दिवशीं रात्रीं मजपाशीं आला, आणि 'मावशी मला अशा काळोखांतून घरीं जाण्यास भय वाटतें,' असें ह्मणून रडूं लागला; तेव्हां मी त्यास, कचेरींत जाऊन जाजमावर नीज, ह्मणून सांगितलें. मला असें होईलसें ठाऊक असतें, तर मी त्यास तितक्या रात्रीं घरीं पाठविलें असतें. महाराज, तें लेंकरूं डोळ्यांतून पाणी काढूं लागलें, तेव्हां मला त्याची दया आली.

**रघुनाथराव – चंद्राबाई**, आपण ही गोष्ट फार चुकलां. असो, आतां तें मनांत आणून उपयोग नाहीं. बरें जा, आतां केलेलें कर्म निस्तारा आणि पुढें असें करूं नका. ( **चंद्री** घरांत जाते. )

**वकील** – हा मुलगा रात्रीचा कचेरींत कां राहिला, हें तर **चंद्राबाईनें** सांगितलें, परंतु तो बेशुद्ध होऊन त्याची वाचा बसली—याचें कारण काय?

**रघुनाथराव** – त्या गोष्टीविषयीं आपली अगदीं अक्कल चालत नाहीं. मी आमच्या वैद्यबावांस, त्या मुलाला पाहण्याकरितां बोलावणें पाठविलें आहे, ते आतां लवकरच येतील. ( इतक्यांत वैद्यबावा येतात. ) यावें यावें, वैद्यराज, मी केव्हांपासून आपली वाट पाहत आहें.

**वैद्यबावानीं रघुनाथराव** यांच्या मुखानें, दुखणाईत मुलाची सर्व हकीकत ऐकून घेऊन, ते सर्व मंडळीसुद्धां

घरांत गेले, आणि पाहतात तों – मुलगा चुलीपाशीं शे-कत बसला आहे, व बावळ्यासारिखा चहूंकडे पाहात आहे.

**वैद्य** – मुला तुला काय होतें ! ( मुलगा कांहीं उत्तर न देतां कुरकुरल्यासारखें करून उगीच राहिला; तेव्हां वैद्यबावानीं त्याचें सर्वांङ्ग तपासून पाहिलें. ) मला वाटतें, हा माडीवरून किंवा झाडावरून पडला असावा, किंवा यास डोक्यावर, मानेवर, किंवा पाठीच्या कण्यावर कोणी तरी बळकट मारलें असावें; त्यावांचून असें व्हावयाचें नाहीं.—( इतक्यांत मुलाचे हातपाय आंखडले, जिव्हा आंत ओढली, आणि श्वासोश्वास मंद होत चालला, तेणेंकरून हा आतां लवकरच मरेल असें सर्वांस वाटलें. ) या रोगास धनुर्वात ह्मणतात, आणि हा अशा कारणावांचून होत नाहीं. बरें असो, आतां यास लवकर आंथरूणावर नेऊन निजवा.

येथें **विश्वासराव** आणि **जनार्दनपंत** वकील हे ज्या कामासाठीं आले होते, तें काम तसेंच राहिलें; यासाठीं ते, **रघुनाथराव** यांस बरोबर घेऊन लागलेच त्यांच्या कचेरींत गेले, आणि त्यांनीं एक लोहार बोलावून आणून, **रंगनाथाच्या** पेटीचें कुलूप त्याजकडून काढविलें. लोहाराच्या सांगण्यांत, तें कुलूप मोडलें नव्हतें खरें, परंतु थोडक्याच दिवसांपूर्वीं तें कोणी तरी चोरकिल्लीनें उघडिलें होतें; कारण आंतील कळीस जागजागीं चरे पडले होते; आणि कुलूप उघडल्यावर त्यांत एक लहानसा लोखंडाचा तुकडाही सांपडला.

इकडे **मदनराव** आपल्या पेटींतून कांहीं कागद काढित होता, त्यानें हें लोहाराचें बोलणें ऐकतांच, पेटीचें झांकण त्याच्या हातून पटकन् सुटून पडलें, तेणेंकरून मोठा आवाज झाला, तेव्हां सर्व मंडळीचें लक्ष तिकडे गेलें.

**मदनराव** – मला क्षमा असावी; महाराज, पेटीचें झांकण माझ्या हातून सहज निसटलें.

**वकील** – ती गोष्ट आमच्या लक्षांत देखील नव्हती! आणि ही सहज झाली नसेल असेंही आह्मांस वाटलें नव्हतें, परंतु– असो. ( इतकें बोलून गप्प राहिले. )

लोहाराच्या सांगण्यावरून, आणि कुलुपांतील लोखंडाचा तुकडा व कळीवरील चरे पाहिल्यावरून, त्या कुलुपास कोणी तरी चोरकिल्ली लाविली असावी, अशी सर्वांची खात्री झाली; आणि **मदनरावच्या** निरर्थक भाषणावरून, व त्याची मुखचर्या अगदीं उतरून गेली हें पाहून, या कृत्यांत **मदनरावचें** आंग असावें, असा **विश्वासराव व वकील** यांस संशय उत्पन्न झाला.

**विश्वासराव** – (**मदनरावास**) काय हो बुवा, हा सर्व प्रकार पाहिल्यावरून तुह्मास कसें वाटतें? कोणी तरी या कुलुपास चोरकिल्ली लागू केली असावी, नाहीं बरें?

**मदनराव** – महाराज, आपल्यापुढें माझी कल्पना ती किती! परंतु केवळ इतक्याच प्रमाणांवरून दगा झाला असेल असें ह्मणवत नाहीं; कारण लोहारानें आतां कुलुप काढतानांच हे चरे पाडले नसतील ह्मणून कशावरून? किंवा–

**विश्वासराव** – हो, तोही संभव दिसतो. (वकिलाच्या कानाशीं लागून हळूच ) हें भाषण लक्षांत ठेवा; पुढें त्याचा उपयोग आहे. ( **रघुनाथराव** यांस ) महाराज, आतां आह्मी आज्ञा घेतों. आमच्यासाठीं आपणास फार श्रम झाले, क्षमा असावी. ( उभयतां जातात. )

**वकील** – कां दादा, पाहिलातनां हा सर्व प्रकार! मला तर खचित् वाटतें कीं, ज्या गृहस्थाचें बोलणें आपण मला लक्षांत ठेवण्याविषयीं सूचना केली, त्याचाच हा सर्व खेळ असावा. नांव **मदन**, मग मन तरी कसें शुद्ध असावें बरें?

**विश्वासराव** – **रंगनाथाच्या** हातून ही चोरी सर्वथा झाली नाहीं; जे गृहस्थ आपण आतां पाहिले, तेच हो हा घोंटाळा करणार बरें. हें महत्कृत्य त्यांच्याशिवाय झालें नाहीं; ह्या सर्व गोष्टी उघड दिसतात खऱ्या, परंतु याविषयीं न्याय करणाराची खातरी होण्याजोगे पुरावे पाहिजेत ते कोठें आहेत?

**वकील** – हो, बरें स्मरण झालें. मला खास वाटतें कीं, काल जो दुखणाईत मुलगा आपण पाहिला, त्याचा या कामांत कांहीं तरी संबंध असावा. असो, **ईश्वरेच्छा**. आपला उद्योग आणि **रंगनाथाचें** नशीब; हो तर आतां दुसरें काय ह्मणावें.

दुसऱ्या दिवशीं ह्मणजे बुधवारच्या रात्रीं, **विश्वासरावजींच्या** घरीं पुनः एक २०० रुपयांची हुंडी व एक पत्र असें कोणी आणून टाकिलें. पत्रांतील तात्पर्य इतकेंच होतें, ‘ **रंगनाथ** हा अगदीं निर्दोषी आहे, यासाठीं त्याच्या

कामांत झटण्याविषयीं **परमेश्वर** आपल्या मनांत प्रेरणा करो, आणि आपणास यश देऊन, उभयतांच्या विश्वासूपणाचा व दयेचा अनुभवही लवकर येवो.'

**विश्वासरावजीस** या पत्रांतील शब्दचरनेवरून व अक्षरांवरून असें वाटलें कीं, हें कोणी तरी कुलीन स्त्रीनें लिहिलें असावें, आणि ती स्त्री अत्यंत अशक्त आणि क्षीण झालेली असावी; कारण पत्रांतील अक्षरें वांकडी आणि कांपरीं आलेलीं होतीं. त्यानीं तीं पत्रें व हुंड्या पाठविणाराचा पुष्कळ शोध केला, परंतु ठिकाण लागला नाहीं; तेव्हां त्यानीं इतकाच तर्क बांधिला कीं, **रंगनाथाचा** कोणी तरी परम मित्र त्याच्या कल्याणाविषयीं तत्पर असून, आपलें नांव प्रसिद्ध करण्यास इच्छित नसेल, ह्मणून त्यानें ही युक्ति योजिली असावी.

तिसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं **विश्वासराव** आणि **वकील** यांचें परस्परांशीं असें भाषण झालें कीं, या चमत्कारिक खटल्यांत आमची द्रव्याकडे अगदीं दृष्टि नाहीं, परंतु आज **रंगनाथ**वरील आरोप दूर होऊन, आह्मांस यश मिळालें, ह्मणजे आमचे सर्व श्रम सफळ होतील; आणि ही कामगिरी बजाविल्याबद्दल आह्मांस बक्षीसही मिळाल्यासारखें होईल.

भोजनोत्तर, **जनार्दनपंत** व **विश्वासराव** न्यायसभेंत जाऊन बसताहेत, इतक्यांत अकरा वाजले; कोर्टांत वकील लोकांची आणि मौज पाहणाऱ्या लोकांची पराकाष्ठेची गर्दी झाली. हा चमत्कारिक खटला, सबब त्या दिवशीं एक मोठे नामांकित न्यायाधीश त्याच्या चौकशीस आले

होते. त्यांनीं पूर्वीं झालेल्या सर्व जबान्या वाचून पाहून त्यांच्यावर जागजागीं खुणा करून ठेविल्या. नंतर पंचमंडळीस बोलावून आणून, शिरस्त्याप्रमाणें त्यांजकडून शपथा घेवविल्या, आणि आरोपी **रंगनाथ** यास, आपल्या समोर आणून कठड्यांत उभा केला. **रंगनाथाची** गंभीर, प्रौढ आणि मोहक मुद्रा पाहून, लोक आपआपल्यांत बोलूं लागले, 'पहा, पहा, तो गृहस्थ किती संभावित आणि गरीब दिसतो आहे. अहो! अशा मोहोऱ्यानें चोरी केली असें त्याच्या यजमानानें ह्मटलें तरी कसें? त्याच्या हातून कोणत्याही प्रकारचा अपराध होण्याजोगा त्याचा रंग तरी दिसत आहे काय?' **रंगनाथानें** आपल्या सभोंवतीं दाटी जमली आहे, आणि आपणास कैदीच्या कठड्यांत उभें केलें आहे, असें मनांत आणून तो अत्यंत दुःखी झाला; व त्यायोगानें त्याचें मुखकमळ म्लान होऊन शरिरावरील तारूण्याचें तेज फारच कमी झालें, आणि मी इतःपर इहलोकसंबंधीं सर्व गोष्टींस मुकलों, असें त्यास वाटूं लागलें. न्यायाधिशानीं आपल्या चिटणिसाकडून वादीची फिर्याद वाचविली, आणि **रंगनाथास** आपला निर्दोषीपणा सिद्ध करण्यास जीं साधनें असतील, तीं हजर करण्याविषयीं आज्ञा दिली, परंतु **रंगनाथाच्या** मुखांतून एकही शद्ब निघाला नाहीं. कारण, जे लोक सुशील, पापभिरू आणि आब्रूचे असतात, त्यांच्यावर असा प्रसंग आला ह्मणजे त्यांस अगदीं सुचेनासें होतें, आणि घटलेल्या लोकांप्रमाणें त्यांची जिव्हा चालत नाहीं. आरोपीस कांहीं बोलावयाचें नाहीं, असें पाहून वादीकडील वकील उभे राहिले, आणि त्यांनीं पूर्वीं झालेली

सर्व हकीकत कोर्टास विदित करून बोलण्यास आरंभ केला.

**वादीचे वकील** – न्यायाधीश आणि पंच महाराज, आम्ही वकीललोकांनीं एखादें प्रकरण हातीं घेतलें ह्मणजे त्यांतील वास्तविक अर्थ जरी आमच्या मनांत येऊन चुकला, तरी न्याय करणाराची व लोकांची खात्री होण्यासाठीं नानाप्रकारच्या युक्तिप्रयुक्तींनीं आपला पक्ष सिद्ध करून दाखवावा लागतो; तशांत आमच्या पक्षाचा खरेपणा, न्याय करणाराच्या मनांत आणून देण्याचें काम फार कुशलतेचें असून, ऐनप्रसंगीं आमची बुद्धि चालेनाशी झाली, किंवा प्रतिपक्षाच्या वकिलांनीं कांहीं विलक्षण कल्पना चालवून आपल्या पक्षाचा खोटेपणा आच्छादन केला, तर न्यायाधिशाच्या मनांत भलताच ग्रह उत्पन्न होऊन, ते खोट्या पक्षास खरा मानितील, आणि त्याप्रमाणें निवाडा करितील, या काळजींत आमचा जीव असतो. महाराज ! या सांप्रतच्या प्रसंगीं आमच्या पक्षाचा पुरावा करणें सुलभ असल्यामुळें आह्मास तशा प्रकारची काळजी मुळींच नाहीं; परंतु आरोपीचें तारुण्य, सभ्यपणा आणि सरळपणा पाहून, इतर लोकांप्रमाणेंच आमचेंहीं मन द्रवतें; आणि आमच्या तर्फेच्या पुराव्यांत कांहीं कमीपणा असता, किंवा आरोपीकडील वकिलाजवळ आमच्या पुराव्याचें सुयुक्त खंडन करण्याचीं साधनें असतीं तर बरें होतें, असें आह्मास मनापासून वाटतें. असो ! आतां मी थोडक्यांतच वास्तविक झालेली हकीकत कळवितों.

'आरोपी **रंगनाथ** याचे आईबाप लहानपणींच वारले;

नंतर आपल्या शहरांतील विख्यात् सावकार **रघुनाथराव** यानीं त्याजकडून कांहीं दिवस विद्याभ्यास करवून, त्यास लागलेंच आपल्या पेढीवर चाकरीस ठेविलें, आणि आरंभींच ३०० रुपये सालीना वेतन करून देऊन, पुढें जसजशी त्यास कामाची माहिती होत जाईल, त्याप्रमाणें ते त्याचें वेतन वाढविणार होते; इतक्यांत गेल्या सोमवारीं तिसऱ्या तारखेस असा प्रकार घडून आला. **रघुनाथराव** यानीं आपले मित्र **श्रीनिवासराव** यांस नेऊन देण्याकरितां, ६००० रुपयांच्या हुंड्या आरोपीच्या स्वाधीन केल्या; त्या घेऊन तो **श्रीनिवासराव** यांजकडे गेला, आणि हुंड्या आपल्याजवळच ठेवून, त्यांबद्दल एक रद्दी कागदाचें पुडकें त्यानें त्यांच्या हवालीं केलें, व लागलाच मोठ्या त्वरेनें कचेरींत परत आला. नंतर, कचेरींत **रघुनाथराव** यांच्या नावाचे कांहीं लखोटे आलेले होते, ते त्यांजकडे पावते करून, तसाच मोठ्या लगबगीनें आपल्या बिऱ्हाडीं गेला, तेथें घरच्या मालकीणीस त्यानें सांगितलें कीं, मी आठ दिवसांच्या आंत तुझें घर सोडून जाणार; तिनें असें करण्याचें कारण काय ? ह्मणून विचारल्यावरून त्यानें उत्तर दिलें कीं, मला एक ठेव लाधली आहे.'

'दुसरे दिवशीं प्रातःकाळीं **श्रीनिवासराव** यानीं हुंड्यांचा मजकूर **रघुनाथराव** यांस कळवितांच, त्यानीं एका पोलीस कामदारास बोलावून आणून, त्याजकडून **रंगनाथ** यास कैद करविलें, आणि कोतवालाकडे पाठवून, त्याच्या बिऱ्हाडाचा झाडा घेवविला. झाडा घेतांनां ५०० रुपयांची ही हुंडी, ( हुंडी हातीं घेऊन दाखवितो ) एका

अडचणीच्या जागीं दडवून ठेवलेली सांपडली. याप्रमाणें झालेल्या हकीकतीचा पुरावा मी करून दिल्यावर, आपली पक्की खातरी होईल कीं, आरोपीनें स्वबुद्धीनें किंवा कोणाच्या तरी नादीं लागून, ही चोरी केली असावी.'

इतकें भाषण करून वादीकडील वकील खालीं बसले. खुद्द **रघुनाथराव** यांची साक्ष झाली, त्यांत त्यानीं प्रतिज्ञापूर्वक सांगितलें कीं, 'मी **श्रीनिवासराव**कडे पोंचत्या करण्यासाठीं, **रंगनाथ** याजपाशीं ज्या हुंड्या दिल्या होत्या त्या उघड्याच होत्या; लखोट्यांत घालून बंद केलेल्या नव्हत्या. हल्लीं जी हुंडी आरोपीच्या घराचा झाडा घेतांना सांपडली आहे, ती त्यांपैकींच आहे; कारण तिच्यावर माझ्या पेढीवरचा शिक्का आहे, आणि माझ्या वहीवर त्या हुंडीचा उताराही आहे.'

**श्रीनिवासराव** यांची साक्ष झाली, तेव्हां त्यानींही वादीकडील वकिलानें सांगितलेल्या मजकुराप्रमाणेंच जबानी दिली. नंतर त्यांच्या मागून **मदनराव** यास साक्षीदाराच्या कठड्यांत उभें केलें; हें **रंगनाथानें** अवलोकन करितांच तो कावराबावरा होऊन त्याकडे पाहूं लागला; त्यावरून लोकांस असें वाटलें कीं, आरोपी **रंगनाथ** याच्या नाशास हेच गृहस्थ कारण झाले असतील, म्हणून तो त्याकडे इतका रोखून पाहात आहे. **मदनरावची** जबानी खालीं लिहिल्याप्रमाणें झाली:—

**वादीचे वकील** – ( मोठेपणा देऊन ) **मदनराव**, आपणास या हुंड्यांच्या चोरी–प्रकरणीं कांहीं माहिती आहे ?

**मदनराव** – (१) तादृश नाहीं, परंतु ठाऊक आहे तितकें सांगतों. कैदी, हा आमच्या यजमानाच्या पदरचा एक कारकून आहे; याजपाशीं गेल्या सोमवारीं यजमानानीं अण्णासाहेबाकडे पोहोंचविण्यासाठीं कांहीं हुंड्या दिल्या होत्या, त्या त्यानें एका लखोट्यांत घालून, लखोट्यावर मोहोर करून बाहेर जातांनां बरोबर नेल्या, असें मला वाटतें.

**न्यायाधीश** – याखेरीज आणखीं कांहीं मजकूर तुह्मास ठाऊक आहे ?

**मदनराव** – (२) नाहीं महाराज; ठाऊक असता तर सेवेस हजर केला असता.

**मदनरावच्या** साक्षींत कांहीं अर्थ नाहीं, असें समजून वादीच्या वकिलानें न्यायाधिशांच्या परवानगीनें त्यास जावयास सांगून दुसऱ्या साक्षीदारास बोलाविलें; हें पाहून कैदीकडील वकील **जनार्दनपंत** उभे राहिले.

**जनार्दनपंत** – (न्यायाधिशास) महाराज, या साक्षीदारास मला कांहीं प्रश्न विचारावयाचे आहेत; आज्ञा होईल तर विचारीन.

**न्यायाधीश** – बरें आहे, त्यांत कांहीं गैरशिस्त नाहीं.

**जनार्दनपंत** – (**मदनरावास**) तुमचें वय किती आहे, हें बरोबर सांगा ?

**मदनराव** –(३) मला गेल्या कार्तिक शुद्ध अष्टमीस तेविसावें वर्ष लागलें.

**जनार्दनपंत** – वाः, तुह्मी स्मरणाचे मोठे धड आहांत ! बरें असो; तुमचें आणि कैदी **रंगनाथ** याचें कधीं भांडण झालेलें तुह्मास स्मरतें ?

**मदनराव** –(४) छे छेः, भांडणाचें काय प्रयोजन ?

**जनार्दनपंत** – विचार करून बोला. तुह्मी जातीनें धीट आहांत; घाबरूं नका, असें तुह्मास सांगायासच नको.

**मदनराव** –(५) ( विचार करण्याच्या मिषानें वर पाहातो, नंतर सर्व लोकांकडे अवलोकन करून ह्मणतो. ) होय, एक वेळ मात्र त्याची माझी कांहीं क्षुल्लक कारणावरून बोलाचाली झाली होती, परंतु त्याविषयीं मलाच पश्चात्ताप होऊन, मी त्याच्या घरीं गेलों आणि त्यापाशीं क्षमा मागितली, तेव्हांपासून आमची मैत्री पुनः पूर्ववत् झाली.

**जनार्दनपंत** – वाः, काय थोरपणा हा; आपला दोष आपल्या लक्षांत येऊन त्याविषयीं अनुताप होणें, व तन्निमित् दुसऱ्यापाशीं क्षमा मागणें, हाच संभावितपणा ! शाबास ! बरें असो; परंतु तुह्मी कैदीच्या घरीं क्षमा मागण्यासाठीं कधीं गेलां होतां ?

**मदनराव** –(६) (किंचित् घाबरतो.) हें प्रकरण झालें त्याच्या दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं.

**जनार्दनपंत** – हें प्रकरण ह्मणजे ? कोणतें प्रकरण?

**मदनराव** –(७) हुंड्या हरवल्याचें प्रकरण.

**जनार्दनपंत** – तुह्मी क्षमा मागण्याच्या निमित्तानें आणखीं कधीं कैदीच्या बिऱ्हाडीं गेलां होतां ?

**मदनराव** –(८) हो, बरी आठवण झाली. ज्या दिवशीं त्याची माझी चकमक झडली, त्याच दिवशीं संध्याकाळीं मी त्याच्या घरीं गेलों होतों, परंतु तो त्या वेळेस भेटला नाहीं; ह्मणून दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं पुनः गेलों.

**जनार्दनपंत** – आतां प्रतिज्ञापूर्वक खरें सांगा; समजलां? ही न्यायसभा आहे, **रघुनाथराव** यांची कचेरी नव्हे. तेथें पाहिजे तसें अद्वातद्वा बोललां आणि भांडलां तरी चालत होतें; परंतु एथें अनृत बोलणारास सरकार शिक्षा देत असतें, हें लक्षांत ठेवा. (हीं भाषणें कैदीकडील वकील अशा रीतीनें बोलले कीं, तीं ऐकून **मदनरावचें** धाबेंच दणाणलें.) आतां माझ्या प्रश्नाकडे नीट लक्ष द्या. **रघुनाथराव** यानीं हुंड्यांचें पुडकें कैदीच्या हवालीं करतानां तुह्मी पाहिलेंत काय? खरें बोला. यजमानाची मुर्वत अगदीं धरूं नका! नाहीं तर सगळें बेंड बाहेर पडेल.

**मदनराव** –(९) होय, मी पाहिलें, त्याविषयीं मला अगदीं संशय नाहीं.

**जनार्दनपंत** – (अत्यंत त्वरेनें) आणि कैदीनें तें पुडकें पेटींत ठेवून, कुलूप लाविल्यावर पेटीच्या किल्ल्या तुह्मी कीं त्यानें उचलल्या?

**मदनराव** –(१०) त्यानेंच आपल्या खिशांत टाकिल्या.

**जनार्दनपंत** – पुरे, बसा आतां.

इतकी जबानी झाल्यावर कैदीकडील वकिलाचे आणि न्यायाधिशांचे नेत्रसंकेत झाले. मग न्यायाधिशांनीं **मदनरावास** प्रश्न करण्यास आरंभ केला:–

**न्यायाधीश** – तर मग, तुह्मी कोतवालापुढें, 'कैदीनें हुंडयांचे पुडके आपल्या पेटींत ठेविलें नाहीं,' असें शपथपूर्वक कसें लिहून दिलेंत ?

**मदनराव** – खरी गोष्ट महाराज; मी कोतवालापुढें लिहून दिलें तेंच खरें. **रंगनाथानें** हुंडयांचें पुडकें खचित् आपल्या पेटींत ठेविलें नाहीं.

**न्यायाधीश** – तुमच्या आतांच्या बोलण्यांत, कैदीनें हुंडया पेटींत ठेऊन, किल्लया खिशांत ठेविल्या, असा भाव आला कीं नाहीं ?

**मदनराव** – ( घामाघूम होतो आणि रूमालानें तोंडावरील घाम पुसून खालीं पाहतो. ) महाराज ! मला कांहीं सुचत नाहीं.

**न्यायाधीश** – तुमच्या यजमानांच्या ह्मणण्यांत असें आहे कीं, त्यानीं कैदी **रंगनाथ** याजपाशीं हुंडयांचें कागद मोकळेच दिले, आणि तुमच्या नंबर ९ च्या प्रश्नाच्या उत्तरावरून असें सिद्ध होतें कीं, कैदीपाशीं **रघुनाथराव** यानीं हुंडयांचें पुडकें दिलें, तर आतां दोघांतून खरा कोण समजावा ?

**मदनराव** – (कांहीं तरी उत्तर देतो ) हुंड्या मोकळयाच होत्या.

**न्यायाधीश** – तुमची आणि कैदीची बोलाचाली झाल्यावर, ही हुंडयांची मालमेल सुमारें किती दिवसांनीं झाली ?

**मदनराव** – त्याचें मला स्मरण नाहीं.

**जनार्दनपंत** – तुह्मी आमच्या नंबर ७ आणि ८ प्रश्नांचीं उत्तरें दिलीं, त्या वेळेस तुह्मास या गोष्टींचें स्मरण होतें, तें आतांच कसें नाहींसें झालें ? स्मरण करून उत्तर द्या.

**मदनराव** – न्यायाधीश महाराज, आज माझी प्रकृति नीट नसल्यामुळें मी कांहीं अंमल केला आहे, यासाठीं माझी साक्ष आज कांहीं उपयोगाची नाहीं.

**वादींचे वकील** – असें आहे तर महाराज आपण या मनुष्याची साक्ष मुळींच काढून टाकावी. असें करण्यास कायद्याचा आधार आहे.

**रघुनाथराव** – ( रागाच्या आवेशांत ) आणि असें आहे तर, इतःपर मला या लबाड मनुष्याचा ( **मदनरावचा**) संबंध पुरे झाला.

**मदनराव** – ( निर्भीड होऊन, **रघुनाथराव** यांजकडे पाहातो आणि मोठ्यानें हांसतो. ) इतःपर मला तुमचा आणि तुमच्या कन्येचा संबंध अगदीं नको.

इकडे बाहेर कोर्टाचे दरवाजापाशीं फार गलबल झाल्यामुळें न्यायाधीश रागानें चहूंकडे पाहात आहेत, तों 'एक साक्षीदार' 'एक साक्षीदार' असे शब्द त्यांच्या कानीं पडले, आणि **मदनरावही** बारीक दृष्टीनें तिकडे डोकावून पाहूं लागला, इतक्यांत, एक अति रूपवान् तरूण मुलगी जिचे कुरळ केंस तिच्या मानेभोंवती लोंबताहेत, चेहरा आनंदरूप होऊन गेला आहे, आणि मुखानें 'आहाः **परमेश्वरा** ! धन्य तुझ्या कौतुकाची ! आहाः **भगवंता** !

केवढी ही तुझी दया' !! असें नानाप्रकारचें आनंददायक स्तुतिपर भाषण आपल्याशींच बोलत बोलत कोर्टांत येत आहे, आणि तिच्याबरोबर चार पांच सेवक लोक आहेत, असें न्यायाधिशांच्या दृष्टीस पडलें.

**रघुनाथराव** यानीं ह्या आपल्या कन्येस ओळखितांच ते अगदीं घाबरून गेले **रंगनाथाच्या** हृदयांत **विठाबाईस** पाहण्याबरोबर आनंदाच्या लहरी उसळल्या, व त्यास असें वाटूं लागलें कीं, या अन्यायापासून मला मुक्त करण्यासाठीं स्वर्गलोकाहून ही कोणी देवताच उतरली कीं काय ! किंवा साक्षात् न्यायदेवता न्यायाधिशांच्या नेत्रांवरील अज्ञान पडदे दूर करण्यासाठीं प्राप्त झाली कीं काय !! एकाच व्यक्तीस पाहून प्रसंगपरत्वें कोठें मित्रभाव, कोठें शत्रुत्व, कोठें भय, कोठें संतोष, असे नाना प्रकारचे मनोधर्म जागृत होतात:— या न्यायानें **विठाबाईस** पाहण्याबरोबर **रंगनाथास** अत्यंत संतोष झाला; सर्व प्रेक्षकांस मोठा चमत्कार वाटला; व **रघुनाथराव** यांस मोठी काळजी उत्पन्न झाली. परंतु **मदनरावास** एवढी भीति उत्पन्न झाली कीं, प्रथम आपल्यासभोंवती चहूंकडे पाहून, नंतर लागलाच तो पलायनाच्या तजविजीस लागला. तो त्या गडबडींत त्या दाटींतून, लोकांची दृष्टि चुकवून कचेरीच्या दरवाजाजवळ आला, तोंच कैदीकडील वकिलाचें लक्ष तिकडे गेलें, तेव्हां त्यानीं त्यास फारच त्वरेनें पकडून, पोलीस कामदार जवळच होते त्यांच्या स्वाधीन केलें. इतक्या संधींत **रघुनाथराव** यांच्या घरच्या दुखणाईत मुलास दोघां सेवकांनीं धरून न्यायाधिशांसमोर

आणिलें, आणि सर्व लोकांच्या दृष्टीस पडण्यासाठीं त्यास उंच ठिकाणीं बसविलें. या मुलाची वाचा धनुर्वातानें गेली होती, परंतु वैद्यबावांनीं औषध–उपचार चांगले केले, त्यायोगानें तो बोलूं लागला; व त्यानें खालीं लिहिलेला मजकूर सर्वांस सांगितला.

**दुखणाईत मुलगा** – त्या दिवशीं मला आपल्या घरीं जाण्याचा कंटाळा आला, ह्मणून मी, सरकारच्या घरांतील बाईसाहेब यांचा हुकूम घेऊन, कचेरीच्या बंगल्यांत जाऊन, रात्रीचा, जाजमावर पडून राहिलों; परंतु तेथें दिवा नसल्यामुळें, मला भय वाटूं लागलें, आणि झोंप येईनाशी झाली. नंतर दहा वाजायाच्या सुमारास, **मदनराव मास्तर** तेथें आले, आणि त्यांनीं खिशांतून एक तारीचा तुकडा काढून, तो, **रंगनाथ** दादाच्या पेटीच्या कुलुपास लावून कुलूप उघडलें, हें सर्व मी निजल्या निजल्या पाहत होतों; मग त्यांनीं पेटींतून एक लखोटा काढून फोडला, आणि मोठ्या आनंदानें एक दोन वेळ 'होजीहो, ह्याच हुंड्या, आतां कामच झालें' असें ह्मटलें. ( कांहीं वेळ थांबून ) तेव्हां मात्र मला धोरण न राहून, मी त्यांच्याजवळ गेलों, आणि, मास्तर हें हो काय? ह्मणून त्यांस मोठ्यानें विचारिलें. तेव्हां मास्तरांनीं मला पाहतांच, मोठ्या रागानें माझ्या मानेवर एक मोठा बुकांदा दिला, त्याबरोबर माझा जीवच निघून गेला होता, पण या बाईसाहेबांनीं ( **विठाबाईकडे** बोट दाखवून ) आणि माझ्या धन्यांनीं मला वांचविलें. आतां महाराज मला पुनः गिरक्या येऊं लागल्या; आग आईग ( बेशुद्ध होऊन खालीं पडतो. )

**परमेश्वरानें** अशा प्रसंगीं, **रंगनाथ** याचा खरेपणा प्रगट करण्यासाठीं, हा चमत्कारिक साक्षीदार पाठविला, तेणेंकरून कोर्टांतील सर्व लोकांस फार आनंद झाला; आणि सुमारें पाव तासाच्या आंत सर्व गडबड मोडली. नंतर **रंगनाथा**कडील वकिलानें खालीं लिहिल्याप्रमाणें भाषण केलें.

**जनार्दनपंत** – न्यायाधीश आणि पंच महाराज, आतां मला आपणापाशीं थोडीशी विनंती करावयाची आहे. प्रथम, **रंगनाथ** यानें हुंड्यांचे कागद यजमानाच्या हातून घेऊन, लखोट्यांत घालून त्यावर मोहोर करून, तो लखोटा पेटींत ठेवून, तो आंगरखा घालावयास खोलींत गेला, ही संधि पाहून, **मदनरावनें** मोठ्या त्वरेनें तशाच कागदाचा एक लखोटा करून, त्यांत रद्दी कागद घातले, आणि त्यावर मोहोर करून, तो **रंगनाथाच्या** पेटीवर ठेविला, असावा. **रंगनाथानें** परत आल्यावर, आपल्या स्मृतीवर विश्वास न ठेवितां, **मदनरावच्या** बोलण्यावरच भरंवसा ठेवून, तो ( **मदनरावनें** केलेला ) लखोटा खिशांत घातला, आणि **श्रीनिवासराव** यांच्या घरीं नेऊन दिला. पुढें, रात्रीं **मदनरावनें** कचेरींत येऊन, **रंगनाथाची** पेटी उघडिली आणि आंतील हुंड्यांचा लखोटा काढून नेला. हें कृत्य ह्या मुलानें पाहिलें, त्यास ठार मारण्याचा हेतूनें, **मदनरावनें** त्याच्या मर्मस्थानीं बुक्की मारिली, तेणेंकरून तो बेशुद्ध पडला; हें पाहून, हा मेला असें **मदनरावास** वाटून, तो पुनः त्याच्या वाटेस न जातां, आपल्या घरीं निघून गेला.

आतां, पोलीस कामदारास जी १०० रुपयांची हुंडी **रंगनाथाचे** घरीं सांपडली, ती **मदनरावानेंच** नेऊन लपवून ठेविली, हेंही उघड दिसतें. या सर्व गोष्टींचा विचार करून, ज्यास जशी शिक्षा योग्य असेल, तशी देण्यास आपण समर्थ आहांत. ( कोटांतं पुनः गलबला होतो. )

ही सर्व हकीकत ऐकून घेऊन, पंचमंडळींतील एक गृहस्थ उठून उभा राहिला, आणि **रंगनाथ**कडील वकिलास पुढील प्रश्न विचारूं लागला:—

**पंच** — **रंगनाथानें** आपल्या बिऱ्हाडाच्या मालकिणीस सांगितलें कीं, मला एक ठेव लाधली आहे, याचा अर्थ काय ?

**रंगनाथ** —(हा प्रश्न ऐकून **रंगनाथाच्यानें** उत्तर दिल्यावांचून राहवेना, तेव्हां तो ह्मणाला ) महाराज, मला जी ठेव लाधली आहे तिची किंमत कोण करील ? निष्कलंक, पवित्र आणि प्रीतीनें भरलेलें असें जें **विठाचें** अंतःकरण—तें—हें माझे वाटणीस आलें आहे! व तीच ठेव!! त्यापुढें सर्व वस्तु मला तुच्छ आहेत!!!

**रंगनाथाचें** भाषण **विठाबाईनें** ऐकतांच, तिनें आनंदाच्या भरांत सर्व मर्यादा एकीकडे ठेविली, आणि धांवत धांवत जाऊन अत्यंत प्रेमानें **रंगनाथाच्या** कंबरेस मिठी मारिली.

सुज्ञ वाचकहो ! आमची गोष्ट एथें पुरी झाली; परंतु जशीं ज्याचीं कर्मे तशीं त्यांस फळें प्राप्त झालीं किंवा नाहींत,—ही शंका आपल्या मनांत राहिल, यासाठीं सांगतों

कीं,–**रंगनाथ** या खटल्यांतून मोकळा झाल्यावर, थोडक्याच दिवसांत तो आपल्या यजमानाचा जामात झाला, आणि **मदनरावास** आपल्या मनाचा काळेपणा धुवून काढण्यासाठीं, राहिलेलें आयुष्य, पांढरे कावळे असतात त्या देशांत ( काळ्यापाण्यावर ) घालवावें लागलें.

एथें '**रंजनचतुष्टयाची**' समाप्ति, ज्या निरंजन **जगन्नियंत्याच्या** परमकृपेनें झाली, त्याचें ज्ञान, आह्मां अज्ञान जनांस, ज्या अंजनानें किंचित् तरी प्राप्त होईल, असें ज्ञानांजन, आह्मांस त्या परम दयाळू **प्रभूनें** द्यावें, अशी त्याची मनोभावानें प्रार्थना करून, प्रीय वाचकांची रजा घेतों.

समाप्त.

## जड्ज, बारिस्टर, सॉलिसिटर, प्रोफेसर, डाक्टर, वकील, इत्यादि.

मुंबईंतील आश्रयदात्यांचीं नांवें.

रा.ब. वासुदेव बापूजी कानिटकर. ६– प्रती.

२–प्रती.

ऑन. काशीनाथ त्र्यंबक तेलंग, सी. आय्. ई., एम्. ए. एल्. एल्. बी. बारिस्टर.

रा.ब. गोपाळराव हरी देशमुख.

रा.रा. विनायकराव रामचंद्र लक्ष्मणजी.

,, व्यंकटराव राघवेंद्रराव बक्षी, इं. प्रि. गि. पो. कोर्ट.

१–प्रत.

श्री.रा. रावजी विनायकराव ज. शंकरशेट.

प्रो. श्रीधर गणेश जिन्सिवाले, एम्. ए.–डा. वि. कॉलेज.

रा.रा. श्रीनिवासराव दादोबा तर्खडकर, एफ्. ई ए. जेलर.

डा. अण्णा मोरेश्वर कुंटे, बी ए. एम् डी.

रा.रा. अण्णाजी बाबूराव आनगळ.

,, अमृतराव रामचंद्र पाटणकर.

,, अमृतराव शिवराम देसाई.

मिस् अहल्याबाई तर्खडकर.

रा.रा. आत्माराम नारायण आचरेकर.

डा. आत्माराम पांडुरंग, जी जी एम् सी.

रा.रा. आत्माराम लक्ष्मण.

डा. आत्माराम वासुदेव वेलकर, एल्. एम् एस्.

रा.रा. आनंदराव कृष्णाजी.

रा.रा. आनंदराव गणेश टिपणिस.
,, आनंदराव भास्करजी.
,, आनंदराव विनायक.
,, आनंदराव शांताराम धुमे.
,, आशन्ना शिवाजी सुकोलू.
,, कानोजी जयराम, नेटिव डाक्टर.
शेट कावसूजी बेजनूजी सेटना, बीए. एल् एल् बी. वकील.
रा.रा. काशीनाथ गोविंद करंदीकर.
,, काशीनाथ हरबा.
,, काशीनाथ लल्लू.
,, केशवराव माधवराव.
,, कृष्णराव गणपतराव नाईक.
,, कृष्णराव सुंदरजी किर्तिकर.
,, खंडेराव चिमणराव बेदारकर, बीए. एल् एल् बी. डे. रजि. हा. कोर्ट.
,, खंडेराव मोरोजी— सॉलिसिटर.
,, गणपत बाबुलजी.
,, गणपतराव माधवराव धैर्यवान.
रा.सा. गणपतराव मोरोबा पितळे, डे. रजि. युनिव्हर्सिटी.
रा.रा. गणपतराव हरिश्चंद्र राजपुरकर.
,, गणेश रामचंद्र किर्लोसकर, एम् ए. एल् एल् बी. वकील.
डा. गोपाळ शिवराम, एल् एम्.
रा.रा. गोविंद विष्णु भिडे.
,, गोविंदराव आनंदराव.
,, गोपीनाथ सखाराम.
,, गंगाराम बाप्सोबा रेळे, बीए. एल् एल् बी. वकील.

रा.रा. घनश्याम नारायण पंडित, बी ए.
" घनश्याम निळकंठ नाडकर्णी, बीए. एल्.एल्.बी. वकील.
" चिंतामण नारायण.
" चिंतामण भाऊ खेडेकर.
" चिंतामण विनायक वैद्य, एम्.ए. सु. ए. कॉलेज.
" जनार्दन त्रिंबक कोटकर.
" जनार्दन दामोदर.
" जनार्दन पुरुषोत्तमजी मंत्री, आर्की. प. व. डि.
" जनार्दन रामचंद्रजी.
" जनोबा बाबाजी.
" जिवनदास गोपाळदास.
अ. डेविड सामसन.
रा.रा. तानू सदू गांवकर चिंदरकर.
" दत्ताजी रामचंद्र नाडकर्णी.
" दाजी आबाजी खरे, बीए. एल्. एल्. बी. वकील.
" दादाजी सीताराम कोठारे.
" दामोदर दिनाजी सातघरे.
" दिनानाथ सुंदरजी, हे. क्ला. पो. क. ऑ.
" नरसिंह उपेंद्र शानबाग.
" नानू नारायण कोठारे— सॉलिसिटर.
" नारायण काशीनाथ.
" नारायण गणेश चंदावरकर, बीए. एल्.एल्.बी. वकील.
" नारायण गणेश.
" नारायण गोपिनाथजी.
" नारायण गोविंद माडगांवकर.
" नारायण त्र्यंबक वैद्य.

रा.रा. नारायण भिकाजी.
,, नारायण महादेव परमानंद, सु. रे. डि. से. ऑ.
,, नारायण रामचंद्र.
,, नारायण व्यंकाजी खोत, एफ् ई ए.
,, नारायण हरी भागवत.
,, निळकंठ महादेव, सु. रे. डि. से. ऑ.
,, परशराम कुशाबा आचार्य, इं. प्रि. स्मा. कॉ. कोर्ट.
,, परशराम विठ्ठल पंडित, एल् सी ई.
,, पांडुरंग श्रीधर पाठक, बीए. एल् एल् बी. वकील.
,, पांडुरंग बळिभद्र— वकील.
,, पांडुरंग राघोबा रावते.
,, पांडुरंग विठोबा मार्किटकर.
,, पुरुषोत्तम कृष्णराव आचार्य.
,, पुरुषोत्तम विष्णु गोडबोले, बीए.
,, पंढरिनाथ मदनजी.
,, बळवंतराव नारायण.
,, बळवंत सदाशिवजी साव.
,, बापूजी बाळकृष्ण.
,, बाबा लक्ष्मण वेलणकर.
,, बाबाजी गोपाळ सातारकर.
,, बाबुराव बाळकृष्णजी.
,, बाबू रामचंद्र— वकील.
,, बाळ मंगेश वागळे, एम् ए. एल् एल् बी. बारिस्टर.
,, बाळकृष्ण आत्माराम गुप्ते, हे. क्ला. आर्टस्कूल.
,, बाळकृष्ण वासुदेव ना. किर्तिकर— सॉलिसिटर.
,, बाळकृष्ण शिवबा कोचरेकर.

डा. बाळकृष्ण सखाराम, जी जी एम् सी.

रा.रा. बाळाजी कृ. रघुनाथजी.

,, बाळाजी पांडुरंग, ट्रान्स्लेटर हा. कोर्ट.

,, भगवंतराव सदाशिवजी साव.

,, भाई रामचंद्रजी.

,, भाऊ गणूजी.

,, भाऊ बाबाजी सुर्वे.

,, भाऊ मोरोबा.

,, भास्कर हरी भागवत, इं. प्रि. स्मा. कॉ. कोर्ट.

,, भिकाजी बळवंत खटावकर.

,, भिकोबा राघोबा देवनळकर, एफ् ई ए.

,, महादेव कृष्णाजी खेडेकर.

,, महादेव भागोजी.

,, महादेव भास्कर चौबळ, बीए. एल् एल् बी. वकील.

,, महादेव वामन भट, बी ए.

,, महादेव सीताराम चौबळ.

,, माधवराव धोंडूजी कार्लेकर.

,, मार्तंड बापू जोशी.

रा.ब. मुकुंद रामचंद्र इंजिनियर.

रा.रा. मुरारराव क्षीरसागर, पो. इन्स्पेक्टर.

,, मोरेश्वर गोपाळ कामत.

डा. मोरेश्वर गोपाळ देशमुख, बीए. एम् डी.

रा.रा. मोरोबा विनायक.

,, यशवंत पुरुषोत्तम मणेरीकर.

,, यशवंत वासुदेव आठल्ये.एम् ए. एल् एल् बी. वकील.

,, यशवंतराव भास्करजी.

रा.रा. रघुनाथ आनंदराव कामत.
,, रघुनाथ भास्कर वगळ.
,, रघुनाथ लाडोबा कर्णेकर.
,, रामकृष्ण बाळाजी.
,, रामचंद्र आत्माराम.
,, रामचंद्र केरोबा भेंडे.
,, रामचंद्र गणेश प्रधान.
,, रामचंद्र त्रिंबक, नेटिव डाक्टर.
,, रामचंद्र भिकाजी गुंजीकर.
,, रामचंद्र भीमराव, पो. जमादार.
,, रामचंद्र मुकुंदजी, हे. क्ला. टा. कौं.ऑ.
,, रामचंद्र लक्ष्मणजी.
,, रामचंद्र विष्णु माडगांवकर, बी ए.
,, रामचंद्र हरी शिवडवकर.
,, रामराव बापू.
,, रावजी सदाशिव महापणकर.
रा.ब. लछमनसिंग, सु. ट्रा. पोस्ट ऑ.
रा.रा. लक्ष्मण नारायण.
,, वामनराव अण्णा.
,, वामन राव नाना मदन.
,, वामन आबाजी मोडक, बी ए. प्रि. ए. हा. स्कूल.
,, वामनराव शिवराम नाचणे.
,, वासुदेव कृष्णराव धैर्यवान्, बीए.एल्एल्बी. बारिस्टर.
,, वासुदेव गोपाळ भांडारकर, बीए.एल्एल्बी. वकील
रा.सा.वासुदेव जगन्नाथ किर्तिकर— वकील.
डा. विठ्ठल बाळकृष्ण जोशी, एल् एम् एस्.

डा. विठ्ठल विष्णु गोखले, एम्‌ए. एल्‌ एम्‌ एस्‌.
,, विनायक गोविंद गीध, एल्‌ एम्‌ एस्‌.
रा.रा. विनायक त्रिंबक तळपदे.
,, विनायक माधवराव पितळे.
,, विनायकराव सखाराम पराडकर.
,, विश्वनाथ भगवंत गांगनाईक.
,, विश्वनाथ भास्करजी.
,, विष्णु कृष्ण भाटवडेकर, बीए. एल्‌एल्‌बी. वकील.
,, विष्णु लक्ष्मण जुंवेकर.
रा.ब. शंकर पांडुरंग पंडित, एम्‌ए. ओ. ट्रान्स्‌लेटर.
रा.रा. शांताराम नारायण वकील.
डा. शांताराम विठ्ठल, एल्‌ एम्‌.
रा.रा. शांताराम विश्वनाथ आठवणकर.
,, शामराव आबाजी मुंगे.
,, शामराव पांडुरंग— सॉलिसिटर.
,, शामराव भास्कर, ट्रान्स्‌लेटर हा. कोर्ट.
,, शामराव माणिकजी रेळे, बीए एल्‌एल्‌बी. वकील.
,, शामराव विठ्ठल— वकील.
,, शिवराम गणपतराव राजवाडकर.
,, शिवराम विठ्ठल भांडारकर, बीए. एल्‌एल्‌बी. वकील.
,, शिवशंकर नारायण छात्रे.
प्रो.डा.सखाराम अर्जुन, एल्‌ एम्‌.
रा.रा. सदाशीव आत्माराम.
,, सदाशीव नारायण भेंडे, हे.क्ला. म्यु. आ.
डा. सदाशीव वामन काणे, एल्‌ एम्‌ एस्‌.
रा.रा. सीताराम धाकजी वासूलेकर, हे.क्ला. गि. पो. कोर्ट.

रा.रा. सीताराम विष्णु प्रभू, अ. शिरस्तेदार, हा. कोर्ट.
,, सुंदरराव गजानन जयकर, एम् ए. बी एस्.
,, सोकर नारायणजी.
,, सोकर बापूजी त्रिलोकेकर, ट्रान्सूलेटर हा. कोर्ट.
,, सोकर मदनजी मानकर.
,, हरिशंकर बाळकृष्ण– वकील.
,, हरिश्चंद्र कृष्ण जोशी.
रा.ब. हरिश्चंद्र यादवजी, हे. क्ला. प्रे. पे. ऑ.
रा.रा. हरिश्चंद्र शामराव कोठारे, ट्रान्सूलेटर हा. कोर्ट.
,, हरिश्चंद्र सदाशिवजी, इंजिनियर.
,, हरी गणेश कडुसकर.
,, हरी जनार्दन पुराणिक.
,, हरी बापूजी कवी.
,, ज्ञानेश्वर एकनाथ.

## बाहेरगांवच्या आश्रयदात्यांचीं नांवें.

श्री. बळवंतराव भुसकुटे, जहागिरदार, बऱ्हाणपूर.
रा.रा. एकनाथ गणेश भांडारे, जबलपूर.
,, कृष्णराव वासुदेव मुळ्ये, बीए. इंदूर.
डा. गणपतसिंग, रेसि. सर्जन, इंदूर.
रा.रा. गणेश बाळकृष्ण जोग, जबलपूर.
,, गंगाधर सदाशीव नाईक, कल्याण.
,, गोपाळ बापूजी आळेकर, पुणें.
,, चिंतामण जगन्नाथ ह्मात्रे, डे. आर्कों. आलीबाग.
,, जगन्नाथ लक्ष्मण मानकर, हे. आर्कों. ,,
,, दत्ताराम वासुदेव पिळगांवकर, इंदूर.
,, देवाजी बापूजी पाटील, जबलपूर.

डा. धर्माजी गणेश कामत, एल्एम्. रे. सर्जन. सोलापूर.
रा.रा. बळवंतराव रघुनाथ ढवळे, इंदूर.
,, बाळकृष्ण आत्माराम, फ. क्लार्क.कले.ऑ.आलीबाग.
,, भवानराव आनंदराव जायभावे, म्या.पो. डि. इंदूर.
रा.ब. महादेव गोविंद रानडे,एम्ए.एल्एल्बी.जड्ज, पुणे.
—मुक्ताबाई, इंदूर.
रा.रा. मोरो हरी पिंगळे, अ.चिट. कु. क. ऑ. आलीबाग.
,, रघुनाथ गणेश फौजदार, भादरण.
,, रामचंद्र गोपाळ मिटबावकर, इंदूर.
,, रामचंद्र विनायक तागडे ,,
,, लक्ष्मणराव गणेश गंधे, बीए. म्या. दरबार–इंदूर.
,, वामन भास्कर चित्रे, पुणें.
,, विठ्ठलदास कानजीशेट, मालवण.
,, विनायक रामचंद्र, से. क्लार्क, कले. ऑ. आलीबाग.
रा.सा.डा. विश्राम रामजी घोले, पुणें.
रा.सा. विष्णु केशव कुंटे, बीए. जड्ज, मडंळेश्वर.
रा.रा. शंकर अनंत नातू, पुणें.
,, सखाराम सिताराम, केटा.
,, सदाशीव बाळशेट पाथरे, मालवण.
,, साबाजी दायाजी कांदळगांवकर, केटा.
,, सीताराम बापूजी रेगे,एज्यु.क्लार्क,कले.ऑ.आलीबाग.

# सूचना.

---

| पृष्ठ. | ओळ. | |
|---|---|---|
| ४४ | २२ | यांत 'यशवंतरावानीं' येथें 'यशवंतरावनीं' वा० |
| ४९ | १० | यांत 'सिद्दापूरास' येथें 'सिद्दापुरास' वाचावें. |
| ५० | ८ | यांत 'यशवंतरावार्जीचा' येथें 'यशवंतरावजींचा' |
| ५९ | २० | यांत 'रंवरावजी' येथें 'रंगरावजी' वाचावें. |
| ५७ | ६ | यांत 'यशवंतराजीची' येथें 'यशवंतरावजींची' |
| ७३ | १ | यांत दोन्ही 'इ' दीर्घ (ई) वाचाव्या. |
| ११८ | १८ | यांत 'माधरावास' येथें 'माधवरावास' वाचावें. |